। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
१९३७-२०२६ वर्ष ९०
# कृषीवल
रायगड रविवार । दि. ६ सप्टेंबर २०२६ । अंक ९२ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

# अलिबागमध्ये मानाच्या दहिहंडीचा थरार




## मरीआई मेटपाडाने केला 9 थरांचा विक्रम

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यामध्ये शनिवारी (दि.५) ''गोविंदा रे गोपाळा'' यासह अनेक मराठी, हिंदी गाण्यांच्या ठेक्यावर नाचत वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन दहीहंडीचा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या उत्सवाचा आनंद अबाल वृद्धांपासून बच्चे कंपनीनेदेखील मनमुरादपणे लूटला. यावेळी अलिबाग येथे शेकाप पुरस्कृत अभिमानाच्या व मानाच्या दहीहंडीच्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात अनेक गोविंदा पथकांनी सहभागी होऊन मानवी मनोरे उभारून सलामी दिली. तो क्षण प्रेक्षकांनी आपल्या मोबाईलमध्ये टिपण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या दहिहंडीचा सोहळा अतिशय रंगतदार ठरल्याचे दिसून आले.



● (छायाचित्र : समीर मालोदे)

रायगड जिल्ह्यामध्ये ग्रामीण व शहरी भागात शनिवारी (दि.५) गोपाळकाळानिमित्त दहीहंडीचा जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी अलिबागमध्ये शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग आणि प्रशांत नाईक मित्र मंडळ आयोजित मानाच्या दहीहंडीच्या उत्सवाची २४ वर्षाची परंपरा जपण्यात आली. हा सोहळा अलिबाग नगरपरिषदेचे बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनातून राबविण्यात आला. अलिबागमधील शेतकरी भवन परिसरात दुपारी अडीच वाजल्यापासून नागरिकांनी जमण्यास सुरुवात केली. हा उत्सव पाहण्यासाठी काही तासांतच अलोट गर्दी झाली. सायंकाळी ५.०० वाजल्यापासून सुरु झालेल्या या सोहळ्यामध्ये उंच थरांसाठी गोविंदा पथकांची चुरस दिसून आली. गाण्याचा ताल, आणि एकावर एक थरातून सलामी, यामुळे दहिहंडीचा उत्साह, गोविंदाचा जल्लोष द्विगुणीत झाल्याचे पहावयास मिळाले. दरम्यान, कुलाबा ढोल पथकाच्या आवाजाने संपुर्ण परिसर दुमदूमून गेला होता.

(सविस्तर वृत्त पान ३ वर)

### यांनी दिली विक्रमी सलामी..

अलिबाग येथील मरीआई मेटपाडा गोविंदा पथकाने नऊ थरांची सलामी देत एक नवा विक्रम केला. याआधी रायगडातील कोणत्याही गोविंदा पथकाला नऊ थर रचता आलेले नाहीत. त्यामुळे प्रशांत नाईक यांच्यातर्फे मरीआई मेटपाडा गोविंदा पथकाला १ लाख रुपयाचे बक्षिस जाहिर केले. तसेच, अलिबाग कोळीवाडा गोविंदा पथकाने आठ थरांची सलामी दिली. त्यांना प्रशांत नाईक यांच्यातर्फे ५० हजार रुपयांचे बक्षीस जाहिर करण्यात आले. त्याचबरोबर महिला गोविंदा पथकातील पोहरादेवी शास्त्रीनगर या पथकाने सहा थर लावून विक्रम केला. तत्पूर्वी, पाचनाका महिला गोविंदा पथकाने पाच थरांची मानाची सलामी दिली. तसेच, चेंढरे येथील श्रीदत्त महिला गोविंदा पथक, श्रीदत्त पुरुष गोविंदा पथक, श्री कानिफनाथ महिला गोविंदा पथक मेटपाडा, कुरुळ येथील श्री चिद्बादेवी गोविंदा पथकांसह इतर पथकांनी सलामी दिली.

### सुरक्षेसाठी उत्तम व्यवस्थापन

अलिबाग येथील मानाच्या दहीहंडी उत्सवामध्ये याठिकाणी येणाऱ्या गोविंदा पथकांसाठी आयोजकांनी उत्तम व्यवस्थापन केले होते. रुग्णवाहिकेसह अग्नीशमन दलाचे वाहन, वैद्यकिय यंत्रणा तैनात करण्यात आली होती. तसेच, गोविंदा पथकांच्या सुरक्षेसाठी आणि अपघात टाळण्यासाठी जमीनीवर मॅटची सुविधा देखील उपलब्ध करण्यात आली होती. तसेच, आयोजकांकडून वेळोवेळी योग्य ती खबरदारी घेतली जात होती.

## जिल्ह्यात गोविंदांचा उत्साह शिगेला

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात ग्रामीण भागांमध्ये घरोघरी जाऊन साखळी पद्धतीने नृत्य करत जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी गोविंदांवर पाण्याचा वर्षाव करण्यात येत होता. तसेच, गोविंदांनी दही-पोह्यांचा आस्वाद घेतला. त्यानंतर गल्लीतील तसेच नाक्यावरील छोट्या-मोठ्या दहीहंड्या फोडून गोविंदांनी आनंद व्यक्त केला. यावेळी महिला गोविंदा पथकांनीही उत्साहाने सहभाग घेतला होता.

रायगड जिल्ह्यात यावर्षी तब्बल ८ हजार ९७९ दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या. त्यामध्ये १ हजार ९१७ सार्वजनिक, तर ७ हजार ६२० खासगी दहीहंड्यांचा समावेश होता. यावेळी अलिबागसह पनवेल, खोपोली आणि कर्जत परिसरात लाखो रुपयांच्या बक्षिसांच्या दहीहंड्यांचे आयोजन करण्यात आले होते. डीजेच्या तालावर गोविंदांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. तसेच, सेलिब्रिटींची उपस्थिती आणि आकर्षक बक्षिसांमुळे दहीहंडी स्पर्धांना चांगलीच रंगत आली. दरम्यान, अलिबाग शहरात शेतकरी भवन, जोगळेकर नाका, चेंढरे, मेटपाडा, रामनाथ, मारुती नाका इत्यादी ठिकाणी दहीहंड्या बांधण्यात

●➤पान २ वर

### पाचजण जखमी, एक गंभीर

रायगड जिल्ह्यामध्ये दुपारपासून दहीहंडी फोडण्याचा आणि सलामी देण्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी वेगवेगळे थर उभारताना तोल गेल्यावर अनेकजण खाली पडले. त्यामुळे पाचजणांना किरकोळ दुखापत झाली असून, एकजण गंभीर जखमी आहे. त्यांच्यावर अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयातील अति दक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

## अँगल अंगावर पडून मृत्यू

। पुणे । प्रतिनिधी ।

दहीहंडी फुटल्यानंतर स्टेजची कमान उतरवीत असताना लोखंडी अँगल अंगावर पडल्याने महिलेचा मृत्यू झाला आहे. ही घटना शुक्रवारी रात्री पावणे अकराच्या सुमारास पिंपरी-चिंचवड मधील जुनी सांगवी येथे घडली. सलमा पठाण (४५) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत सांगवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी यांनी माहिती दिली. जुनी सांगवी लेन नंबर दोन येथील विघ्नहर्ता दहीहंडी मित्र मंडळाची दहीहंडी शुक्रवारी

●➤पान २ वर

## मुंबईतील दहिहंडी उत्सवाला गालबोट

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईतील गोविंदा पथके गोपाळकाल्यानिमित्त शनिवारी सकाळपासून ठिकठिकाणी मानाच्या दहीहंड्या फोडत मोठ्या बक्षिसांच्या आमिषापोटी मुंबईत फिरत होती. मात्र, मनाई असतानाही १४ वर्षांखालील मुला-मुलींचा थरामध्ये समावेश करून मोठ्या रकमेचे पारितोषिक मिळविण्यासाठी दहीहंड्या फोडण्याचा प्रयत्न पथके करीत होती. त्याचवेळी मालाडमधील मालवणी परिसरात चिकुवाडी येथे दहीहंडी बांधलेला वीटांचा खांब कोसळून जखमी झालेल्या सात वर्षांच्या गोविंदाचा मृत्यू झाल्याने दहीहंडी उत्सवाला गालबोट लागले. त्याचबरोबर सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत ठिकठिकाणी थर कोसळून ११८ गोविंदा जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. मुंबई शहरातील ८३, पूर्व उपनगरांतील २१, तर पश्चिम उपनगरांतील १४ गोविंदांचा त्यात समावेश आहे. जखमी गोविंदांना तातडीने केईएम, नायर, शीव, राजावाडी, हिंदुजा,

●➤पान २ वर

## चिमुकलीचा सर्प दंशाने मृत्यू

। वाघ्रण । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील कार्लेखिंड येथील मैनुशेठ वाडा येथील हर्षवी पाटील या पाच वर्षीय चिमुरडीचा मंगळवारी (दि.१) सर्पदंशाने मृत्यू झाल्याची दुदैवी घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, हर्षवी पाटील ही आजोबांसोबत दुसऱ्या घरात झोपली होती. सायंकाळच्या सुमारास तिचे आजोबा काही वेळासाठी उठून गेल्यानंतर दबा धरून बसलेल्या सापाने हर्षवीला दंश कल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, काही वेळाने तिची आजी तिला उठविण्यासाठी गेल्यानंतर तिची प्रकृती गंभीर असल्याचे लक्षात आले. त्यानंतर कुटुंबियांनी तिला अलिबाग येथील एका खासगी रुग्णालयात आणले. मात्र, सुरूवातीला हर्षवीला सर्पदंश झाल्याचे स्पष्ट झाले नव्हते. प्रकृतीत सुधारणा न होता तोंडाला फेस येणे आणि श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्यानंतर पुढील उपचारासाठी



●➤पान २ वर

## मुलानेच केले आईवर वार

। महाड । प्रतिनिधी ।

महाड एमआयडीसीमध्ये सध्या गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून त्यामध्ये खून, खुनाचा प्रयत्न, महिलांवर अत्याचार, विनयभंग, घरफोडी, चोरी अशा गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे. त्यातच रुपावली सुंभेकोंड येथे मुलानेच आईवर सुरीच्या साह्याने सपासप वार केल्याची घटना घडली आहे. राजेंद्र मोतीराम सुंभे (२४) असे मुलाचे नाव असून, विमल मोतीराम सुंभे असे जखमी आईचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विमल सुंभे या बुधवारी (दि.२) सायंकाळच्या सुमारास आपल्या घरात भांडी घासत असताना त्यांचा मुलगा राजेंद्र हा भाजी कापण्याचा सुरा घेऊन घटनास्थळी त्याठिकाणी आला. त्यानंतर त्याने कोणताही विचार न करता स्वतःच्या आईवर सुरीच्या साह्याने सपासप वार केले. त्याने हा जीवघेणा हल्ला कोणत्या कारणास्तव केला ते अद्यापही अस्पष्ट असून, आईची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांना अधिक उपचारासाठी पनवेल येथे हलविण्यात आले आहे.

दरम्यान, वडील मोतीराम सुंभे यांनी मुलाला रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्यावरही मुलाने सुरीने वार केले. त्यात ते देखील किरकोळ जखमी झाले आहेत. या प्रकरणी राजेंद्र सुंभे याच्या विरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संपूर्ण गुन्ह्याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विक्रांत फडतरे करीत आहेत.

## कारमधून ओढून तरुणाला मारहाण

। रसायनी । प्रतिनिधी ।

मागील वादाचा राग मनात धरून तरुणाला कारमधून बाहेर ओढून काढत शिवीगाळ व दमदाटी करून मारहाण केल्याची घटना रसायनी येथील नवीन पोसरी-मोहोपाडा परिसरात घडली. या प्रकरणी रसायनी पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, खालापूर-कांबे येथील आरिन पिल्ले (२२) हा नवीन पोसरी येथील तलावाजवळ आपल्या वडिलांसोबत कारमध्ये बसलेला होता. त्यावेळी तळेगाव येथील विनायक भाऊ कडपे याने दोन अनोळखी व्यक्तींच्या सहाय्याने गाडीचा दरवाजा उघडून आरिन पिल्ले याचा हात धरून बाहेर खेचले. त्यानंतर त्यांनी पिल्ले याला शिवीगाळ व दमदाटी करत हाताबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच, त्यातील एकाने काळ्या रंगाच्या लाकडी बेसबॉल स्टिकने आरिन पिल्ले याच्या उजव्या मांडीवर प्रहार केल्याने गंभीर दुखापत झाली. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .दरम्यान, पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर यांनी घटनास्थळी भेट दिली.

## माथेरानमध्ये युवकाची आत्महत्या



। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरानमध्ये अंबरनाथ येथून पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकाने येथील अलेक्झांडर पॉईंट येथे दरीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली. त्यानंतर तब्बल आठ तासांनी पोलिसांना रेस्क्यू टीमच्या मदतीने त्या तरुणाचा मृतदेह १५०० फूट खोल दरीतून बाहेर काढण्यात यश आले.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबरनाथ येथील सोनू जनकराम गौतम हा २१ वर्षीय तरुण शुक्रवारी (दि.४) आपल्या दोन सहकाऱ्यांसह माथेरान येथे पर्यटनासाठी आला होता. यावेळी सोनू गौतमसह त्याचा भाऊ अर्जुन गौतम व मित्र नासिर हुसेन खान हे येथील अलेक्झांडर पॉईंट येथे गेले होते. त्यानंतर सायंकाळी ४.०० वाजण्याच्या सुमारास सोनू गौतम याने तेथील खोल दरीत उडी घेतली. त्यावेळी त्याठिकाणी

●➤पान २ वर

## जुन्या पेन्शनसाठी मूक मोर्चा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।




रायगडमधील महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाच्यावतीने शिक्षक दिनाच्या निमित्ताने शनिवारी (दि.५) जिल्हाधिकारी कार्यालय येथे मूक मोर्चा काढण्यात आला. शंभर टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जूनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, अशा अनेक मागण्यांसाठी पदाधिकाऱ्यांनी हा लढा पुकारला होता. याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

दि.१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विनाअनुदानित, अंशतः अनुदानित तत्त्वावर नियुक्ती होऊन शंभर टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाची आहे. राज्यात असे सुमारे २६ हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आहेत, त्यांची मूळ नियुक्ती १९९२ ते २००४ दरम्यान झाली आहे. शासनाच्या अनुदान धोरणामुळे (सुरुवातीला २५-५०-७५-१०० टक्के आणि नंतर २०-४०-६०-८०-१०० टक्के) या कर्मचाऱ्यांना वेळेवर १०० टक्के अनुदान मिळाले नाही. २० टक्के अनुदानानंतर पुढील टप्पे वर्षानुवर्षे रखडले आहेत. त्यामुळे हे कर्मचारी २००६, २००८, २०१० मध्ये उशिरा १०० टक्के अनुदानित झाले. शासनाच्या इतर सर्व विभागात

●➤पान २ वर




### गणेशोत्सव तोंडावर असताना सुविधांचा अभाव | प्रवाशांना पाण्यात उभे राहण्याची वेळ

## अलिबाग एसटी स्थानक समस्यांच्या गर्तेत

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

गणेशोत्सव अवघ्या आठ दिवसांवर येऊन ठेपला असतानाही जिल्ह्याच्या ठिकाणचे अलिबाग एसटी स्थानक मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. साचलेल्या पाण्याचा निचरा नाही, स्थानकात मोठमोठे खड्डे, बंद स्वच्छतागृह, अस्ताव्यस्त कचरा आणि बस सुटण्यास होणारा विलंब अशा समस्यांनी स्थानकाची अवस्था बिकट झाली आहे. लाखो रुपयांचे उत्पन्न देणाऱ्या आगाराला प्रवाशांना मात्र सुविधांच्या नावाने गैरसोयींचाच प्रवास करावा लागत असल्याचे चित्र आहे.




अलिबाग एसटी स्थानक ४० वर्षांहून अधिक जुने आहे. अलिबाग आगारात अडीचशेहून अधिक कर्मचारी असून, त्यामध्ये दीडशेहून अधिक चालक व वाहकांचा समावेश आहे. स्थानकात ६८ एसटी बस असून, एसटीला महिन्याला सुमारे पाच कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते.

> **स्थानकातील स्वच्छतागृह का बंद आहे, याची माहिती नाही. मात्र, याबाबत पडताळणी केली जाईल. स्थानकाचा परिसर स्वच्छ ठेवण्याची सूचना संबंधितांना केली जाईल.**
> **– राकेश देवरे, आगार व्यवस्थापक, अलिबाग**

अलिबाग तालुक्यासह विविध भागांतील हजारो प्रवासी एसटीतून प्रवास करतात. जिल्ह्याचे ठिकाण असल्याने अलिबागमध्ये शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये मोठ्या संख्येने आहेत. नोकरी, शिक्षण आणि पर्यटनासाठी दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक अलिबागमध्ये येतात. मात्र प्रवाशांच्या या वाढत्या संख्येच्या तुलनेत स्थानकातील सुविधा अपुऱ्या पडत आहेत.

स्थानकातील ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. याच खड्ड्यांमधून एसटी बसची ये-जा सुरू असल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा

●➤पान २ वर

# सणांवर पोलिसांची करडी नजर

## ■ सायबर सेलसह दहशतवादविरोधी पथक ॲक्शन मोडवर
## ■ ६५५ गावगुंडांना पोलिसांचा दणका

**। रायगड । प्रमोद जाधव ।**

गोपाळकाळानंतर आगामी गणेशोत्सव रायगड जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. उत्सवाची तयारी जोमाने सुरू असतानाच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी रायगड पोलीस ॲक्शन मोडवर आले आहेत. विविध सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या असून, जिल्ह्यातील ६५५ गावगुंडांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई सुरू करण्यात आली आहे. रायगड पोलिसांसह सायबर सेल आणि दहशतवादविरोधी पथकाचीही सणांवर करडी नजर राहणार आहे.

यंदा रायगड जिल्ह्यात ८ हजार ८०० ठिकाणी दहीहंडी उभारण्यात आल्या असून, ३४० ठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्या. दुपारपासून सुरू झालेला हा उत्सव रात्री दहा वाजेपर्यंत ठिकठिकाणी रंगला होता. दहीहंडीनंतर आता बाप्पाच्या स्वागताची लगबग सुरू झाली आहे. यावर्षी १४ सप्टेंबरला घरोघरी गणरायाचे आगमन होणार असून, जिल्ह्यात १ लाख ५ हजार ५४ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. दि.१४ ते २५ सप्टेंबरदरम्यान गावोगावी मोठ्या उत्सवाचे स्वरूप निर्माण होणार आहे. धार्मिक कार्यक्रमांसह सामाजिक, सांस्कृतिक आणि समाजप्रबोधनाचे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.

दहीहंडीनंतर आता गणेशोत्सव शांततेत पार पडावा, यासाठी रायगड पोलिसांनी संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे स्तरावर शांतता समितीच्या ३६, मोहल्ला समितीच्या ३०, गणेश मंडळ व गोविंदा मंडळांच्या १३० तसेच १२५ गावभेटी अशा एकूण ३२१ बैठका घेण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील १६ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दंगा काबू पथक व संचलन काढून सण-उत्सव आनंदी आणि शांततामय वातावरणात साजरे करण्याचे आवाहन करण्यात आले. जातीय सलोखा कायम ठेवण्यावर पोलिसांनी भर दिला आहे. सण-उत्सवाच्या काळात गावगुंडांकडून होणारे वाद टाळण्यासाठी रायगड पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता तसेच मुंबई पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र प्रोव्हीजन अधिनियमांतर्गत ६५५ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे. संबंधितांकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेण्याचे काम सुरू आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासह जातीय सलोखा कायम ठेवण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे.



# शेकापच्या लॉन्ग मार्चची दखल

**। गडचिरोली । प्रतिनिधी ।**

देशातील अतिअसूरक्षित समुदायाला त्यांचे कृषीपूर्व समाजाचे अधिवासाचे धारणाधिकार मंजूर करण्याची तरतूद वनहक्क कायद्यामध्ये आहे. मात्र, असे असूनही गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंड या अतिअसूरक्षित समुदायांच्या सुरजागड, बेज्जूर, वेनहारा, पेरमिली, तोडसा, झाडापापडा, खुटगाव, पावीमुरांडा यासारख्या पारंपरिक इलाख्यांना हे अधिवास हक्क मिळालेले नाहीत. त्यामुळे आदिवासींची आदिम संस्कृती, बोलीभाषा आणि जगण्याची खरीखुरी नैसर्गिक संसाधने यावरील हक्क डावलले जाण्याची शक्यता आहे.

त्यामुळे हे हक्क कायदेशीररीत्या अबाधित राहण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाने प्रशासनाकडे लॉन्ग मार्चच्या माध्यमातून प्रश्न लावून धरला होता. त्यावर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंड समुहाच्या सर्व पारंपरिक इलाख्यांना अधिवास हक्क मंजूर करण्याची तयारी दाखवत, इलाखा दावे स्विकारुन योग्य पडताळणी करुन जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश उपविभागीय वनहक्क समित्यांना दिले आहेत.

गडचिरोली जिल्ह्यातील विविध मागण्यांसाठी शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने दि.१६ ऑगस्टपासून सुरजागड ते गडचिरोलीपर्यंत ''जमीन अधिकार के लिये लाँग मार्च'' आयोजित केला होता. मात्र, पोलीस प्रशासनाने शेकापचे शिष्टमंडळ आणि जिल्हा प्रशासन यांच्यात बैठका घडवून आणून लॉन्ग मार्चच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला होता. या बैठकांमध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या विविध मागण्यांची पूर्तता करण्याची आणि त्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याची तयारी दाखवून प्रशासनाने कार्यवाहीला सुरुवात केली होती. त्यामुळे लॉन्ग मार्च तात्पुरता स्थगित करण्यात आला होता. आता इलाखा दावे मंजूरीसाठीची प्रक्रिया राबविण्याचे आदेश उपविभागीय वनहक्क समित्यांना जिल्हा प्रशासनाने दिल्याने सुरजागड सह जिल्ह्यातील सर्व पारंपरिक इलाख्यांना अधिवास हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# संतोष भोईर यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**




महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती संघटनेच्या माध्यमातून राज्यस्तरीय सोहळ्यांतर्गत कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार-२०२६ (दक्षिण रायगड) गोरेगाव-माणगाव येथील ना. म. जोशी विद्यामंदिर येथे कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या संकल्पनेतून तसेच रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

सुधागड तालुक्यातील विद्यार्थीप्रिय असलेले प्रा. संतोष भोईर यांचा शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, सांस्कृतिक, अध्यात्मिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी असल्याने हा पुरस्कार योग्य व्यक्तीला मिळाल्याचे मत महाविद्यालयाच्या वाणिज्य प्रमुख प्रा. स्नेहल बेलवलकर यांनी महाविद्यालयात अभिनंदन कार्यक्रमात बोलताना काढले. या पुरस्कारामुळे प्रा.भोईर सर यांचे विविध क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. तसेच महाविद्यालयाचे कार्यलयीन अधीक्षक चंद्रकांत चिले, वाणिज्य विभागाच्या प्राध्यापिका डॉ. भारती आरोटे, प्रा. रुकसार महाडकर, प्रा. हर्षिता घोसाळकर, महाविद्यालयातील आजी-माजी

# 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत वृक्षारोपण

**। आगरदांडा । प्रतिनिधी।**

'एक पेड माँ के नाम' या पर्यावरणपूरक अभियानांतर्गत हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय तटरक्षक दलाच्या पदाधिकाऱ्यांसोबत वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पाडला. या उपक्रमासाठी भारतीय तटरक्षक दलाने शाळेला १०० रोपे उपलब्ध करून दिली.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका प्रविता गार्डी यांनी भारतीय तटरक्षक दलाचे आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली. त्या म्हणाल्या, आई आपल्या मुलाचे संगोपन करून त्याला सावली व सुरक्षितता देते. त्याचप्रमाणे वृक्ष



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

मानवाला प्राणवायू, सावली आणि पर्यावरणीय संतुलन प्रदान करतात. त्यामुळे आईच्या सन्मानार्थ एक झाड लावण्याची संकल्पना भावनिक तसेच पर्यावरणपूरक आहे.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये केवळ वृक्षारोपणाची नव्हे, तर वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. लावण्यात आलेल्या प्रत्येक रोपाला नियमित पाणी देणे, त्याचे संरक्षण करणे आणि ते जगविणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

मुरुडसारख्या निसर्गसमृद्ध परिसरात वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर अशा पर्यावरणपूरक उपक्रमांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शाळेच्या परिसरात लावण्यात आलेली १०० रोपे भविष्यात मोठी वृक्ष बनून विद्यार्थ्यांसह परिसराला सावली देतील आणि पर्यावरण संवर्धनात मोलाचे योगदान देतील. देशाच्या सागरी सुरक्षेबरोबरच पर्यावरण संवर्धनाची सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या भारतीय तटरक्षक दलाच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# सुधागड भूमिअभिलेखचा ढिम्म कारभार

## ■ आकारफोड पत्रकातील नाव दुरुस्तीचा अर्ज तीन महिने प्रलंबित

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

आकारफोड पत्रकातील नावाच्या दुरुस्तीसाठी दाखल केलेला अर्ज तब्बल तीन महिने प्रलंबित राहिल्याने सुधागड भूमिअभिलेख कार्यालयाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दाखल करूनही पुढील कार्यवाही न झाल्याने अर्जदाराला निर्णयासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. विशेष म्हणजे, तात्कालीन अधिकाऱ्यांनी अर्जावर आवश्यक कार्यालयीन टिपणी नोंदवून न ठेवल्याने पुढील कार्यवाही रखडल्याचे कार्यालयीन स्तरावर सांगण्यात आले आहे.

पाली येथील सर्वे नं. ९७/१/बी संदर्भात आकारफोड पत्रकातील नाव दुरुस्त करण्यासाठी अर्जदार कानिफनाथ सीताराम तांबे यांनी भूमिअभिलेख उपअधीक्षक, सुधागड-पाली यांच्याकडे अर्ज सादर केला. दि.११ जून सादर केलेल्या अर्जात जमीन मोजणी व आकारफोड पत्रकात 'रेश्मा राजेंद्र मढवी' या नावाऐवजी 'रेश्मा अशोक खंडागळे' असे नाव नोंदविले गेल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा संदर्भ क्रमांक डी.के. ७३३/२०२१ असून, ही नोंद लिपिकीय चुकीमुळे झाल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे.

# दिवेआगरमध्ये ग्रामस्थांना स्मार्ट कार्डचे वितरण

**। बोर्ली पंचतन । प्रतिनिधी ।**

दिवेआगर येथील ग्रामस्थांच्या सोयीसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिरात नोंदणी केलेल्या १८० ग्रामस्थांना स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले.

दि. १३ ऑगस्ट रोजी दिवेआगर येथील ब्राह्मण समाज हॉल येथे स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. नोंदणी केलेल्या ग्रामस्थांना गुरुवार, दि. ३ सप्टेंबर रोजी श्री सिद्धनाथ भैरव मंदिर (पहिली यात्रा), दिवेआगर येथे सकाळी १०.३० वाजता स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले.



या कार्यक्रमाला ग्रामपंचायत दिवेआगरचे सरपंच विजय तोडणकर, ग्रामपंचायत सदस्य निखिल केळसकर, संकेत सोलकर, उद्योजक जितेंद्र पाटील तसेच दिवेआगरचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामस्थांना स्मार्ट कार्ड मिळवून देण्यासाठी प्रणव आनंद हावरे, सदस्य ग्रामपंचायत दिवेआगर यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पात्र ग्रामस्थांना एसटी प्रवासाच्या सुविधांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच, ग्रामस्थांनीही स्मार्ट कार्ड उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजक प्रणव आनंद हावरे यांचे आभार मानले.

# रामवाडी रेल्वे पुलावर भलेमोठे खड्डे

## ■ मुंबई-गोवा महामार्गावरील धोकादायक परिस्थिती
## ■ गणेशोत्सवापूर्वी खड्डे बुजविण्याची मागणी

**। पेण । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील रामवाडी येथील रेल्वे पुलावर भलेमोठे खड्डे पडल्याने वाहनचालक आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या खड्ड्यांमधून वाहने जाताना जोरदार आदळत असून, विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग अत्यंत धोकादायक बनला आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होते. खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांची खोली आणि आकार वाहनचालकांना दिसत नाही. त्यामुळे अचानक खड्ड्यात वाहन आदळून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. रात्रीच्या वेळी तर हा धोका



अधिकच गंभीर बनतो. गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असून, या काळात मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांची मोठी वर्दळ वाढणार आहे. गणपती मूर्ती घेऊन जाणारी वाहने, भाविकांचे वाहनांचे वाढते प्रमाण आणि अवजड वाहतूक लक्षात घेता रामवाडी रेल्वे पुलावरील खड्डे तातडीने बुजविणे अत्यावश्यक आहे. एका बाजूला महामार्गाच्या सुरक्षिततेबाबत मोठमोठे दावे केले जात असताना प्रत्यक्षात महामार्गावरील खड्ड्यांकडे प्रशासन आणि संबंधित ठेकेदाराचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या खड्ड्यांमुळे एखादा मोठा अपघात घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल वाहनचालक आणि प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

# गजानन अटक यांचा जन्मोत्सव साजरा

**कर्जत** : श्रीमंत योगी गजानन अटक यांचा जन्मोत्सव संस्थापक वैष्णवी संस्कार केंद्र दहिवडी शिरसाठ सोमनाथ यांच्या विद्यमाने संपन्न झाला. यानिमित्ताने धार्मिक समारंभांचे आयोजन कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात करण्यात आले होते.यावेळी माजी नगराध्यक्ष वनिता म्हसे, गौतम वैद्य, नानासाहेब टिळेकर, विकास मयेकर, बाबा परळीकर, विजय ठाकूर, आशा अटक, वैभव भोईर, संतोष काबळे, सुधीर काबळे, शरद साळोखे, दीपक अटक, भावना काबंळे, प्रमोद आचार्य, विश्वनाथ पवार, प्रथमेश काबंळे, लिलाताई चंदन, योगिनी कांबळे, पांडुरंग गरवारे, दिलीप काबंळे, प्रसाद पाटील, मधुरा पलंगे, सुचिता वाजंळे, रीना लासुरे, हर्षद पलंगे, जितेंद्र थोरात, वृंदा लासुरे, श्रद्धा थोरात, श्रवण थोरात, प्रचिती पलंगे, अनन्या थोरात आदी उपस्थित होते. याप्रसंगी दत्ता म्हसे, वनिता म्हसे, धनंजय बेडेकर, धनश्री बेडेकर, राजाभाऊ कोठारी यांचा सत्कार करण्यात आला.



●(छायाचित्र : संजय गायकवाड )

पान १ वरून

## ॲंगल अंगावर पडल्याने मृत्यू

रात्री सव्वा दहाच्या सुमारास फुटली. दहीहंडी पाहण्यासाठी सलाऊददीन पठाण व त्यांची पत्नी सलमा पठाण हे दोघे आले होते. दहीहंडीचा कार्यक्रम संपल्यानंतर सलमा या परत घरी जात होत्या. त्याचवेळी स्टेजची कमान उतरविण्याचे काम सुरू होते. कमानीचा लोखंडी ॲंगल सलमा यांच्या अंगावर पडला. त्यात त्या गंभीर जखमी झाल्या. औंध हॉस्पिटल येथे उपचाराकरीता नेत असताना त्यांचा मृत्यू झाला आहे.

## जिल्ह्यात गोविंदांचा उत्साह शिगेला

आल्या होत्या. कोळीवाड्यातून पारंपरिक पद्धतीने मिरवणूकही काढण्यात आली. दरम्यान, गोविंदोत्सवात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासनाकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## मुंबईतील दहिहंडी उत्सवाला गालबोट

पोदारसह अन्य रुग्णालयांमध्ये नेण्यात आले. यापैकी पाच गोविंदांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून ८० गोविंदांवर उपचार सुरू होते. तसेच उपचार केल्यानंतर ३३ गोविंदांना घरी पाठविण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## जुन्या पेन्शनसाठी मूक मोर्चा

ज्या कर्मचाऱ्यांची जाहिरात, नियुक्ती प्रक्रिया १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी झाली आहे, त्यांना जुनी पेन्शन लागू केली आहे. मात्र, केवळ अनुदान उशिरा मिळाले म्हणून खासगी अनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांना डावलण्यात आले आहे. अनुदानाला विलंब हा शासनाचा दोष असून कर्मचाऱ्यांचा नाही, असा आरोप निवेदनातून केला आहे. या धोरणामुळे २५ ते ३५ वर्षे सेवा करूनही अनेक कर्मचारी आज पेन्शनविना हालाखीचे जीवन जगत आहेत. अनेक सेवानिवृत्त शिक्षक पेन्शन न मिळताच मयत झाले असून, त्यांच्या कुटुंबीयांना कुटुंब निवृत्तीवेतनाचाही लाभ मिळालेला नाही. गेल्या १२-१३ वर्षांपासून हे कर्मचारी सातत्याने आंदोलन करत आहेत.

## माथेरानमध्ये युवकाची आत्महत्या

धुके असल्यामुळे सोनू गौतम याची काहीही माहिती मिळत नसल्याने नासिर खान याने माथेरान पोलिसांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर माथेरान पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी सरिता मुसळे यांनी सह्याद्री रेस्क्यू टीम यांना पाचारण करून घेतले. शोध मोहिम सुरू होईपर्यंत अंधार पडल्याने आणि डोंगर रांगेत धुक्याची दुलई पसरल्याने पोलिसांना त्या तरुणाचा शोध घेणे कठीण जात होते. मात्र, रेस्क्यू टीमने तब्बल आठ तास प्रयत्नांची शर्थ करीत १५०० फूट खोल दरीतून ही मोहीम यशस्वी केली. या दुर्घटनेत सोनू गौतम याच्या डोक्याला, हाताला तसेच शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली होती. त्याला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणाची नोंद माथेरान पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत. मात्र, मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## अलिबाग एसटी स्थानक समस्यांच्या गर्तेत

लागत आहे. फलाटावर पाण्याचा निचरा होण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने पावसाचे पाणी साचून राहते. त्यामुळे एसटीची वाट पाहताना प्रवाशांना चक्क साचलेल्या पाण्यात उभे राहावे लागते.

सामाजिक बांधिलकीतून बांधण्यात आलेले स्वच्छतागृहही बंद अवस्थेत आहे. परिसरात अस्वच्छता असून, गवताचे साम्राज्य पसरले आहे. हिरकणी कक्षाच्या बाजूलाही कचऱ्याचा ढिगारा साचला आहे. स्थानकाच्या स्वच्छतेसाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती असतानाही कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यात यंत्रणा अपयशी ठरत असल्याचे दिसून येते.

गणेशोत्सवात अलिबाग स्थानकात नियमित प्रवाशांसह पर्यटकांची मोठी गर्दी होणार आहे. सण काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही स्थानकातील मूलभूत समस्या कायम असल्याने आगार व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानक समस्यांच्या विळख्यात असताना आगार व्यवस्थापक मात्र, या समस्यांबाबत अनभिज्ञ असल्याचा आरोप प्रवासी वर्गातून होत आहे.

## चिमुकलीचा सर्प दंशाने मृत्यू

तिला जिल्हा रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला. त्यानंतर तिला अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले; मात्र, सर्पदंशाची पूर्ण माहिती वेळेत स्पष्ट न झाल्याने उपचारात अडथळा निर्माण झाला. त्यामळे हर्षवी पाटील हिचे निधन झाले.



# हर्ष...उल्हास...थरार...अन् जल्लोष



• (छायाचित्र: समीर मालोदे)





अलिबाग कोळीवाडा गोविंदा पथकाने लावले आठ थर





पोहरादेवी शास्त्रीनगर अलिबाग महिला गोविंदा पथकाने लावले सहा थर









पाचनाका महिला गोविंदा पथकाने लावले पाच थर

(पान १ वरून)

## अलिबागमध्ये मानाच्या दहीहंडीचा थरार

दरम्यान, या दहीहंडी उत्सवाच्या सोहळ्याचा शुभारंभ पारंपारिक ढोल ताशांच्या गजरातून करण्यात आला. त्यातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडले. या सोहळ्याचे उद्घाटन रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील यांच्यासह, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, राज्य महिला आघाडी प्रमुख तथा उपनगराध्यक्षा अ‍ॅड. मानसी म्हात्रे, नगराध्यक्षा अक्षया नाईक, बांधकाम सभापती प्रशांत नाईक, जिल्हा सहचिटणीस अ‍ॅड. गौतम पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, अलिबाग नगरपरिषदेचे पाणी पुरवठा सभापती अनिल चोपडा, महिला व बालकल्याण सभापती डॉ. साक्षी पाटील, उपसभापती अ‍ॅड. अश्विनी ठोसर, वृषाली ठोसर, अ‍ॅड. निलम हजारे, संजना कीर, संतोष गुरव, संध्या पालवणकर, अ‍ॅड. निवेदिता वाघमारे, प्रिया वेलणकर, अजय झुंजारराव, युवराज पाटील, प्रीती झुंझारराव आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत नारळ वाढवून करण्यात आले. यावेळी अवधुत पाटील, नागेश कुलकर्णी, सतिश प्रधान, सर्व आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रशांत नाईक मित्रमंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

हा दहीहंडीचा उत्सव डिजेचा ठेका, दहीहंडी सोहळ्यावर सुमधूर अशी हिंदी मराठी गाणी, विजेचा झगमगाट, शिस्तबद्ध नियोजन, फुलांनी आणि विद्यूत रोषणाईने सजवलेली आकर्षक अशी उंचावरील दहीहंडी, गोविंदा पथकांच्या सुरक्षेसाठी उचलेले पाऊल, गठित केलेल्या समितीचे सभासद जबाबदारीने सांभाळत असलेले काम या सर्वच गोष्टीमुळे वेगळा आनंद देत होता. यावेळी अनेकांनी आपल्या मोबाईलच्या कॅमेरातून दहीहंडीचे छायाचित्र कैद करण्याचा प्रयत्न केला. काहींनी व्हिडीओ तर काहींनी सेल्फी काढून दहीहंडीचे चित्र टिपण्याचा आनंद घेतला.

शेकाप पुरस्कृत अलिबागमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडीचा उत्सव घरबसल्या बघण्याची संधी प्रेक्षकांनादेखील मिळाली. युट्यूबसह केबलवर थेट प्रक्षेपण बघण्याची सुविधा होती. त्यामुळे अलिबागसह वेगवेगळ्या भागातील जिल्ह्यातील नागरिकांनी, मानाची दहीहंडी घरबसल्या पाहण्याचा आनंद लुटला.

**पावसात भिजत लुटला आनंद**

शेकाप पुरस्कृत अलिबागमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मानाच्या दहीहंडीचा शुभारंभ संध्याकाळी झाला. सकाळपासून जिल्ह्यात कडक ऊन होते. त्यामुळे पाऊस कधी पडणार याकडे अनेकांचे लक्ष लागले होते. मात्र, अलिबागच्या दहीहंडीचे उद्घाटन झाल्यावर काही क्षणातच उत्सवाला पावसाने हजेरी लावली. या पावसात भिजत अनेकांनी दहीहंडी उत्सवाचा आनंद लुटला.

४० फूट उंचीवर गोविंदांची विहिरीतील हंडी फोडण्यास झेप | ३४ वर्षांची परंपरेतून गावाची एकजूट

# रायगडच्या कुर्डुसमध्ये दहीहंडीचा अनोखा थरार



| धम्मशील सावंत |
| पाली /बेणसे |

रायगडच्या कुर्डुस गावातून दहीहंडीचा थरारक सोहळा समोर आला आहे. दहीहंडी म्हटलं की डोळ्यासमोर उभा राहतो तो मानवी मनोरा, गोविंदांचा जल्लोष आणि हंडी फोडण्यासाठीची चढाओढ... मात्र अलिबाग तालुक्यातील कुर्डुस गावात दहीहंडी साजरी करण्याची पद्धतच काहीशी वेगळी आणि अंगावर रोमांच उभे करणारी आहे. २५ ते ४० फूट उंचीवर... विहिरीच्या मध्यभागी बांधलेली दहीहंडी... आणि ती फोडण्यासाठी गोविंदांची थेट पाण्यावर झेप हा अनोखा क्षण नजरेत व कॅमेऱ्यात टिपण्यासाठी गर्दी उसळते. कुठलाही मोठा मानवी मनोरा नाही. कठड्यावरून घेतलेली धाडसी झेप... हवेतच हंडी फोडायची आणि त्यानंतर थेट विहिरीच्या पाण्यात उडी घ्यायची... असा हा थरारक प्रकार कुर्डुसमध्ये दरवर्षी पाहायला मिळतो. विशेष म्हणजे, ही केवळ दहीहंडी नाही, तर कुर्डुस गावाच्या एकजुटीची ३४ वर्षांची परंपरा आहे. यंदा ही हंडी हर्ष जीवन पिंगळे या गोविंदाने फोडली.

१९९२ मध्ये देऊळ आळीतील तरुणांनी सुरू केलेल्या या अनोख्या उपक्रमाला आज गावकऱ्यांच्या एकजुटीने मोठं स्वरूप मिळाले. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक वारसा लाभलेला दोनशे-तीनशे घरं असणारा गाव. या गावात अनेक सण-उत्सव सुंदर पद्धतीने साजरे केले जातात. गोपाळकाला म्हणजे दहीहंडी हा उत्सव सुरुवातीला गावातील देऊळ आळी, कातळ आळी, दलाल आळी व सुकट आळी यांचे गोविंदा पथक निश्चित असत. प्रत्येकाच्या अंगामध्ये आपल्या मंडळाची सोंडो बनियन घालून प्रत्येक तरुण गावामध्ये असलेल्या दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न करत असत. प्रत्येक गोविंदा पथक अगदी इर्षेने दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न करत असत. या सणाला कोणताही गावभेद न लावता अत्यंत उत्साहाने दहीहंडी उत्सव कुर्डूस गावात साजरा केला जात आहे. या सर्वांमध्ये सुकट आळीतील गोविंदा पथक नेहमीच आकर्षणाचा ठरत असे. याचे कारण म्हणजे गोविंदा पथकाने काढलेली श्रीकृष्ण, राधा, पेंद्या व गोपिका यांची भव्य-दिव्य बैलगाडीतून केलेली मिरवणूक.सुंदर वातावरणामध्ये सन १९८५ काळात देऊळ आळीतील ध्येयवेड्या तरुणांनी आगळीवेगळी दहीहंडी बांधण्याचा विचार केला.

आळीतील तरुण वर्ग विद्याधर पिंगळे, विकास थळे, मच्छिंद्र पाटील, मोहन पाटील, नरेंद्र पाटील, कैलेंद्र शेरमकर, राजेंद्र थळे, शशिकांत पिंगळे, दीपक थळे, दत्ता पिंगळे, कृष्णा पिंगळे, संतोष थळे व आळीतील सर्व नवतरुणांनी एकत्रित येऊन हा उत्सव त्यावर्षी अतिशय उत्कृष्टपणे साजरा केला. त्यावर्षी दहीहंडी प्रथमच असल्यामुळे या दहीहंडीचा थरार पाहण्यासाठी संपूर्ण पंचक्रोशीतील लोकांचा चांगला प्रतिसाद लाभला. प्रथम दहीहंडी फोडण्याचा मान कांचन केणी यांनी मिळविला आणि पुढे ही हंडी नवनाथ पाटील व संजय थळे यांनी फोडली. त्यानंतर अनेक गोविंदा पथके ही दहीहंडी फोडण्यासाठी येत असतात. ही दहीहंडी सलग सात वर्षे आकाश अंकुश पिंगळे या गोविंदाने फोडली.



# विद्यार्थ्यांना मिळणार पोषक दूध

## • १५ सप्टेंबरपासून संपूर्ण राज्यभरात प्रारंभ • सामाजिक न्याय विभागाचा उपक्रम

| रायगड | प्रतिनिधी |

**राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच त्यांच्या शारीरिक आणि पोषणाच्या आरोग्याची जबाबदारी अधिक सक्षमपणे पेलण्यासाठी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील शासकीय वसतिगृहे आणि निवासी शाळांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती तसेच नवबौद्ध समाजातील हजारो विद्यार्थ्यांना आता दैनंदिन आहारासोबत नियमितपणे सकस व पौष्टिक सुगंधी दूध दिले जाणार आहे.**




या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी येत्या १५ सप्टेंबरपासून संपूर्ण राज्यभरात एकाच वेळी सुरू होत आहे.

यासाठी विभागाने राज्यस्तरीय ई-निविदा प्रक्रिया पूर्ण केली आहे. या निर्णयाचा थेट फायदा राज्यातील ४४९ शासकीय वसतिगृहांमधील सुमारे ४६ हजार ६६३ विद्यार्थ्यांना आणि ९२ शासकीय निवासी शाळांमधील १८ हजार ६०० विद्यार्थ्यांना होणार आहे. म्हणजेच, एकूण ६५ हजारांहून अधिक मुला-मुलींना दररोज २०० मिली सुगंधी दुधाचा थेट लाभ मिळणार आहे. वसतिगृहे आणि निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांना मिळणारे हे दूध आरोग्यदायी आणि सुरक्षित राहावे यासाठी ते विशेष टेट्रा पॅक स्वरूपात पुरवले जाणार आहे.

### २०० मिली दुधाचे टेट्रा पॅक

दुधाच्या वितरणासाठी प्रशासकीय सोयीनुसार राज्याची दोन भागांत विभागणी करण्यात आली आहे. पराग मिल्क फूड्सकडे मुंबई, नाशिक, पुणे आणि लातूर या विभागांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे; तर श्री वारणा दूध संघकडे नागपूर, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर या विभागांची धुरा असेल. हा पुरवठा करार पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी असणार असून २०० मिलीच्या या दुधासाठी प्रति पॅक २६ रुपये ४० पैसे हा दर निश्‍चित करण्यात आला आहे. पुढील तीन वर्षे या दरात कोणतीही वाढ केली जाणार नाही.

### दुधाच्या गुणवत्तेबाबत कठोर अटी व नियम

विशेष म्हणजे, शासनाने या योजनेत दुधाच्या गुणवत्तेबाबत अत्यंत कडक अटी आणि शर्ती घातल्या आहेत. कोणत्याही टप्प्यावर गुणवत्तेत तडजोड झाल्यास अथवा पुरवठादाराने मध्येच सेवा खंडित केल्यास कठोर दंडात्मक व कायदेशीर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. सध्या या वसतिगृहांमध्ये सकाळचा नाश्ता, दोन वेळचे जेवण, अंडी, फळे आणि कॉर्न फ्लेक्स असा आहार दिला जातोच; परंतु आहारात या सुगंधी दुधाच्या समावेशामुळे विद्यार्थ्यांचे खरेच पोषण होणार की, ही योजना कागदावरच राबविली जाईल, याकडे पालकांचेही लक्ष लागले आहे.

# निवडक

## हसूराम पाटील यांना पारितोषिक

**चिरनेर :** अष्टगंध कला मंचाचे प्रसिद्ध लेखक व ज्येष्ठ दिग्दर्शक हसूराम पाटील यांना जेएनपीएने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या विविध कला स्पर्धेत सर्वोत्कृष्ट नाट्य अभिनयाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. जेएनपीएच्या मनीषा जाधव यांच्या हस्ते त्यांना हे मानाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. आगरी हळद या आगरीबोलीतील त्यांच्या नाट्यप्रवेशाचे प्रभावी सादरीकरण परीक्षकांना भावले. बदलत्या काळातली आगरी हळद नवरा नवरीच्या अंगाला लागत नाही तर ती लग्नातील अव्वाच्या सव्वा खर्चातून आई-वडिलांच्या अंगाला कशी लागते. असा सामाजिक संदेश देत, आशय पूर्ण संवादातून व उत्कृष्ट अभिनयातून त्यांनी प्रभावी सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांना प्राप्त झालेल्या सर्वोत्कृष्ट अभिनयाच्या पारितोषकाबद्दल त्यांचे नाट्य क्षेत्राबरोबर सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



## पेण एज्युकेशन पतसंस्थेची वार्षिक सभा



**खरोशी :** पेण एज्युकेशन सोसायटी सेवक सहकारी या पतसंस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार (दि.३०) पेण येथील प्रायव्हेट हायस्कूल येथे पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष धनाजी घरत हे होते. यावेळी ९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने सहकार कायद्यात करण्यात आलेल्या नविन तरतुदीनुसार सभासद प्रशिक्षण आवश्यक करण्यात आले असल्याने संस्थेच्या सभासदांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी सहकार खात्याचे राजेंद्र ढवळे यांनी संस्थेच्या भाग भांडवल सभासद उपस्थिती नफ्याचे प्रमाण ठेवी व कर्ज याविषयी सविस्तर माहिती दिली.व भविष्यात कोणते संभाव्य धोके आहेत या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणानंतर शैक्षणिक वर्षातील गुणवंत विद्यार्थी यांचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, रोख रक्कम देऊन तर शिक्षकांचा शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या सर्व साधारण सभेसाठी पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, प्रायव्हेट हायस्कूलचे उपप्राचार्य पोपटराव भांडवलकर, मुख्याध्यापिका विद्या घरत मुख्याध्यापक व संचालक संतोष जाधव आदी उपस्थित होते.

## श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी

**नागोठणे :** श्री संत शिरोमणी सेना महाराज यांची पुण्यतिथी सालाबादप्रमाणे यावर्षी मंगळवारी (दि. ८) नागोठणे येथील श्री संत ज्ञानेश्‍वर मंदिरात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात येणार आहे. नाभिक समाजाचे मार्गदर्शक भाई टके यांच्या मार्गदर्शनाखाली यानिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यतिथीनिमित्त सकाळी ९ ते ९.३० वाजता कळस पूजन महेंद्र पवार व मानसी पवार यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर सकाळी १० ते ११ वाजता संत सेवा मंडळ नागोठणे पंचक्रोशी यांचे भजन होणार आहे. सकाळी ११ ते १२ वाजता शुभाष महाराज शेळके (सांबरी) यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले असून, हे प्रवचन श्रीनिवास नरेंद्र जाधव यांच्या सौजन्याने होणार आहे. दुपारी १२ ते १ वाजता विद्यार्थी गुणगौरव समारंभ, तर दुपारी १ ते २.३० वाजे दरम्यान महाप्रसाद मनोज मारुती गायकवाड यांच्या सौजन्याने तसेच मिश्रान्न नितीन माने यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ३ ते ५ वाजता महिलांचे विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहेत. सायंकाळी ६ ते ८ वाजता संत सेवा मंडळ नागोठणे यांच्या वतीने हरिपाठ होणार असून, पुष्पहार ॲड. रमेश जाधव यांच्या सौजन्याने देण्यात येणार आहे.




## एसबीआय तर्फे संवाद मेळावा उत्साहात

**पोयनाड :** अलिबाग तालुक्यातील मुशेत येथील ट्रोपिकाना रिसॉर्ट येथे भारतीय स्टेट बँकेच्या आरबीओ पेण विभागाच्या वतीने सूर्यघर योजनेशी संबंधित विक्रेत्यांसाठी विशेष मसूर्यघर व्हेंडर्स कनेक्टफ संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.तसेच स्वयं सहाय्यता महिला गटांचा देखील ह्या मेळाव्यात समावेश करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय स्टेट बँक, मुंबई मेट्रो विभागाच्या मुख्य महाव्यवस्थापक मंजू शर्मा तसेच उपमहाव्यवस्थापक डॉ.राकेश कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सूर्यघर योजनेशी संबंधित सुमारे २० विक्रेत्यांनी व सहाय्यता गटांच्या महिलांनी सहभाग घेतला होता. विक्रेत्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधत आपल्या अडचणी, सूचना तसेच प्रत्यक्ष कामातील अनुभव मांडले.मुख्य महाव्यावस्थापक सौ.मंजू शर्मा यांनी विक्रेत्यांच्या समस्या आणि सूचनांची गांभीर्याने दखल घेत त्यांच्याशी संवाद साधला. तसेच सूर्यघर व्यवसायाला चालना देण्यासाठी विक्रेत्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे कौतुक केले.सूर्यघर विक्रेता संवाद मेळाव्यातून व्यवसायवाढीचा निर्धार करण्यात आला असून व्यवसाय वाढीसाठी विक्रेत्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

## विज्ञान मेळाव्यात हर्षवर्धनचा दबदबा

**तळे :** रायगड जिल्हास्तरीय अखिल भारतीय विज्ञान मेळाव्याचे दिमाखदार आयोजन दर्दमंद अब्दुल्ला मुकादम इंग्लिश स्कूल कांबळे तर्फे महाड येथे करण्यात आले. या विज्ञान महाकुंभात गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर, तळा शाळेचा इयत्ता नववीचा विद्यार्थी हर्षवर्धन पुनम धनंजय पवार याने उत्तुंग यश संपादन केले आहे. त्याने जिल्हा स्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त करून आपली चमकदार कामगिरी सिद्ध केली असून तो आता विभागीय स्पर्धेसाठी पात्र झाला आहे. हर्षवर्धन पवार हा इयत्ता ९ वी मध्ये शिकत आहे. या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील १५ तालुक्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील अंतिम यश मिळवणे सोपे नव्हते. स्पर्धेचा विषय भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७: भवितव्य (संधी) व आव्हाने असा अत्यंत समकालीन व आव्हानात्मक होता. विद्यार्थ्यांचे मूल्यांकन तीन कठीण पायऱ्यांवर करण्यात आले. हर्षवर्धन पवारच्या या कौतुकास्पद यशाबद्दल त्याचे , त्याच्या पालकांचे आणि त्याला मोलाचे मार्गदर्शन करणारे शिक्षक महाडकर यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## विकासकामांचा ‘स्पीड’ वाढविण्याचे महापालिका आयुक्तांचे आदेश

| कळंबोली | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरू असलेल्या विविध विकासकामांना गती देण्याबरोबरच आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्‍वभूमीवर आवश्यक उपाययोजनांचे प्रभावी नियोजन करण्यासाठी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी विभागप्रमुखांची आढावा बैठक घेतली. शुक्रवार, ४ सप्टेंबर रोजी महापालिका मुख्यालयात झालेल्या या बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत आयुक्तांनी विकासकामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या.



बैठकीत ‘आपले सरकार’ तसेच पीजी पोर्टलवर प्राप्त झालेल्या नागरिकांच्या तक्रारींचा आढावा घेण्यात आला. नागरिकांच्या तक्रारी प्रलंबित न ठेवता त्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

आगामी गणेशोत्सव २०२६ च्या पार्श्‍वभूमीवर कृत्रिम विसर्जन तलावांची तयारी, गणेश विसर्जन मिरवणूक मार्गांवरील रस्त्यांची दुरुस्ती, आवश्यक नागरी सुविधा आदींचे नियोजन करण्याबाबतही आयुक्तांनी संबंधित विभागांना सूचना केल्या. दरम्यान, पावसाळ्याच्या पार्श्‍वभूमीवर संभाव्य साथरोगांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले. शहरातील अतिक्रमणे व अनधिकृत होर्डिंगविरोधातील कारवाई तसेच धोकादायक इमारतींबाबत महापालिकेकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

महापालिकेच्या विविध विभागांमध्ये सुरू असलेल्या विकासकामांना अधिक गती देणे, नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करणे आणि गणेशोत्सवाच्या पार्श्‍वभूमीवर आवश्यक नागरी सुविधांचे योग्य नियोजन करण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. त्यामुळे आगामी काळात महापालिका प्रशासनाच्या कामकाजाला अधिक वेग येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पोशीर धरणाच्या कामाला स्थगिती द्यावी



| नेरळ | प्रतिनिधी |

शासनाने बोरगाव येथे पोश्री नदीवर पोशीर धरण बांधण्याचा घाट घातला आहे.त्यामुळे स्थानिक शेतकरी मंडळ संतप्त झाले असून त्यांनी आज अलिबाग येथे जाऊन रायगड जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन धरणाचे काम बंद करण्याची मागणी केली. दरम्यान, वन खात्याने झाडांची मोजणी आणि छाटणी सुरू केली असून उपवन संरक्षक यांना निवेदन देत स्थानिक शेतकऱ्यांच्या परवानग्या घेण्याची जबाबदारी नाही काय? असा सवाल उपस्थित केला आहे.

पोशीर धरण ज्या ठिकाणी होणार आहे त्या बोरगाव येथील शेतकरी मंडळ यांनी रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे आणि उपवन संरक्षक भाऊसाहेब जवरे यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

शेतकरी मंडळाचे वतीने पोशिर धरण प्रकल्पासाठी कोणत्याही वनजमिनीवर वृक्षतोड अथवा इतर कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी आवश्यक असलेल्या सर्व वैधानिक मंजुरी मिळाल्या असल्यास त्यांच्या प्रति देण्यात याव्यात.धरणाची पाणी साठवण आणि पाणीसाठ्यामुळे बाधित होणाऱ्या संपूर्ण क्षेत्राचा अधिकृत नकाशा व तपशील उपलब्ध करून देण्यात यावा.धरणातील पाण्याच्या पातळीमुळे नेमके किती हेक्टर एकर वनक्षेत्र बाधित होणार आहे तसेच त्या क्षेत्रामध्ये किती झाडांची तोड प्रस्तावित आहे. कायदेशीर प्रक्रिया व मंजुरी पूर्ण होईपर्यंत वनक्षेत्रातील वृक्षतोड, झाडे हटविणे अथवा वनक्षेत्र साफ करण्याची कोणतीही प्रत्यक्ष कार्यवाही तात्काळ स्थगित करण्यात यावी. आदिवासी व पारंपरिक वननिवासी नागरिकांचे वनाधिकार, उपजीविका, पारंपरिक वापराचे हक्क व त्यांच्या अस्तित्वाशी संबंधित बाबींचा कायदेशीररीत्या विचार करण्यात यावा.

### ■ प्रकल्पग्रस्त पोहचले जिल्हाधिकारी कार्यालयात

वनक्षेत्रातील वृक्षतोडीसंदर्भात कोणतीही परवानगी यापूर्वी देण्यात आली असल्यास त्यांच्या सत्य प्रति आणि प्रकल्पाबाबत सोशिअल इम्पॅक्ट रिपोर्ट, पर्यावरणीय परिणाम अहवाल, आर्थिक परिणाम होणारा अहवाल, पर्यावरण विषयक जनसुनावणी झाली असल्याचा अहवाल जाहीर करावा आदी मागण्या शेतकऱ्यांनी शासनाकडे केल्या आहेत.

## बोरी नाक्यावर पाण्याची गळती

| उरण | प्रतिनिधी |

उरण-मोरा मुख्य रस्त्यावरील बोरी नाका येथे गेल्या वर्षभरापासून पाणीपुरवठा पाईपलाईनला मोठ्या प्रमाणात गळती लागली असून, दररोज हजारो लिटर शुद्ध पिण्याचे पाणी अक्षरशः रस्त्यावर वाहून वाया जात आहे. विशेष म्हणजे याच ठिकाणी रस्त्याला चढ-उतार असल्याने वाहने वेगाने ये-जा करतात. त्यात रस्त्यावर सतत पाणी वाहत असल्याने तो निसरडा झाला असून अपघाताला निमंत्रण मिळत आहे.

या गंभीर समस्येबाबत उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांना नगरसेविका प्रमिला पवार यांनी लेखी निवेदन देऊन तातडीने लिकेज दुरुस्त करण्याची मागणी केली आहे. बोरी नाका परिसरात पाइपलाइनचे लिकेज इतके मोठे आहे की, काँक्रीटच्या रस्त्याखालूनही मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर येत आहे. त्यामुळे पाईपलाईनमध्ये आतून मोठी गळती असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. एकीकडे नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असताना दुसरीकडे शुद्ध पिण्याचे पाणी हजारो लिटरच्या प्रमाणात रस्त्यावर वाहून जाणे म्हणजे प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्‍नचिन्ह आहे.

सदर रस्त्यावर वाहने मोठ्या वेगाने धावत असल्याने सतत ओला आणि निसरडा झालेला रस्ता दुचाकीस्वारांसाठी विशेष धोकादायक ठरत आहे. याच

### ■ अपघाताचा वाढला धोका!

परिसरात यापूर्वी दोन गंभीर अपघात होऊन तीन व्यक्तींना जीव गमवावा लागल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे आणखी एखादा जीव गेल्यानंतरच नगरपरिषद प्रशासनाला जाग येणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

गेल्या वर्षभरापासून नागरिकांकडून या लिकेजची माहिती देण्यात येत असूनही अद्याप कायमस्वरूपी दुरुस्ती झालेली नाही. त्यामुळे नगरपरिषद प्रशासन नेमके कोणत्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

## मालमत्ता करासाठी बैठकीची मागणी

**खांदा कॉलनी :** पनवेल महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता करासंदर्भातील विविध प्रश्‍नांवर चर्चा करण्यासाठी विशेष सभा आयोजित करण्याची मागणी विरोधी पक्षनेते अरविंद पुंडलिक म्हात्रे यांनी केली आहे. महापालिका सभागृहामध्ये मालमत्ता करासंदर्भात लेखी प्रश्‍न विचारण्यात आले होते. मालमत्ता कर आकारणीचे दर, दंड व शास्ती आकारण्याची पद्धत, निर्णय घेण्याचे अधिकार तसेच संबंधित अधिनियमातील तरतुदी याबाबत सविस्तर चर्चा होणे आवश्यक असल्याची मागणी विरोधी पक्षनेते अरविंद पुंडलिक म्हात्रे यांनी महापौर आणि आयुक्तांकडे केली आहे.

## रस्त्यासाठी जलसमाधी घेण्याचा इशारा

नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील खांडपे-कोंदिवडे या रस्त्यावरील खड्डे तेथील ज्ञान मकरंद शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या एका व्हायरल व्हिडिओने जगासमोर आणले होते. त्यानंतर अगदी दुसऱ्या दिवशी सार्वजनिक विभागाने रस्त्यावरील खड्डे भरण्याची रोलर फिरवण्याची काम केले होते. राज्याच्या मुख्यमंत्री पासून नेत्यांनी या रस्त्याबद्दल सरकारने आपली पाठ थोपटून घेतली होती. दरम्यान अवघ्या काही दिवसांनी अगदी साध्या पावसात या रस्त्यावर पुन्हा खड्डे पडले आहेत.

गणपती उत्सव सुरू होण्यापूर्वी रस्ते खड्डेमुक्त करा, नाहीतर बाप्पाला मांडीवर घेऊन खड्ड्यात बसून आंदोलन करू नदी पात्रात बाप्पाला घेऊन जलसमाधी घेऊ.असून सोमवारी (दि. ७) श्रीराम पुलावर पोलीस मित्र संघटना गणपती बाप्पाला मांडीवर घेऊन रस्त्यावरच ठिय्या आंदोलन करणार आहे.आणि तरीही दखल नाही घेतली,तर बाप्पाला मांडीवर घेऊन नदीपात्रात जलसमाधी घेण्याचा आक्रोश या संघटनेने व्यक्त केला आहे.

## गणेशोत्सवासाठी खांदेश्‍वर पोलिसांची मंडळ पदाधिकाऱ्यांना सूचना

| खांदा कॉलनी | वार्ताहर |

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्‍वभूमीवर खांदेश्‍वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक खांदा कॉलनी येथे घेण्यात आली. गणेशोत्सव शांततापूर्ण, सुरक्षित आणि नियमांचे पालन करून साजरा व्हावा, यासाठी पोलिसांनी मंडळ पदाधिकाऱ्यांना विविध महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.



वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत सुमारे ५० ते ६० गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

गणेशोत्सवासाठी मंडप उभारताना जागा मालक तसेच संबंधित विभागांची आवश्यक परवानगी घेण्याचे आवाहन करण्यात आले. राज्य शासनाने निश्‍चित केलेल्या अटी व शर्तींचे काटेकोर पालन करून मंडप उभारावेत, असे सांगण्यात आले.

गणेशमूर्तींची स्थापना झाल्यानंतर मंडपामध्ये दिवस-रात्र स्वयंसेवकांची नियुक्ती करावी तसेच सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे पोलिसांनी स्पष्ट केले.

ध्वनिक्षेपकांच्या वापराबाबत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. कोणत्याही मंडळाने डीजे, डॉल्बी सिस्टीम तसेच लेझर लाईटचा वापर करू नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

तसेच समाजात तेढ निर्माण होईल किंवा कोणाच्या भावना दुखावल्या जातील असे आक्षेपार्ह देखावे व फलक न लावण्याचे आवाहन करण्यात आले.

**गोकुळधाम सोसायटी सेटला देणार भेट | वर्धापनदिन साजरा करण्याची मिळणार संधी**

# अलिबागचे कदम कुटुंब ठरले विजेता

| अलिबाग | प्रतिनिधी |

**अलिबाग येथील मीरा समीर कदम आणि त्यांच्या कुटुंबाने तारक मेहता का उल्टा चश्माच्या १८व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित लाइव्ह क्विझमध्ये विजेतेपद मिळवले आहे. सोनी सब आणि नीला फिल्म प्रॉडक्शन्स यांच्या वतीने १ ते २१ ऑगस्टदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या १८ दिवसांच्या क्विझमध्ये देशभरातील लाखो चाहत्यांनी सहभाग घेतला.**



टीएमकेओसी क्लब हाऊस ॲपवर आयोजित या लाइव्ह क्विझच्या माध्यमातून चाहत्यांना गोकुळधाम सोसायटी आणि शोमधील लोकप्रिय पात्रांबाबतचे आपले ज्ञान तपासण्याची संधी मिळाली. या उपक्रमाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून, विजेत्यांची घोषणा टप्प्याटप्प्याने केली जात आहे.विजेत्या कुटुंबांमध्ये अलिबागच्या मीरा कदम आणि त्यांच्या कुटुंबाचा समावेश झाला आहे. त्यांना मुंबईतील तारक मेहता का उल्टा चश्माच्या प्रसिद्ध गोकुळधाम सोसायटी सेटला भेट देण्याची, शूटिंगचा अनुभव जवळून घेण्याची तसेच शोच्या कलाकारांसोबत १८ वर्षांचा वर्धापनदिन साजरा करण्याची विशेष संधी मिळणार आहे. शोचे निर्माता आणि क्रिएटर असित कुमार मोदी यांनी क्विझला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आनंद व्यक्त केला असून, मूळ नियोजनापेक्षा अधिक म्हणजे १८ पेक्षा जास्त कुटुंबांना गोकुळधाम सोसायटीला भेट देण्याची संधी देण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. अलिबागच्या कदम कुटुंबाच्या या यशामुळे स्थानिक पातळीवरही या लोकप्रिय शोच्या वर्धापनदिन सोहळ्याची उत्सुकता वाढली आहे, असे चीफ कंटेंट ऑफिसर अजय भालवणकर यांनी बोलतांना आपले मत व्यक्त केले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**६ सप्टेंबर**

१) श्री. सिद्धनाथ काशिनाथ पाटील
अलिबाग, ६-९-१९५३
२) श्री. सतिश काशिनाथ पाटील
अलिबाग, ६-९-१९५५
३) श्रीम. सुषमा लक्ष्मण मुसळे
अलिबाग, ६-९-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

**वाढदिवस साजरा करा अन्नदानाने**

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# वाहतूक पोलिसांची कारवाई

## ● नियमबाह्य वाहने उभी न करण्याचे आवाहन ● नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात धडक तपासणी मोहीम राबविण्यात आली.



पनवेल वाहतूक विभागाचे अधिकारी सुभाष पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी वर्गाने रिक्षाचालकांसह दुचाकी आणि चारचाकी वाहनांची तपासणी केली. वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांवर कठोर कारवाई करण्यात आली.

विशेषतः नियमबाह्य पद्धतीने रिक्षा उभ्या करणे, वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, सिग्नल व इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला.

या मोहिमेत शेकडो वाहनांची तपासणी करण्यात आली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शेकडो वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे.

गणेशोत्सव जवळ आल्याने पनवेल शहरात नागरिकांची तसेच वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. बाजारपेठ, प्रमुख चौक आणि रेल्वे स्थानक परिसरात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन वाहतूक विभाग सतर्क झाला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक हा शहरातील महत्त्वाचा आणि कायम वर्दळीचा चौक असल्याने येथे नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

वाहतूक नियम पाळा, स्वतः ची आणि इतरांची सुरक्षितता जपा, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून नागरिकांना करण्यात आले आहे.

दुचाकी, चारचाकी तसेच रिक्षाचालकांनी वाहन चालविताना नियमांचे पालन करावे, चुकीच्या ठिकाणी वाहने उभी करू नयेत आणि वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी अशा तपासणी आणि कारवाई मोहिमा अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे चित्र पनवेलमध्ये दिसत आहे.



## महिला उद्योजकता शिबिरांतर्गत प्रशिक्षण

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

मनसे महिला सेना आणि रेणुका फाऊंडेशन, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने नागोठणे एसटी स्थानकाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे गुरुवारी (दि.३ ) रोजी महिला उद्योजकता शिबिर अंतर्गत विशेष मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालयाच्या रॅम्प योजनेअंतर्गत नागोठणे शहर व परिसरातील स्थानिक महिलांसाठी हे शिबीर मोफत आयोजित करण्यात आले होते. महिलांनी स्वतःचा रोजगार निर्माण करून स्वतःच्या पायावर उभे राहावे हा या शिबिराचा प्रमुख उद्देश होता.

या शिबिरात डॉ. दिनेश गुप्ता, शितल देवलाळकर, प्रणिता भोसले, मनीषा नगरकर, परेश आंधळे परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या शिबिरात सहभागी झालेल्या प्रत्येक महिलेला सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या शिबिरासाठी साईनाथ धुळे, प्रकाश कांबळे, जगदीश वाघमारे यांचे विशेष सहकार्य मिळाले.

## अनोळखी इसमाचा मृत्यू

**पनवेल :** जेएनपीटी-पनवेल महामार्गावरील जुन्या टोलनाका परिसरात, निलेश ढाब्याजवळ सुमारे ६० वर्षीय अनोळखी इसम जखमी अवस्थेत आढळून आला. त्याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले; उपचारापूर्वीच डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयताची ओळख अद्याप पटलेली नसून, त्याच्याबाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे ८५९१४२४३५० यांच्याशी संपर्क साधावा, असे पोलिसांनी आवाहन केले आहे.

## वावळोली आश्रमशाळेत ‘रानभाज्या महोत्सव’



**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

स्थानिक परिसरात आणि निसर्गात उपलब्ध असणाऱ्या गुणकारी रानभाज्यांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी आणि त्यांचे आरोग्यासाठी असलेले महत्त्व समजावे, या उद्देशाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्या आदेशान्वये अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, वावळोली येथे रानभाज्या महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महोत्सवासाठी परिसरातील रानातून अत्यंत दुर्मिळ, पौष्टिक आणि औषधी गुणधर्म असलेल्या विविध प्रकारच्या रानभाज्या एकत्र करण्यात आल्या होत्या. यामध्ये टाकळा, शेवळा, कर्टुले, माठ, अळू, कुरडू, शेवगा यांसारख्या अनेक पारंपरिक भाज्यांचे स्टॉल्स मांडण्यात आले होते.

महोत्सवादरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना रानभाज्यांची ओळख करून देत, नैसर्गिक आहाराचे मानवी आरोग्यासाठी असणारे महत्त्व पटवून दिले. नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या या भाज्यांमध्ये भरपूर प्रमाणात जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात, ज्यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते,असे प्रतिपादन यावेळी मान्यवरांनी केले.

शाळेतील विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. आपल्या पारंपरिक खानपानाची आणि निसर्गाची ओळख करून देणाऱ्या या अनोख्या उपक्रमाचे विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र लिमये, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

**रसायनी :** नागरिकांच्या डोळ्यांचे आरोग्य जपण्यासाठी प्राईमा रसायनी आणि समर्थ नेत्रालय डोळ्यांचे हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (दि. ६) सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मोहपाडा, रसायनी येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये नागरिकांची अत्याधुनिक कॉम्प्युटरद्वारे नेत्र तपासणी करण्यात येणार असून, गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वाटप तसेच मोफत चष्मे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. समर्थ नेत्रालय डोळ्यांचे हॉस्पिटल लॅटिट्युड अपार्टमेंट, ग्राउंड फ्लोर, शॉप नंबर १, सीबी रोड कॉर्नर, एचडीएफसी बँकेच्या शेजारी, मोहपाडा, रसायनी येथे आयोजित करण्यात आले आहे.

## लायन्स क्लबच्या मोतिबिंदू शस्त्रक्रियेला प्रतिसाद



**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब नागोठणे आयोजित आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, न्यू पनवेल यांच्या सहकार्याने तसेच स्व. शंकरलाल मोदी व स्व. श्रीमती तोफीबाई शंकरलाल मोदी यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र रतनशेठ मोदी यांच्या सौजन्याने बुधवारी (दि. २) सप्टेंबर रोजी बाळासाहेब ठाकरे बालोद्यान, नागोठणे येथे घेण्यात आलेल्या मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ६६ रुग्णांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये १८ रुग्णांना मोतिबिंदू असल्याचे आढळून आले. या रुग्णांना पुढील उपचार व मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी तातडीने पनवेल येथे नेण्यात आले.

लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन विलास चौलकर यांनी लायन्स क्लबच्या विविध समाजोपयोगी उपक्रमांचा आढावा घेतला. या शिबिरास अध्यक्ष विलास चौलकर, प्रकाश जैन, यशवंत चित्रे, सुधाकर जवके, डॉ. अनिल गिते, विवेक सुभेकर, विजय शहासने, दौलतराम मोदी, सुनील कुथे, सखाराम ताडकर, रतन हेंडे, विद्या म्हात्रे, दीपक लोणारी, अनुराधा शहासने, मोहन म्हात्रे यांच्यासह मोठ्या संख्येने रुग्ण व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक सुभेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन विजय शहासने यांनी केले.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ६ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### आर्थिक बाबींकडे लक्ष द्या

**मेष :** हा साप्ताह मेषराशीधारकांना आनंददाई तरीही आपण भिन्नलिंगी संबंध, वैवाहिक जीवन, कौटुंबिक व आर्थिक बाबींकडे अधिक लक्ष द्याल. वैवाहिक जोडीदार आपल्यावर प्रेमाचा वर्षाव करेल. आपण प्रत्येक कार्य दृढ आत्मविश्वास व मनोबलाच्या जोरावर यशस्वीपणे पूर्ण कराल. शासनाकडून किंवा त्यांच्याशी केलेल्या आर्थिक व्यवहारामुळे फायदा होईल. कामात स्पर्धेस सामोरे जावे लागले तरी आपल्या कर्तव्यनिष्ठेमुळे आपण त्यात यशस्वी व्हाल. विद्यार्थ्यांना अभ्यासात चांगली कामगिरी होण्यासाठी नियोजनपूर्वक अभ्यास करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. अडगळीच्या वस्तूंमुळे नकारात्मक ऊर्जा तयार होत असल्याने अभ्यासाच्या खोलीत कोणतीही अडगळ ठेवू नये. नोकरीत सहकाऱ्यांचे सहकार्य मिळू शकेल. **महिलांना** : व्यापार-व्यवसायाचा विस्तार करण्याच्या बाबतीत अधिक विचार करत बसल्यास हाती आलेली संधी गमावून बसाल. उत्तरार्धात काहीतरी नवीन करण्याचे धाडस वाढू शकते. आहाराकडे दुर्लक्ष केल्यास प्रकृतीस त्रास होऊ शकतो. **शुभदिनांक** : ०६,०७.

### व्यवसायात वाढ होण्याची शक्यता

**वृषभ** : नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी वरिष्ठ व सहकाऱ्यांच्या मदतीने आपण प्रगतीची शिखरे सर करू शकाल. हा सप्ताह व्यापाऱ्यांसाठी उत्तम आहे. या आठवड्यात नवीन लोकांशी भागीदारी व्यवसाय सुरु करण्याची किंवा त्यांच्या मार्गदर्शनाखाली किंवा अन्य प्रकारे सहकार्य करून प्राप्तीत वाढ होऊ शकेल अशा एखाद्या कामात आपण सहभागी होऊ शकाल. व्यापाऱ्यांना प्राप्तीत वाढ होण्याची, सध्याच्या व्यवसायाचा विस्तार होण्याची किंवा वसुली होण्याची दाट शक्यता आहे. या पूर्वी कुटुंबियांशी जर काही कारणांनी तणाव निर्माण झाला असला तर तो आता निवळेल. संततीच्या सहवासात वेळ घालवू शकाल. मात्र, त्यांच्याशी संबंधित कार्यात थोडा विलंब होण्याच्या शक्यतेस नाकारू शकत नाही. मित्रांकडून लाभ होईल. **महिलांना** : महिलावर्गाचा वेळ दुसऱ्यांची भांडणे सोडवण्यात जाणार आहे, मात्र अशावेळी सत्याची बाजू घ्या त्यामुले यश प्राप्त होईल, कोणीतरी आपली कानउघडणी करण्याची गरज निर्माण होईल. **शुभदिनांक** : ०८,०९.

### भागीदारी विचारपूर्वक करा

**मिथुन** : राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता सुरुवातीस आपल्यातील संवेदनशीलता वाढलेली असेल. कामाच्या भारामुळे मानसिक थकवा जाणवेल. नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी वरिष्ठांची व सहकाऱ्यांची मानसिकता सहकार्याची न राहिल्यामुळे आपणास नैराश्य येईल. वडिलांना त्रास होईल. भागीदारी संबंधात व कामात विचारपूर्वक वाटचाल करावी व जर शक्य असेल तर कोणत्याही प्रकारचे वाद टाळावे. पैतृक संपत्ती किंवा वडिलांकडून होणाऱ्या प्राप्तीत कपात होऊ शकते. असे झाले तरी निराश होऊ नका. कठीण काळानंतर चांगल्या परिस्थितीचा अनुभव घेता येईल. उत्तरार्धात शारीरिक व मानसिक तजेला व स्फूर्ती जाणवेल. नवीन कार्याच्या शुभारंभासाठी हा महिना अनुकूल आहे. प्रतिस्पर्धी व शत्रूंवर मात करू शकाल. एकंदरीत भाग्यवृद्धीचा काळ आहे. **महिलांना** : आपल्या मनात विविध विचारांचे तरंग उमटतील. कुटुंबात सुख -शांती नांदेल. विवाहेच्छुकांच्या विवाहाचा मार्ग मोकळा होईल. भिन्नलिंगी व्यक्तींप्रती आकर्षित व्हाल. **शुभदिनांक** : ११,१२.

### विचाराची गर्दी करू नका

**कर्क :** या सप्ताहात कर्कराशीधारकाने खाण्यापिण्यातील अतिरेक टाळावा. बहुतांशी आपले आरोग्य उत्तम राहील. जोडीदाराला सूचणाऱ्या कल्पना या प्रगतीची नांदी असेल. कौटुंबिक कार्यक्षमता वाढवा. दैव अनुकूल राहील. स्वतची तब्येत सांभाळून काम करा. मनात विचाराची गर्दी करू नका. मैत्रीच्या नात्यात व्यक्तीगत स्वार्थ साधू नका. सामाजिक कार्यात आपला सहभाग मर्यादित ठेवा. आपल्या वैवाहिक जोडीदाराची मानसिकता हट्ट स्वरूपाची राहील. कुटुंबातील सर्व सदस्यांना जपण्याचा प्रयत्न करा. मानसिक एकाग्रता वाढवून अध्यात्मात मन रमवा. आरोग्य प्रश्नात वेळीच लक्ष घाला. घरात मोठी खरेदी करू शकाल घरात पाहुणे आले तरी आपली धावपळ होऊन देऊ नका. भावंडांविषयी किंतु परंतु मनात ठेवू नका. घरगुती वातावरण आनंदीमय राहील. सांस्कृतिक कार्यक्रमांना तुमचा प्रतिसाद राहील. आध्यात्मिक जीवनात दिव्य अनुभूती येईल. **महिलांना** : तब्येतीत सुधारणा होईल. विवाहितांच्या जीवनात दीर्घकाळापासून काही तणाव असल्यास त्याचे सुद्धा निराकरण होईल. **शुभदिनांक** : ७,१२.

### नकारात्मक विचार काढून टाका

**सिंह** : राशीसाठी या सप्ताहात विदेशाशी व्यापार करणाऱ्यांना किंवा विदेशी संस्थेत काम करणाऱ्यांना अतिरिक्त प्राप्ती होईल. हा कालावधीत शारीरिक व मानसिक दृष्ट्या आपण ताजेपणा व प्रसन्नतेचा अनुभव घ्याल. कुटुंबीय व मित्रांच्या सहवासात स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेण्याचा आनंद उपभोगू शकाल. मनातून नकारात्मक विचार काढून टाकल्यास आपला आनंद द्विगुणित होऊ शकेल. विद्यार्थ्यांनी मित्रांबरोबर फिरणे कमी करून अभ्यासाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच त्यांच्यासाठी खर्च सुद्धा करावा लागेल. विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. आर्थिक लाभासाठी श्री सुक्त वाचने गरजेचे आहे, हा साप्ताह व्यवसायात आपण नवीन विचारसरणी आत्मसात कराल किंवा नवीन सुरवात कराल. **महिलांना** : कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घेणे हिताचे राहील. आपण वहान चालवत असाल तर काळजी घेऊन ते चालवा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड राहील. **शुभदिनांक** : ०६,१०.

### इतरांकडून मार्गदर्शन घ्या

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता भविष्यात मोठे आजारपण येऊ नये म्हणून सामान्य आजाराकडे दुर्लक्ष करू नये. योग्य प्रमाणात झोप घेऊन तसेच योगासन, ध्यान-धारणा आदी प्रवृत्तीत मन रमवून आपण तणावमुक्त होऊ शकाल. विद्यार्थ्यांना अभ्यासात लक्ष लागत नसल्याची तक्रार असेल तसेच सध्या अतिरिक्त कष्ट करण्याची तयारी ठेवावी लागेल. आपल्याला अधून-मधून इतरांकडून मार्गदर्शन घेण्याची सुद्धा गरज भासेल. आपण जर आहारातील अतिशयोक्ती टाळलीत तरच आरोग्य चांगले राहू शकेल. उत्तरार्धात कफ विकार होण्याच्या शक्यतेमुळे बदलत्या ऋतूत आपणास काळजी घ्यावी लागेल. आपल्या नियोजनात अचूकपणा असेल तर कर्जफेड उत्तम प्रकारे कराल. सामाजिक क्षेत्रात काही चांगल्या घटनांमुळे आनंद वाढता राहील. कौटुंबिकदृष्ट्या शुभ गोष्टींचा ओघ राहील. **महिलांना** : स्वतचे आरोग्यतंत्र सांभाळणे आवश्यक ठरेल. स्थावर मालमत्तेचे नियोजन करताना कागदपत्रांची नीट तपासणी करा. भावंडांची जबाबदारी पार पाडावी लागेल. सांस्कृतिक कार्यक्रमाची गोडी वाढेल. **शुभ दिनांक** : ७,११.

### योग साधनेला महत्त्व द्या

**तुळ** : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता घरातील वृद्ध व्यक्तींच्या तब्येतीत सुधारणा होईल. योग साधनेला महत्त्व द्या. शारीरिक ताकद अजमावून पाहू नका. नंतर संधि मिळणार आहे फक्त थोडा संयम ठेवा. मित्रां-मैत्रणीसोबत किरकोळ कुरबुरीना मोठ्या स्वरूपात वाढवू नका. वैवाहिक जीवनात मनासारखे वातावरण राहील. आहारावरील नियंत्रण सोडू नका. प्रकृती जपा. एक दिवस तरी आपल्या पूर्वजांना स्मरण करून तो दिवस त्यांच्यासाठी देणे आपल्यासाठी हितकारक असेल. भागीदारी संबंधात आपला अहंकार बाजूस सारावा लागेल. प्रियव्यक्तीच्या सहवासाने आनंदित व्हाल. आजवर केलेल्या कामामुळे यश व कीर्ती यात वाढ होऊन आणखी काही करण्याचा उत्साह निर्माण होईल. **महिलांना**: आपल्या आत्मविश्वासात वाढ होईल. पाहुणे व मित्रांसह भोजनाचे आयोजन होऊ शकेल. नवीन वस्त्रालंकार व वाहन खरेदी करू शकाल. उत्तरार्धात आपल्या आरोग्यात उल्लेखनीय सुधारणा होऊन चेहेऱ्यावर त्याचे तेज दिसून येईल. **शुभदिनांक** : ०८,०९.

### अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता कलाकारांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळणारा कालावधी आहे. एखादा सत्कार ही होण्याचा संभव आहे. प्रवासाचे योग संभवतात. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे, म्हणजे इतरांची नाराजी होणार नाही. आपल्या मित्र परिवारात भिन्नलिंगी व्यक्तींची वाढ होण्याची शक्यता आहे. आरोग्याच्या बाबतीत आपणास काळजी घ्यावी लागेल. आपल्या स्वभावातील हेकेखोरपणावर मात्र प्रतिबंध करा. थोड हट्टीपणा बाजूला ठेऊन जोडीदाराच्या मनाप्रमाणे वागा. घरातील वातावरण बदलून जाईल एखादे शुभ कार्य करण्याबाबत ठरवले जाईल. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्याव लागेल घरात काही किमती वस्तूची खरेदी कराल शुभ मनोरंजनामध्ये जागरण टाळणे हितावह आहे. **महिलांना** : बाहेर पडताना तब्बेतीची पूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे. थंड पदार्थ अजिबात घेऊ नये त्या पासून लांब राहणे उत्तम ठरेल. महिलावर्गाने संततीच्या आरोग्याची काळजी घ्या. महिलावर्गाने पैशाच्या बाबतीत अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. **शुभदिनांक** :०७,१०.

### पैशांची आवक वाढण्याची शक्यता

**धनु :** राशीसाठी या सप्ताहाच्या पूर्वार्धात आपणास पत्नी, संतती, वडीलधारी व मित्र परिवाराकडून सुखद बातम्या मिळण्याची किंवा त्यांच्यामुळे काही फायदा होण्याची शक्यता आहे. कुटुंबियांकडून एखाद्या महागड्या वस्तूंची भेट मिळण्याची अपेक्षा बाळगू शकता. या कालावधीत कोणत्याही बौद्धिक प्रतिभेशी संबंधित कार्ये, चर्चा आदी दरम्यान थोडी काळजी न घेतल्यास आपणास खोटे ठरविण्यात येण्याची किंवा आपल्या हातून चुकीचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. आपली विश्लेषण शक्ती मंदावल्यामुळे जेथे बुद्धीची नाही तर श्रमांची गरज असेल अशा गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे. उत्तरार्धात सरकारी व कायदाविषयक कारणांसाठी खर्च होऊ शकतो. आपली प्रतिमा मलीन होईल अशा कार्यापासून दूर राहावे. सध्या कोणास जामीन राहू नये. बँकेत सुद्धा कोणास जामीन राहू नका. घरगुती संबंधातील अत्युच्य आनंद उपभोगू शकाल. **महिलांना** : उत्तरार्धात भिन्नलिंगी व्यक्तीशी खूप जवळीक साधू शकाल. पैशांची आवक वाढणार आहे. घेशील किती दोन्ही करांनी दुबली माझी झोळी असा अनुभव येईल. **शुभ दिनांक** : ०६,०९.

### धार्मिक कार्यात सहभागी व्हा

**मकर** : हा मकरराशीसाठी या साप्ताहाच्या पूर्वार्धात व्यावसायिक आघाडीवर आपल्या कामांना गती येईल. आपल्या शब्दांचे मोल वाढेल. जी स्वप्ने मागील दिवसांत बघितली असतील ती आता प्रत्यक्षात येतील. आपल्या अंतर्ज्ञानात व कल्पनाशक्तीत भर पडेल. आपण आशावादी व सकारात्मक वृत्तीचे आचरण कराल. काही वेळा आपली गती मंदावली गेली तरी आपल्या वाटचालीत व निर्णयात ठामपणा नक्कीच राहील. आपणास नवीन व चांगल्या कार्याकडे लक्ष द्यावेच लागेल. आपण गृहस्थ जीवनास सुद्धा योग्य महत्व देऊन त्यानुसार वाटचाल करण्याची तयारी ठेवाल. उत्तरार्धात कुटुंबाप्रती आपला कल वाढत असल्याचे दिसून येईल. उत्तरार्धात आपली मनोरंजनाची इच्छा प्रबळ होईल. सामाजिक किंवा धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. समाजाप्रती आपले ऋण चुकविण्यासाठी आपण सक्रिय व्हाल. प्रणयी जीवनात पुढील वाटचाल करण्याची किंवा नवीन संबंधांची सुरवात होण्याची शक्यता आहे. **महिलांना** : या साप्ताहात आपले प्राधान्य हे आपल्या कामांनाच असेल. कामाशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपण कष्ट कराल. **शुभ दिनांक**- १०,१२,

### फिरण्यास जाण्याचे नियोजन करा

**कुंभ** : या सप्ताहातील ग्रहमान पाहता कौटुंबिक आघाडीवर एखाद्या व्यक्तींशी आपल्या वागणुकीत उग्रता दिसून येईल. वाणी व वर्तनात काठिण्य राहील, तेव्हा काळजी घ्यावी. कोणत्याही बाबतीत हट्ट सोडण्याचा सल्ला देण्यात येत आहे. हे सर्व आपण कुटुंबाप्रती अति संवेदनशील झाल्यामुळेच होणार असले तरी आपल्या भावना समजून घेण्यास कुटुंबियांना थोडा वेळ लागेल. त्यांच्या खुशीसाठी आपण वाहन, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा अन्य एखादी मोठी वस्तू खरेदी करण्याची शक्यता आहे. त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सध्या व्यावसायिक आघाडीवर सुद्धा अतिरिक्त परिश्रम कराल. संबंधात थोडी काळजी घ्यावी लागेल. विशेषतः जे आधी पासूनच प्रेमसंबंधात आहेत त्यांना प्रियव्यक्तीशी संबंधित एखाद्या बाबतीत सतत काळजी वाटेल. सध्या आर्थिक बाबतीत आपणास थोडी अनिश्चितता जाणवेल. **महिलांना** : संततीकडून खुश खबर मिळणार आहे. लांब फिरण्यास जाण्याचे नियोजन केल जाईल तीर्थयात्रा करण्यास हरकत नाही बारीकसारीक दुखण्याचा बाऊ करणे टाळा. **शुभ दिनांक** : ८,११.

### मनांची एकाग्रता वाढवा

**मीन :** राशीसाठी हा साप्ताहात पाहता उत्तरार्धात हृदयाच्या ठोक्यांची अनियमितता, पाठदुखीचा त्रास संभवतो. पूर्वार्धात विद्यार्थ्यांचा अभ्यास उत्तम झाला तरी उत्तरार्धात कोणत्याही विषयाचे खोलवर अध्ययन करण्यासाठी अधिक कष्ट करण्याची तयारी ठेवावी लागेल. नवीन मैत्री करताना सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. नवीन व्यवसायात कामाची गोडी लागल्याने उत्तरार्धात त्याचे चांगले परिणाम मिळू शकतील. आपणास प्रोत्साहित करणाऱ्या घटकांना जाणून घ्या व मग त्यांचा अवलंब करा. आर्थिक बाजू ठीक राहील. शेतीविषयक कामकाजांना चालना मिळेल. संतातीच्या प्रकृतीबाबत आपण अधिक दक्ष राहा, डॉक्टरचा सल्ला घ्या. व्यापाऱ्यांना दूरवरचे सौदे प्राप्त होण्याची शक्यता आहे. जे मुद्रण, रसायन, औषधे, शासकीय कार्य किंवा कंत्राट इत्यादींशी संबंधित आहेत त्यांना उत्तरार्ध अधिक फलदायी होऊ शकेल. **महिलांना** : व्यापक विचार केल्यास मनांची एकाग्रता वाढवावी लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रियजनांसह बाहेर फिरावयास जाण्याचे तसेच भोजनाचे आयोजन करू शकाल. **शुभ दिनांक** : ०९,११.

# सावंतवाडी 'पॅसेंजर'चा उशीर
# पालघर-डहाणूकरांचे हाल



। महाड । प्रतिनिधी ।

रोजगाराच्यानिमित्ताने महाडसह कोकणातून वसई, नालासोपारा, विरार आणि पालघर परिसरात स्थलांतरित झालेल्या शेकडो कोकणवासीयांना सध्या प्रवासाच्या भीषण रेल्वे वाहतूक समस्येला सामोरे जावे लागत आहे. मुंबईत घरांचे दर गगनाला भिडल्यामुळे अनेकांनी पश्चिम रेल्वेवरील नायगाव, वसई, विरार डहाणू पट्ट्यात आपले वास्तव्य हलवले आहे. मात्र, या भागातून कोकणात ये-जा करण्यासाठी थेट रेल्वे सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना मध्य रेल्वेचे दादर, पनवेल किंवा दिवा स्थानक गाठावे लागते. मुख्यत्वे नायगाव वसई विरार पालघर-डहाणू पट्ट्यातील शेकडो प्रवासी पनवेल स्थानकातून जोडणाऱ्या गाड्यांचा वापर करतात. मात्र, योग्य समन्वयाच्या अभावामुळे प्रवाशांचा प्रचंड वेळ, पैसा आणि मानसिक ऊर्जा वाया जात आहे.

गावाहून परतताना महाड तालुक्यातील सापे-वामने, विन्हेरे, वीर रेल्वे स्टेशन परिसरासह कोकणवासीय प्रामुख्याने ५०१०६ सावंतवाडी रोड - दिवा पॅसेंजरवर अवलंबून असतात. वेळापत्रकानुसार ही गाडी सायंकाळी ७:०५ वाजता पनवेल, तर ८:१० च्या सुमारास दिव्याला पोहोचणे अपेक्षित असते. मात्र, कोकण रेल्वेच्या एकेरी मार्गावरील तांत्रिक अडचणी आणि गाड्यांच्या क्रॉसिंगमुळे ही ट्रेन बहुतांश वेळा तासनतास उशिराने धावते.

सावंतवाडी पॅसेंजर वेळेत न पोहोचल्याने पनवेलवरून पश्चिम भागात रेल्वेच्या दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे पुढील सर्व नियोजित रेल्वे कनेक्शन पूर्णपणे विस्कळीत होते.

दुसरीकडे, मध्य आणि पश्चिम रेल्वेला जोडणारी ६९१६१ पनवेल - डहाणू रोड मेमू ही गाडी पनवेल स्थानकातून सायंकाळी ६:५० वाजता सुटते. म्हणजेच ही मेमू गाडी सावंतवाडी पॅसेंजर पनवेलला पोहोचण्याच्या १५ मिनिटे आधीच निघून जाते. त्यातच पॅसेंजरच्या नेहमीच्या विलंबामुळे डहाणुकडे जाणाऱ्या प्रवाशांची ही एकमेव सोयीची गाडी हमखास चुकते. परिणामी, प्रवाशांना दिव्याहून दादर किंवा पनवेल-कुर्ला-दादर असा ३ ते ४ टप्प्यांत लोकलचा वळसा घालावा लागतो. हातात सामान, सोबत वृद्ध आणि लहान मुले असताना ऐन गर्दीत गाड्या बदलताना प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत.

या गंभीर समस्येवर तोडगा म्हणून सावंतवाडी-दिवा पॅसेंजर पनवेलला आल्यानंतरच पनवेल -डहाणू रोड मेमू सोडण्यात यावी, अशी आग्रही मागणी केली जात आहे. मध्य, पश्चिम आणि कोकण रेल्वेने आपापसातील समन्वय वाढवून ६९१६१ पनवेल-डहाणू मेमूच्या वेळेत १५ ते २० मिनिटांचा बदल करावा, तसेच दिवा व पनवेल स्थानकातून पालघर-डहाणूसाठी अतिरिक्त मेमू फेऱ्या सुरू कराव्यात, अशी आग्रही मागणी जोर धरत आहे. आता रेल्वे प्रशासन यावर कधी निर्णय घेणार, याकडे कोकणवासीयांचे लक्ष लागले आहे.

## दुचाकीची चोरी

**पनवेल :** एमएमओआरडी इमारतीच्या पार्किंगमधून अज्ञात चोरट्याने हिरो कंपनीची दुचाकी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उमेश सेनी (वय ३०) यांनी इमारतीच्या पार्किंगमध्ये उभी केली होती. दुसऱ्या दिवशी दुचाकी पाहिली असता ती पार्किंगमध्ये आढळून आली नाही. चोरीस गेलेली दुचाकी हिरो कंपनीची, असून तिचा क्रमांक यूके ०६ बीएच ०५२५ असा आहे.

## तळा तालुक्यात दहिहंड्यांचा थरार

। तळा । प्रतिनधी ।

श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त तळा शहरासह संपूर्ण तालुक्यात गोपाळकाला अर्थात दहिहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. तळा शहरातील रोहिदास नगर, बाजारपेठ, जोगवाडी, भोईर वाडी, मुंढ्याची वाडी, फोंडळ वाडी, तसेच पुसाटी, वडाची वाडी, कुंभार आळी आदी परिसरात सकाळपासूनच गोविंदा पथकांची लगबग दिसून आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि गोविंदा रे गोपाळाच्या जयघोषात तरुणांनी



दहिहंडी फोडण्यासाठी एकच गर्दी केली होती.तालुक्यातील विविध वाड्यांनी आकर्षक बक्षिसांच्या दहिहंड्या लावल्या होत्या. गोविंदा पथकांनी मानवी मनोरे रचून या दहिहंड्या फोडत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी लहान मुलांच्या बालगोपालांच्या दहिहंड्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तळा पोलीस ठाण्याच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस ठिकठिकाणी तैनात होते. संपूर्ण तालुक्यात गोपाळकाला उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडला असून, या उत्सवामुळे तळा शहरात सणाचे वातावरण निर्माण झाले होते.



## बी. एस. पाटील स्कूलमध्ये दहीहंडी

। चिरनेर। प्रतिनिधी ।

बी. एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, विंधणे येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना दहीहंडी उत्सवाचे महत्त्व तसेच विविध सण-उत्सवांची माहिती मिळावी. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत नृत्य आणि गायनाचा आनंद घेतला. श्रीजा जोशी यांनी भगवान श्रीकृष्णाच्या भजनावर सुंदर नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

यावेळी मितांश पाटील, अदिर्थ म्हात्रे, आर्य माळी, क्रियांश नाईक/नवाले, शौनक पाटील, आराध्या थळी यांनी श्रीकृष्णाच्या वेशभूषेत सहभाग घेतला.

तसेच आयेशा नवाले, दिशिका नवाले, साध्वी घरत, कायरा शेलके, द्विजा भोईर, दिव्यांका पाटील, दिव्यांशा पाटील, प्रिन्सिका कोळी, प्रिशा पाटील, आरुष्का कांबळे, इफा शेख, अनुष्का भारती गौतम, मायरा चिट्टमपल्ले, श्रीजा जोशी, क्रिषा ठाकूर, कियारा म्हात्रे, सिया म्हात्रे, काव्या वैष्णव, भाविका वैष्णव आणि रुत्वी सारगे यांनी राधेच्या वेशभूषेत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडून उत्सवाचा आनंद घेतला. संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि सणांचे महत्त्व समजण्यास मदत झाली.

## खारघर अग्निशमन दलाच्या जवानांचा गौरव

। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघर येथील डोंगरावर अडकलेल्या २१ वर्षीय तरुणाचे अत्यंत खडतर परिस्थितीत रेस्क्यू ऑपरेशन करून प्राण वाचविणाऱ्या सिडको अग्निशमन दलाच्या खारघर अग्निशमन केंद्रातील अधिकारी आणि जवानांच्या शौर्याची दखल घेण्यात आली आहे. आपत्कालीन सेवेत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल मुंबईतील प्रसिद्ध ताज हॉटेलमध्ये आयोजित कार्यक्रमात खारघर अग्निशमन केंद्रातील अधिकारी व जवानांना सेफ इंडिया ब्रेव्हरी अवॉर्ड्स २०२६ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आगीसारख्या भीषण दुर्घटना अथवा आपत्तीच्या काळात स्वतः चा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचविण्याचे अत्यंत कठीण आणि जोखमीचे काम अग्निशमन दलाचे जवान करीत असतात. त्याचाच प्रत्यय २४ ऑगस्ट रोजी खारघर डोंगरावर आला. यावेळी एक २१ वर्षीय तरुण डोंगरावर अडकून पडला होता. घटनास्थळाची अवघड भौगोलिक परिस्थिती आणि आव्हानात्मक वातावरण असतानाही अग्निशमन दलाच्या पथकाने धाडसाने रेस्क्यू ऑपरेशन सुरू केले. अथक प्रयत्नांनंतर तरुणाला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आणि त्याचे प्राण वाचविण्यात जवानांना यश आले. या शौर्यपूर्ण आणि कौशल्यपूर्ण बचावकार्याची दखल घेत खारघर अग्निशमन दलाच्या पथकाला मुंबईतील ताज हॉटेलमध्ये आयोजित कार्यक्रमात "Best Fire Fighter Rescuer' पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्र अग्निशमन सेवा आणि आपत्कालीन सेवा संचालक संतोष वारिक यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी सिडकोचे मुख्य अग्निशमन अधिकारी विजय राणे, आशिष दळवी, सुरज पाटील, अजय वाघ, प्रीतम पाटील, निलेश मढवी, प्रथमेश गोसावी यांचा सन्मान करण्यात आला.


### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी यांचे द्वारे पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलद्वारे ई-निविदा प्रक्रियेतून खुली निविदा एकल पाकिट बोली प्रणाली आमंत्रित करण्यात येत आहे : **कामाचे नाव**: महाराष्ट्र राज्यातील कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रातील कणकवली आणि कुडाळ स्थानकांवरील प्लॅटफॉर्म क्र. 1 व 2 वर (लिफ्ट) सिव्हिल व्हर्टिकल शाफ्ट स्ट्रक्चरची तरतूद. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डीवायसीईडब्ल्यू-लिफ्ट-22-2026 दिनांक: 07.09.2026. एकूण अंदाजित किंमत**: रु. 1,39,85,739.05 (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख**: 14.09.2026. **बंद होण्याची तारीख/वेळ**: ऑनलाइन प्रस्ताव/बोली सादर करण्यासाठी 28.09.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्णत्वाचा कालावधी**: 6 महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील / सहभागासाठी कृपया **https://www.ireps.gov.in** वेबसाइट पहावी आणि शुद्धिपत्र / परिशिष्ट केवळ याच वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की आमचे आशिलांनी खालील वर्णनाची मिळकत जमीन सदर मिळकतीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी घेण्याची ठरविलेली आहे. सदरहु जमीन ही सदर जमीनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटींस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नांवे आहे त्या मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-तिघर तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील मिळकत.**

| जमीन मालकाचे नांव | गावाचे नांव | सर्व्हे/ हिस्सा नंबर | क्षेत्र - हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| श्री.मंगळ सखाराम देशमुख रा-मुद्रे खुर्द, तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड. | तिघर | ४७/७/क | ०-१४-०० |

तरी वरील प्रमाणे मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, साठे करार, ताबा, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षिस भाडेपट्टा, बोजा, जप्ती कुळवहिवाट, इजमेंट, चार्ज, मृत्युपत्रांकित, दान, लिज, लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असलेस संबधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आंत खाली सही करणार यांजकडे सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबधी कोणाचेही हक्क हितसंबध नाहीत असे गृहित धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतीचा खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करु मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली.

दिनांक -०६/०९/२०२६

सही/-
**ॲड.अविष्कार अरुण अभंगे**
रा-नेमीनाथ हाईट्स्, मुद्रे बुद्रुक.
तालुका कर्जत, जिल्हा - रायगड,
मोबाईल नंबर-८०८७३४९०१८



### जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे वाकस ता. कर्जत जि. रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

**मौजे वाकस ता. कर्जत जि. रायगड**

| स.नं. | हि.नं | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ७२ | ५ | ०-२१-००<br>पो.ख ०-०१-००<br>एकुण क्षेत्र ०-२२-०० | ०.३३ |

वर वर्णन केलेल्या मिळकती श्री गंगाधर कारभारी जाधव यांच्या ताबेकब्जातील व वहिवाटीखालील जमिन मिळकती आहेत. सदरची मिळकतीचा विक्री व्यवहार करायचा आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण
दिनांक : ०६/०९/२०२६

**ॲड. हिरामण जनार्दन गायकवाड**
ऑफिस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा.
युको बँक शेजारी ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१
८९७६३७५५७०



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती त्या मिळकतींचे मालक पांडुरंग गंगाराम बडे यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २४ | २ | ०.०२.०० | ०.०५ |
| २४ | ३ | ०.१७.२० | ०.३० |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/०९/२०२६

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड -४१०२०१.



### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-वरंडे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील पुढील वर्णनाची मिळकत आमचे आशिल श्री.संकेत गोविंद राऊत यांनी खरेदी घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन : -**

| गाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे.वरंडे, ता.अलिबाग, जि.रायगड | १२८ | क्षेत्र. ०-२३-८०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकुण ०-२५-३० | ५.५८ |

तरी वरील जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०५/०९/२०२६

सही/-
**ॲड. सौ. गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्या वर
जिल्हा न्यायालयासमोर अलिबाग-रायगड
मो नं. ९२७१७७५२७७



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस व संबंधितांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आम्ही आमचे अशील श्री. अनंत बाबुराव बोंबे यांच्या सुचनेवरून व सांगण्यावरून खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचे (ज्यास पुढे सदर मिळकत असे संबोधले आहे) मालकी हक्क, अधिकार, शीर्षक (Title) ) व हितसंबंधाची कायदेशीर तपासणी करत आहात.

सदर मिळकतीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटूंब, कंपनी, बँक, वित्तीय संस्था, बिगर बॅकींग वित्तीय संस्था, संस्था, कर्जदार, शासन किंवा स्थानिक प्राधिकरण, अथवा इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बक्षीसपत्र, बोजा, गहाण, लीज, भाडेपट्टा, ताबा, कुलमुखत्यारपत्र, खरेदीखत, करार, सामजस्य करार, अदलाबदल, भागीदारी, कौटुंबिक व्यवस्था/वाटणी, वाद/न्यायालयीन खटला (lis pendens) आरक्षण, संपादन, अधिग्रहण प्रक्रिया, देखभाल हक्क, वारसाहक्क, रस्ता हक्क, हिस्सा, पोट भाडेकरू, ताबा हक्क, मृत्युपत्र, ट्रस्ट अथवा कोणत्याही न्यायालय/प्राधिकरणाच्या आदेशान्वये किंवा कराराव्दारे कोणताही दावा, आक्षेप, अधिकार, किंवा मालकी हक्काच्या कागदपत्रांचा ताबा असल्यास अशा सर्व व्यक्ति व संस्थांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत आपल्या दाव्याच्या / आक्षेपाच्या समर्थनार्थ आवश्यक त्या मुळ अथवा साक्षांकित कागदोपत्री पुराव्यांसह खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाचेही आक्षेप वा दावे प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार वा दावा नाही किंवा असल्यास तो सोडून (Waive) दिला आहे असे मानले जाईल. त्यानंतर आमच्या अशिलांचे सदर जमिनीवरील मालकी हक्क व शीर्षक पुर्णपणे स्वच्छ, निर्वेध व विक्रीयोग्य (Clear, Marketable & free from encumbrances) आहे असे समजून पुढील व्यवहार पुर्ण केला जाईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्यांची अथवा आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही .

**मिळकतीचा तपशिल** (SCHEDULE OF THE PROPERTY )

मौजे माणगाव तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि.रायगड, ग्रुप ग्रामपंचायत माणगाव हद्दीतील जमीन मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे

| सर्व्हे नंबर./ हिस्सा नंबर. | जुना सर्व्हे नंबर. / हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्र. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ८३/१/क | ९८/१/क | ०.४३.०० | १.७० |

ठिकाण कर्जत
दिनांक ०५.०९.२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
पत्ता मु.पो.चिंचवळी ता.कर्जत
जि. रायगड
ई मेल: ubhagat 79@gmail.com
मो.नं.९०४९४८६८०५



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस व संबंधितांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आम्ही आमचे अशील श्री. अरूण प्रेमचंद मेहरा व श्री. अर्पीत मेहरा यांच्या सुचनेवरून व सांगण्यावरून खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचे (ज्यास पुढे सदर मिळकत असे संबोधले आहे) मालकी हक्क, अधिकार, शीर्षक (Title) व हितसंबंधाची कायदेशीर तपासणी करत आहात.

सदर मिळकतीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्ति, हिंदू अविभक्त कुटूंब, कंपनी, बँक, वित्तीय संस्था, बिगर बँकींग वित्तीय संस्था, संस्था, कर्जदार, शासन किंवा स्थानिक प्राधिकरण, अथवा इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बक्षीसपत्र, बोजा, गहाण, लीज, भाडेपट्टा, ताबा, कुलमुखत्यापत्र, खरेदीखत, करार, सामंजस्य करार, अदलाबदल, भागीदारी, कौटूंबिक व्यवस्था/वाटणी, वाद/न्यायालयीन खटला (lis pendens) आरक्षण, संपादन, अधिग्रहण प्रक्रिया, देखभाल हक्क, वारसाहक्क, रस्ता हक्क, हिस्सा, पोट भाडेकरू, ताबा हक्क, मृत्युपत्र, ट्रस्ट अथवा कोणत्याही न्यायालय/प्राधिकरणाच्या आदेशान्वये किंवा कराराद्वारे कोणताही दावा, आक्षेप, अधिकार, किंवा मालकी हक्काच्या कागदपत्रांचा ताबा असल्यास अशा सर्व व्यक्ती व संस्थांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत आपल्या दाव्याच्या/ आक्षेपाच्या समर्थनार्थ आवश्यक त्या मुळ अथवा साक्षांकित कागदोपत्री पुराव्यांसह खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे.

जर वरील मुदतीत कोणाचेही आक्षेप वा दावे प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार वा दावा नाही किंवा असल्यास तो सोडून (Waive) दिला आहे असे मानले जाईल. त्यानंतर आमच्या अशिलांचे सदर जमिनीवरील मालकी हक्क व शीर्षक पुर्णपणे स्वच्छ, निर्वेध व विक्रीयोग्य (Clear, Marketable & free from encumbrances) आहे असे समजून पुढील व्यवहार पुर्ण केला जाईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही दाव्यांची अथवा आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही .

**मिळकतीचा तपशिल** (SCHEDULE OF THE PROPERTY)

मौजे माणगाव तर्फे वरेडी व मौजे माणगाव ठाकुरवाडी, ता.कर्जत, जि.रायगड, ग्रुप ग्रामपंचायत माणगाव हद्दीतील जमीन मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे

| सर्व्हे नंबर./ हिस्सानंबर. | जुना सर्व्हे नंबर. / हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्र. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १५ | २८ | ०.५४.६० | २.२० |
| १६ | २९ | ०.२०.७० | ०.४७ |
| १६/४/ब | २९/४/ब | ०.८६.०० | ०.७२ |
| १७/१ | ३०/१ | ०.८०.०० | ०.७३ |
| १७/२ | ३०/२ | ०.०५.०० | ०.०५ |
| १७/३ | ३०/३ | ०.४२.०० | ०.४२ |
| १७/४ | ३०/४ | ०.१३.०० | ०.१७ |
| १७/५ | ३०/५ | ०.२५.०० | ०.२७ |
| १७/६ | ३०/६ | ०.६५.०० | ०.५५ |
| १७/७ | ३०/७ | ०.१९.०० | ०.२५ |
| १७/८ | ३०/८ | ०.११.०० | ०.१२ |
| १७/९/अ | ३०/९/अ | ०.२१.५० | ०.२२ |
| १७/९/ब | ३०/९/ब | ०.२१.५० | ०.२२ |
| १७/१० | ३०/१० | ०.२६.०० | ०.२३ |
| १७/११/अ | ३०/११/अ | ०.६९.०० | ०.६१ |
| १७/११/ब | ३०/११/ब | ०.०६.८० | ०.०६ |
| १७/१२ | ३०/१२ | ०.२१.०० | ०.२३ |
| १७/१३ | ३०/१३ | ०.२१.०० | ०.२२ |
| १७/१४ | ३०/१४ | ०.२७.०० | ०.४४ |
| १७/१६ | ३०/१६ | ०.६४.०० | ०.९८ |
| १८/१ | ३१/१ | ०.३५.१० | २.३४ |
| १८/२ | ३१/२ | ०.६०.५० | २.८८ |
| १९/१ | ३२/१ | ०.११.६० | ०.७२ |
| १९/४ | ३२/४ | ०.२९.०० | २.३४ |
| २५/७ | ३८/७ | ०.०९.५० | ०.५६ |
| २५/८ | ३८/८ | ०.०२.४० | ०.२३ |

ठिकाण कर्जत
दिनांक ०५.०९.२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
पत्ता मु.पो.चिंचवळी ता.कर्जत
जि. रायगड
ई मेल: ubhagat 79@gmail.com
मो.नं.९०४९४८६८०५



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | ३३९/३ | १२.००.०० | २४.०० |

वर वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत व त्यावर असणारी ग्रुप ग्रामपंचायत नागाव मालमत्ता क्र.१९५४ ही घर मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक श्री विकास मनोहर सावंत यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशिर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशीलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदरबाबत कोणताही व्यवहार ठरविणेपुर्वी खातरजमा करणेसाठी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी या जाहीर नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक - ०९/०९/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं.७ व ८, ब्राम्हणआळी, राम मंदिर समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१



### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट- २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन- २ जागा, हाऊसकीपर- फक्त पुरूष (३ जागा), ओरिएंटल कुक- १ जागा, इंडियन चायनीज कुक- १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा WhatsApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक : ७५५९१८४६१२
- विधवा महिला पाहिजे-उंच असलेली, वय-३६ ते ४६ वर्षे, रंग-गोरा, सुंदर, शिक्षण-किमान १० वी पास, स्वयंपाक येणारी, जातीची अट नाही-पुरूष-वय ५२ वर्ष MNC रिटायर्ड उत्पन्न ७५००० महिना मो. ९८९२७१३०८०
- Vacancy in furniture Workshop office
Education - Graduation Experience - 2 years
Location - Bamansure, chondhi
Contact - 9823585321
- फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे ठिकाण-झिराड, पात्रता -MBA अनुभव -३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना Contact- 9823585321
- Showroom of 2,500 to 3,000 sq ft required on Rent for Bank at Alibaug, Mahad, Pen, Khopoli, Karjat, Roha. Share your Premises details on WhatsApp 9823339162 / premisesdepartment@gmail.com
- अलिबागमधील दुकानात कामासाठी (सेल्समन) मुलगा किंवा मुलगी हवी आहे. संपर्क : ९४२२६९६२३५
- महालक्ष्मी किराणा स्टोअर्स जागा भाड्याने देणे आहे. १२०० स्क्वेअर फुट दूकानाचे तीन गाळे भाड्याने देणे आहे. ७०३८६५६४४६
- नागाव येथे रोडटच ६ गुंठे जागा विकणे आहे. तार कंपाऊंड मारले आहे. संपर्क- ७०३८६५६४४६.पंतनगर अलिबाग येथे सोसायटीमध्ये १ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. मराठी कुटुंबास प्राधान्य. संपर्क : ७०४५३६६६५२
- नागाव येथे रिसॉर्ट मध्ये अकाउंटन्ट या पोस्ट साठी कामाला मुलगी पाहिजे आहे. कमीत कमी १ वर्षाचा टॅली (Tally) हाताळल्याचा चा अनुभव पाहिजे. इच्छुकांनी खाली दिलेल्या नंबर वरती कॉन्टॅक्ट करावा आणि आपला रिस्युम पाठवावा. मोबाईल नंबर. +९१९८१९०९३३२०
- मुंबईतील नामांकित कंपनीच्या नागाव गेस्ट हाऊसमध्ये कर्मचारी हवेत. मॅनेजर केअरटेकर कूक माळी मदतनीस ड्रायव्हर गार्ड राहण्या-खाण्याची सोय माहितीसह संपर्क करा. व्हाट्सअप- ८१६९५८४०७२.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : घरात सणाचं आनंदाचं वातावरण राहील. विद्यार्थ्याच्या कलांना वाव मिळेल. बाकी चिंता करू नये.
- **वृषभ** : खरेदीचा उत्साह राहील. मित्र-मैत्रिणी, आप्तेष्टांच्या भेटी होतील. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.
- **मिथुन** : दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. खर्च वाढला तरी प्राप्तीचं प्रमाण उत्तम राहील. मुलांची प्रगती होईल.
- **कर्क** : अनपेक्षित घटनांमुळे दिलासा मिळेल. खरेदीचे व्यवहार मार्गी लागतील. पित्ताचे विकार सतावतील.
- **सिंह** : कामाचं इतरांकडून कौतुक होईल. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. आध्यात्मिक प्रगती होईल.
- **कन्या** : महत्त्वाच्या भेटीतून लाभ होईल. कुटुंबात उत्साह, आनंद राहील. ज्येष्ठांनी प्रकृतीकडे लक्ष द्यावं.
- **तूळ** : नव्या विचारांना चालना मिळेल. अचानक धनलाभाचे योग आहेत. विद्यार्थ्यांना नव्या संधी लाभतील.
- **वृश्चिक** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. उष्णतेच्या विकाराबाबत काळजी घ्या. प्रवास शक्यतो टाळावा.
- **धनु** : आर्थिक प्रश्नांमधून मार्ग निघेल. स्थावर प्रश्नात तडजोड हिताची ठरेल. मानसिक अस्वास्थ राहील.
- **मकर** : कामाचा उत्साह वाढता राहील. व्यवसायात उलाढाल मनाजोगी होईल. थोरांचा सहवाल लाभेल.
- **कुंभ** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. पूर्वीच्या ओळखी लाभदायक ठरतील. मानसन्मानाचे योग आहेत.
- **मीन** : आश्वासनं देताना विचार करा. बोलण्यातून गैरसमज संभवतात. प्रवास शक्यतो लाबणीवर टाका.

## ब्युटी मंत्रा

## जादू फ्लॉवर फेशियलची...

त्वचेचं तेज खुलवण्यासाठी तुम्ही फ्लॉवर फेशियलची मदत घेतली पाहिजे.
* फ्लॉवर फेशियल करणार असाल तर त्वचेचा प्रकार कोणता आहे हे पाहणं गरजेचं आहे.
* यात गुलाब, झेंडू, निशिगंध, कार्नेशन, जरबेरा, लिली, सूर्यफुल अशा फुलांचा उपयोग केला जातो.
* रोमछिद्र खुली राहून त्वचेला त्रास होत असेल तर गुलाबाच्या फेशियलची मदत घ्यावी.
* कोरड्या त्वचेसाठी मेरीगोल्ड फेशियल वरदान आहे. त्वचा उजळवण्यासाठी ते फायदेशीर ठरू शकतं.
* जस्मिन म्हणजे मोगरा. चेहऱ्यावरील डाग दूर करण्यासाठी जस्मिन फेशियल महत्त्वाचं आहे.
* चेहऱ्यावर सुरकुत्या किंवा ॲक्ने असतील तर लव्हेंडर फेशियलची मदत घ्या.
* सूर्यफुल फेशियल हे निस्तेज त्वचा उजळवण्यासाठी फायदेशीर ठरू शकतं.

फ्लॉवर फेशियल सुरुवातीला १५ दिवसातून एकदा करावं. त्यामुळे त्वचेला योग्य प्रमाणात पोषण मिळू शकतं.

## ६ सप्टेंबर — दिन विशेष

**१९६६** : दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान हेन्ड्रिक व्हेरवोर्डची संसदेत भोसकून हत्या.
**१९७०** : पॅलेस्टाईनच्या अतिरेक्यांनी युरोपमधून न्यूयॉर्कला निघालेल्या दोन विमानांचे अपहरण केले आणि ती जॉर्डनला नेली.
**१९७१** : भारतीय क्रिकेटपटू देवांग गांधीचा जन्म.
**२०१३** : तुरुंगात असणाऱ्या लोकप्रतिनिधींचा निवडणूक लढवण्याचा हक्क अबाधित ठेवणारे विधेयक लोकसभेत मंजूर.

## लाईफस्टाईल

## सकारात्मक रहा

दोस्तांनो, आयुष्यात नेहमीच सकारात्मक विचार करायला हवा. नकारात्मक विचारांमुळे आपण मागे पडतो. जास्तीतजास्त सकारात्मक होण्यासाठी काय करता येईल याविषयी...

* मी करू शकत नाही किंवा मला जमणार नाही या ऐवजी मी करून दाखवेन किंवा मला जमेल असं म्हणा. * प्रत्येक दिवशी तुमच्या बाबतीत घडलेल्या चांगल्या घटनेची नोंद करून ठेवा. हे कागद जमवून ठेवा आणि महिन्याच्या शेवटी या घटना वाचा. तुम्हाला आनंद मिळेल. * रोज कोणाला तरी मदत करण्याचा प्रयत्न करा. * आयुष्यातल्या काही वाईट घटनांचा उल्लेखही सकारात्मक पद्धतीने करा. * आयुष्यात घडलेल्या चांगल्या घटना आठवा. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. * दररोज एखादा सकारात्मक शब्द लिहून काढा. मराठी किंवा इंग्रजी वर्णमालेतलं एक अक्षर घ्या. त्या अक्षरापासून सुरू होणारा सकारात्मक शब्द लिहून काढा. * आयुष्यातले छोटे छोटे आनंद साजरे करा. एखाद्या दिवशी सकाळी लवकर उठलात तरी स्वतःला छानशी भेट द्या.

## पंचांग

**रविवार, ६ सप्टेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, श्रावण कृ. १०, चंद्रराशी : मिथुन, नक्षत्र : आर्द्रा, योग : सिद्धि, सूर्योदय ६.२७, सूर्यास्त ६.४७

## फॉरवर्ड्स

**वक़्त सिखा देतां हैं ज़ीने क़ा हुनर.. फ़िर क़्या नसीब...**

**क़्या मुक़द्दर औऱ क़्या हाथों क़ी लक़ीरें...!**

## आरोग्यमंत्र

## का बदलतं झोपेचं चक्र?

बदलतं हवामान अनेक परिणाम घडवून आणतं. याचा आपल्या झोपेच्या चक्रावरही परिणाम होतो. कसा ते पाहू या.

उष्ण आणि आर्द्र वातावरण शरीराला गाढ झोपेपासून परावृत्त करतं. वातावरणातली आर्द्रता शांत झोपेसाठी लागणाऱ्या हार्मोन्सवर परिणाम करते. उष्ण आणि आर्द्र वातावरणात शरीरातला दमटपणा कमी होत नाही. त्यामुळे झोपताना खूप गरम होतं, अस्वस्थ वाटत राहतं. अशा वातावरणात बुरशी आणि बॅक्टेरियांची वाढ होते. बुरशीशी संबंधित ॲलर्जीमुळे झोपेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळेच ही समस्या जाणवत असेल तर झोपेच्या



खोलीत हवा खेळती राहू द्या. झोपण्याच्या आधी काही खाऊ नका. झोपताना ढिले, सुती कपडे घाला पलंगावर कॉटनच्या स्वच्छ चादरी घाला. थंड वातावरणात शरीराच्या झोपेच्या नैसर्गिक चक्राला बळ मिळतं. झोपेसाठी १५ ते २२ अंश सेल्सियस तापमान आदर्श मानलं जातं. पण तापमान यापेक्षा कमी किंवा जास्त झालं तर अस्वस्थता जाणवते. थंड वातावरणात शांत झोप लागण्यासाठी झोपण्याआधी काही वेळ कोमट पाण्याने आंघोळ करा. हवामान बदलाचे शरीरावर होणारे ठळकपणे दिसून येतात. म्हणूनच त्यांची तीव्रता समजून घ्यायला हवी. तापमानबदल आणि आर्द्रतेमुळे जुनाट वेदना उचल खातात. सहाजिकच वेदनांमुळे झोपेवर परिणाम होतो. शारीरिक वेदनांमध्ये वाढ झाल्याने झोपेचं चक्र बिघडू शकतं. हे लक्षात घेऊन ही समस्या दूर करण्याचा प्रयत्न करावा.

## वेगळ्या वाटा

सध्या स्मार्ट सिटीज आणि ग्रीन बिल्डिंगचा जमाना आहे. लोकांना घरांमध्ये विविधता हवी आहे. म्हणूनच आर्किटेक्ट्सना बऱ्याच नव्या संधी उपलब्ध होत आहेत. या करिअरविषयी...

*इमारतीच्या बांधकामाची योजना आखण्यापासून बांधकाम पूर्ण होईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर विकासकांना आर्किटेक्टची मदत लागते. * आर्किटेक्ट बनण्यासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायला हवा. बारावीनंतर 'नॅशनल ॲप्टिट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर'(नाटा) ही परीक्षा द्यावी लागते. यानंतर आर्किटेक्चरला प्रवेश घेता येतो. **(क्रमश:)**

## करिअरवाटा

## संधी चर्मोद्योगामधील...

चर्मोद्योग हा देशातील अग्रणी उद्योगांच्या यादीत समाविष्ट होणारा उद्योग असून या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाला भरपूर वाव आहे. हे लक्षात घेऊनच काही संस्थांनी चर्मोद्योगाचे प्रशिक्षण देणारे निरनिराळे अभ्यासक्रम विकसित केले आहेत. यातल्या कोणत्याही अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला रसायनशास्त्राचं ज्ञान असणं गरजेचं असतं. कातडी कमावताना, फिनिशिंग करताना निरनिराळ्या रसायनांचा वापर करावा लागत



असल्यामुळे हे ज्ञान उपयुक्त सिद्ध होतं. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना स्वत:चा व्यवसायही सुरू करता येतो. अलिकडच्या काळात भारतातल्या चामड्याच्या वस्तूंना जगातून मागणी आहे. त्यामुळे बडे उद्योगसमूह मोठ्या संख्येने या व्यवसायात उतरत आहेत आणि यातून या उद्योगांमध्ये नोकरीच्या संधीही वाढत आहेत. चर्मोद्योगाशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना डिझायनर म्हणून नोकरी मिळू शकते. कातडी कमावण्याच्या विभागातही चांगली संधी मिळू शकते. परदेशी व्यापारसंबंधात ज्ञान असणाऱ्यांना या उद्योगात मोठ्या संधी उपलब्ध आहेत. त्यादृष्टीने या क्षेत्रात विविध पदांवर काम करण्याच्या दृष्टीने योग्य प्रशिक्षणावर भर दिला जायला हवा.

## खेचाखेची

## महत्वाचा प्रश्न

लग्न झालेल्यांसाठी एक प्रश्न.

उत्तर फक्त 'हो' किंवा

'नाही' मध्ये द्यावे.

आता तुमच्या बायकोने तुम्हाला...
.
.
.
.
मारणे बंद केले आहे का?

## वेगळं काही

नासाच्या शास्त्रज्ञांनी मध्यंतरी एका ग्रहाचा शोध लावला. हा ग्रह पृथ्वीशी साधर्म्य साधणारा असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या ग्रहावर माणसाला रहाण्यासाठी पोषक वातावरण असल्याचा त्यांचा दावा आहे. या ग्रहावरचं तापमान ० ते ४० अंश सेल्सियसदरम्यान असतं. या ग्रहाला 'केटू १८ बी' असं नाव देण्यात आलं आहे. हा ग्रह पृथ्वीपासून १११ प्रकाशवर्षं लांब आहे. 'केटू १८ बी' हा आपल्या सूर्यमालेबाहेरचा ग्रह आहे. त्याचा आकार पृथ्वीपेक्षा दुप्पट आहे. तसंच त्यावर पाणीही आहे. त्यामुळे तिथे जीवसृष्टीचं अस्तित्व असू शकतं किंवा पोषक वातावरणामुळे माणूस तिथे राहू शकतो. पण त्याची सध्या तरी पृथ्वीशी तुलना करता येणार नाही.

## रुचिरा

## बनवा रुचकर हलवा

गणपतीसाठी नैवेद्य करताना घरच्या अन्नपूर्णेचा कस लागत असतो. दररोज नवीन नवीन काय करायचं हे सुचत नाही. तुम्हीही या संभ्रमात असाल तर वेगळ्या प्रकारचा हलवा करुन बघा.

साहित्य: अर्धी वाटी गहू (भिजवलेले), पाऊण वाटी तूप, एक वाटी साखर, पाव वाटी काजूचे काप, वेलदोड्यांची पूड इत्यादी.



कृती: गहू रात्रभर भिजत ठेवावे आणि सकाळी पाणी काढून मिक्सरमध्ये वाटून घ्यावे. नंतर द्रावण चाळणीतून गाळून घ्यावं. दुसरीकडे गॅसवर कढई ठेवावी. त्यात चमचाभर तूप घालून काजूचे काप परतून घावे. त्यानंतर पुन्हा एक चमचा तूप टाकून त्यात साखर आणि पाणी घालून पाक करून घ्यावा. पाक तयार झाल्यानंतर त्यात हळूहळू गव्हाचं दूध सोडावं. त्यानंतर वरून चमचाभर तूप घालावं. थोड्या वेळाने हलव्याला तूप सुटू लागेल. आता त्यात काजूचे काप आणि वेलदोड्याची पावडर टाकावी. त्यानंतर मिश्रण एकजीव करून घ्यावं. हा हलवा थंड होऊ द्यावा. काप केल्यास या मिश्रणाची बर्फीही करता येऊ शकते. हा रुचकर हलवा सगळ्यांना आवडेल.

## सुडोकू १४७


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | | ५ | १ | ९ | | | |
| | | १ | २ | | | | | ३ |
| | | ८ | ६ | | | १ | २ | ९ |
| ९ | | ३ | | | | ७ | ४ | २ |
| | | | | ९ | | | | |
| ७ | १ | ५ | | | | ९ | | ८ |
| ३ | ५ | ६ | | | २ | ४ | | |
| ८ | | | | | १ | २ | | |
| | | | ७ | ४ | ६ | | | ५ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १४६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ४ | ३ | ६ | २ | १ | ७ | ५ | ९ |
| १ | ६ | ९ | ३ | ५ | ७ | ८ | २ | ४ |
| ७ | २ | ५ | ४ | ९ | ८ | १ | ६ | ३ |
| ६ | ९ | २ | ५ | १ | ४ | ३ | ७ | ८ |
| ३ | १ | ७ | ८ | ६ | २ | ४ | ९ | ५ |
| ५ | ८ | ४ | ७ | ३ | ९ | ६ | १ | २ |
| ४ | ७ | १ | ९ | ८ | ५ | २ | ३ | ६ |
| २ | ५ | ६ | १ | ४ | ३ | ९ | ८ | ७ |
| ९ | ३ | ८ | २ | ७ | ६ | ५ | ४ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १४७



**आडवे शब्द :-**
१) बाग
४) लोणी
७) गौरी-हर
१०) उष:काल
११) दक्ष
१२) बगळा
१४) सत्तावीसावे नक्षत्र
१५) गोंधळ, आरडाओरड
१७) संपूर्ण
१९) धोका
२०) कावळ्यांना दिलेला बळी, भात
२१) विहीरीतून पाणी काढण्याचे जोड साधन
२३) मोदकाचे आच्छादन
२४) दिवस
२५) वर्ष, सन
२७) पुरुष
२८) कागद (हिं )
३०) उत्तराधिकारी
३१) कशा प्रकारचा?
३३) लेखक, कथा लिहिणारा
३५) संपत्ती
३७) हस्तलाघव, जादू
३९) उदर (हिं )
४०) उपकार
४१) शरीर
४२) वडिलांचे एक संबोधन
४४) यमुना नदीचे एक नाव
४९) युवराज
५१) काकुळतीने याचना करणे
५४) कोवळा अंकुर
५५) वाळवी
५७) संरक्षक भिंत
५८) बहीण(हिं )
६०) शोध
६२) खेळाडूंमध्ये होणारा चुरशीचा खेळ
६४) एक खादाड राक्षस
६६) पर्वत
६८) वक्र
७०) नकला करणारा
७१) पळापळ
७३) च्या सह
७५) बाई
७६) मणका
७७) वाकणे
७८) पाय
७९) कावळ्याचे ओरडणे

**उभे शब्द :-**
१) दुसऱ्या दर्जाचा अधिकार, मुख्य पदाच्या खालचा
२) पहारा करणारा
३) बडबड
४) एक क्षार
५) खून, हत्या
६) जोडीतील एक चर्मवाद्य
८) पैसा, ममता
९) फांदी तुटतानाचा आवाज
१३) पराकाष्ठा, अनर्थ
१५) एक ज्वालाग्रही काळे खनीज
१६) बारीकसारीक
१७) नातेवाईक
१८) तात्काळ
१९) अग्रलेख लिहिणारा
२०) रेडा, कोकिळ
२२) टिंगल
२४) उपयोग
२६) मध्यस्थ
२८) कंबर, कंबरेचा सांधा
२९) मलई
३१) केर
३२) मेहुणा हिं )
३४) थापा मारणारा
३५) जागणे,
३६) देण्याची वृत्ती, आर्थिक सामर्थ्य
३८) लापशी, एक गोड खाद्य
४१) जया अंगी मोठेपण ** *** ***
४२) बारा बंद असलेला अंगरखा
४३) उंच वास्तू, बंगला
४५) भरवसा, श्रद्धा
४६) पर्वत
४७) सावली
५०) देह
५२) सामाजिक वजन, अब्रू
५३) कलावंत
५५) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
५६) पृथ्वी
५९) केविलवाणा
६१) बासरी
६३) अंत:करण
६४) घाईघाईने, अधाशीपणाने मोठा घास घेऊन खाणे
६५) बारीक झणझण
६७) हिंदीत गाढव
६९) टपाल
७१) भीती, वचक
७२) इंग्रजीत एक
७४) सोन्याचा कस
७५) चौक

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुं | गी | च्या | पा | ऊ | ला | ने | | ह | न | न | | क | स | म |
| | र्वा | | ल | | लू | ट | मा | र | | व | र | द | ह | स्त |
| द | ण | क | ट | | च | | स | ण | वा | र | | म | न | |
| श | | ड | | स | खो | ल | | टो | | स | दा | | शी | व |
| र | ख | वा | ल | दा | र | | क | ळ | क | | स | क | ल | |
| थ | ड | | ज्ञा | | | मा | ळी | | | अ | बो | ल | | क |
| | ब | त्ती | | त | रं | ग | | बे | सा | व | थ | | वि | र |
| स | डा | | ता | | क | णी | क | | मा | ज | | व | सं | त |
| ब | ट | ब | टी | त | | दा | | | न | ड | गी | | वा | ल |
| का | | र | | सा | ग | र | त | ट | | | ता | क | द | |
| मा | ळ | क | री | | ड | | ड | | अ | न | र | सा | | अ |
| लि | | त | त | प | प | | क | र्ज | | स | ह | | क | ष्ट |
| क | ट्टा | | स | ट | | मा | सा | | पा | | स्य | | ळ | |
| ए | | ह | र | क | त | | र | मा | व | र | | ता | प | ट |
| क | स | र | | न | ज | र | | ग | | ड | व | रा | | क |

# आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रादेशिक सहकार्य

**हिमालयातील बर्फ, हिमनद्या वितळण्याची गती बदलली किंवा पर्वतरांगांमधील नैसर्गिक जलसाठे अस्थिर झाले, तर त्याचे परिणाम सीमारेषा ओलांडून जाणार आहेत. हिमालयात झालेली अतिवृष्टी काही तासांमध्ये नदीच्या पाण्याची पातळी बदलून शेकडो किलोमीटर दूर असलेल्या वस्त्यांना फटका बसू शकतो. म्हणूनच हिमालयीन आपत्तींचे व्यवस्थापन हा राष्ट्रीय सीमांच्या पलीकडे जाऊन प्रादेशिक सहकार्याचा विषय बनले पाहिजे.**



**भास्कर खंडागळे**

नेपाळमधील संकटाकडे केवळ 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. नैसर्गिक घटकांचा यात मोठा वाटा असला, तरी हवामानबदलामुळे पर्जन्यमानाच्या पद्धतीत होणारे बदल, अतिवृष्टीच्या घटनांची वाढती तीव्रता, हिमनद्यांचे आकुंचन, हिमनदीजन्य तलावांचा वाढता धोका आणि डोंगराळ भागातील अनियंत्रित बांधकाम यामुळे या आपत्तींचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे होत आहे. निसर्गाचा इशारा स्पष्ट आहे; प्रश्न एवढाच की, मानवी समाज आणि सरकारे तो किती गांभीर्याने घेतात. हिमालयाला 'तिसरा ध्रुव' म्हटले जाते. जगातील ध्रुवीय प्रदेशांनंतर सर्वाधिक बर्फसाठा असलेल्या या पर्वतरांगांमधून अनेक महत्त्वाच्या नद्या उगम पावतात. गंगा, ब्रह्मपुत्रा, सिंधू यांसारख्या नदीप्रणालींवर दक्षिण आशियातील अब्जावधी लोकांचे जीवन अवलंबून आहे. हिमालयातील बर्फ आणि हिमनद्या वितळण्याची गती बदलली, पावसाचे स्वरूप बदलले किंवा पर्वतरांगांमधील नैसर्गिक जलसाठे अस्थिर झाले, तर त्याचे परिणाम सीमारेषा ओलांडून दूरवर जाणार आहेत. यामुळे नेपाळमधील पूर हा केवळ नेपाळचा प्रश्न नाही. हिमालयातील पाण्याचा प्रत्येक प्रवाह अखेरीस भारताच्या मैदानी भागाकडे येतो आणि पुढे बांगलादेशात पोहोचतो. हिमालयातील एखाद्या भागात झालेली अतिवृष्टी काही तासांमध्ये नदीच्या पाण्याची पातळी बदलू शकते आणि त्याचा फटका शेकडो किलोमीटर दूर असलेल्या वस्त्यांना बसू शकतो. म्हणूनच हिमालयीन आपत्तींचे व्यवस्थापन हे राष्ट्रीय सीमांच्या पलीकडे जाऊन प्रादेशिक सहकार्याचा विषय बनले पाहिजे.

प्रत्येक पूर किंवा भूस्खलनाला हवामानबदल कारणीभूत आहे, असे सरसकट म्हणणे शास्त्रीयदृष्ट्या योग्य ठरणार नाही; मात्र हवामानबदलामुळे अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा आणि अनियमित हवामानाच्या घटनांचा धोका वाढत असल्याचे जगभरातील वैज्ञानिक अभ्यास सातत्याने अधोरेखित करतात. हिमालयासारख्या नाजूक पर्वतीय परिसंस्थेत या बदलांचा परिणाम अधिक तीव्र होऊ शकतो. पर्वतांची रचना, उतार, मातीची स्थिती, जंगलांची घनता आणि पर्जन्यमान यांचा एकमेकांशी अतिशय जवळचा संबंध आहे. मुसळधार पाऊस झाला, की पाण्याचा वेग वाढतो. आधीच अस्थिर झालेल्या उतारांवर भूस्खलन होते. नदीपात्रातील गाळ वाढतो. पूल आणि रस्त्यांवरील दाब वाढतो. एखाद्या ठिकाणी धरण किंवा जलविद्युत प्रकल्प असल्यास परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होऊ शकते. यात मानवी हस्तक्षेपाची भर पडते. डोंगर कापून रस्ते बांधणे, नदीकाठावर अतिक्रमण, पूरक्षेत्रात बांधकाम, जंगलतोड, वैज्ञानिक अभ्यासाशिवाय पर्यटन सुविधा उभारणे आणि स्थानिक भूगोलाचा विचार न करता पायाभूत प्रकल्प राबवणे या सगळ्यामुळे आपत्तीची क्षमता वाढते. विकास आवश्यक आहे; पण विकास आणि पर्यावरण यांना परस्परविरोधी मानण्याची चूक आता परवडणारी नाही. या पार्श्वभूमीवर नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी महापुराने पुन्हा एकदा हिमालयाच्या अस्थिर आणि संवेदनशील स्वरूपाची भीषण जाणीव करून दिली.

नेपाळमध्ये उसळलेल्या पाण्याने काही तासांमध्ये मानवी वस्त्या, रस्ते, पूल आणि दळणवळणाची साधने उद्ध्वस्त केली. अनेकांचा जीव गेला आणि यात्रेकरूंसह शेकडो लोक बेपत्ता झाल्याच्या बातम्या समोर आल्या; मात्र ही घटना केवळ नेपाळची अंतर्गत शोकांतिका नाही. हिमालयात निर्माण होणारी आपत्ती भौगोलिक सीमा ओळखत नाही. नेपाळमध्ये वाहणाऱ्या नद्या पुढे भारतात येतात, अनेक नदीप्रणाली गंगेच्या खोऱ्याशी जोडल्या जातात आणि त्यांचा अंतिम परिणाम बांगलादेशपर्यंतपोहोचतो. त्यामुळेनेपाळचामहाप्रलय हा प्रत्यक्षात संपूर्ण दक्षिण आशियासाठी इशारा आहे. हिमालयाच्या कुशीत घडणारी आपत्ती नेहमीच स्थानिक राहत नाही. डोंगरातील एखाद्या छोट्या खोऱ्यात पडलेला प्रचंड पाऊस काही तासांमध्ये नदीला रौद्ररूप देऊ शकतो. भूस्खलनामुळे नदी अडली, तर नैसर्गिक तलाव तयार होतो आणि तो अचानक फुटल्यास खालच्या प्रवाहातील गावांवर पाण्याचा लोट आदळतो. हिमनद्यांमधील तलाव फुटणे, ढगफुटी, भूकंपामुळे निर्माण होणारे भूस्खलन किंवा हिमनदीच्या वितळण्याचा वेग वाढणे या सर्व घटनांची साखळी हिमालयात घडू शकते. त्यामुळे पर्वतरांगांमध्ये निर्माण झालेला धोका पुढील काही तासांमध्ये भारतातील मैदानांपर्यंत पोहोचण्याची शक्यता असते. याच अर्थाने नेपाळमधील अलिकडचा महापूर भारतासाठीही धोक्याची घंटा आहे.

नेपाळमधील कोसी, गंडक, कर्णाली आणि महाकालीसारख्या नदीप्रणालींच्या प्रवाहात मोठे बदल झाल्यास भारतातील खालच्या प्रदेशांना फटका बसू शकतो. विशेषतः बिहारच्या इतिहासात कोसी नदीने निर्माण केलेल्या विध्वंसक पुराची अनेक उदाहरणे आहेत. हिमालयात पडणारा पाऊस, नेपाळातील भूस्खलन किंवा धरणातील पाण्याचे व्यवस्थापन यांचा परिणाम हजारो किलोमीटर दूरच्या भारतीय वस्त्यांवर होऊ शकतो. नदी ही नकाशावरील सीमारेषा नसते. उलट, अनेक समाजांना जोडणारी जीवनवाहिनी असते; पण पुराच्या काळात हीच नदी सीमापार संकट बनते. वरच्या प्रवाहात पाण्याचा प्रचंड लोट निर्माण झाला, तर खालच्या प्रवाहातील देशांकडे तयारीसाठी फार कमी वेळ उरतो. त्यामुळे भारत आणि नेपाळ यांच्यात केवळ नदीपाणी वाटपाचा किंवा जलविद्युत प्रकल्पांचा प्रश्न नाही, तर प्रत्यक्ष वेळेतील माहितीची देवाणघेवाण, पावसाचा अंदाज, नदीपातळीतील बदल, धरणातून होणारा विसर्ग आणि संभाव्य भूस्खलनाची माहिती सामायिक करण्याची अत्यंत सक्षम यंत्रणा असणे आवश्यक आहे. दक्षिण आशियातील हवामान आणि आपत्ती व्यवस्थापन राष्ट्रीय चौकटीत राहू शकत नाही. एका देशात पडलेला पाऊस दुसऱ्या देशातील गावाला बुडवू शकतो. एका देशातील भूस्खलन नदीचा मार्ग बदलू शकते आणि त्याचे परिणाम तिसऱ्या देशाला भोगावे लागू शकतात. त्यामुळे आपत्तीचे व्यवस्थापनही सीमापार सहकार्यानेच करावे लागेल. या घटनांमागे सर्वात महत्त्वाचा घटक आहे तो हिमालयाचा भूगर्भीय स्वभाव.

हिमालय ही स्थिर पर्वतरांग नाही. भारतीय भूखंड आणि युरेशियन भूखंड यांच्या टक्कर प्रक्रियेतून निर्माण झालेली ही पर्वतरांग आजही भूगर्भीय हालचालींना सामोरी जात आहे. त्यामुळे हिमालयातील अनेक भाग भूकंपाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहेत. भूकंपाचा थेट धक्का हा एक धोका असतोच; पण त्यानंतर निर्माण होणारे भूस्खलन, नदीमार्ग बंद होणे आणि नैसर्गिक धरणे तयार होणे ही दुय्यम संकटे अनेकदा अधिक विनाशकारी ठरतात. डोंगराचा मोठा भाग नदीमध्ये कोसळल्यास काही काळासाठी नदीचा प्रवाह थांबू शकतो. त्यामागे पाणी साचत राहते आणि नैसर्गिक तलाव तयार होतो. अशा माती, दगड आणि खडकांच्या तात्पुरत्या अडथळ्याला पाण्याचा दबाव सहन होत नाही.

अखेर तो फुटला, की अचानक निर्माण होणारा पूर खालच्या खोऱ्यातील सर्व काही वाहून नेऊ शकतो. हिमालयात 'अचानक पूर' इतका धोकादायक का असतो, याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. दुसरा निर्णायक घटक म्हणजे हवामानबदल. हिमालयाचे तापमान वाढत आहे आणि हिमनद्या वेगाने मागे सरकत आहेत. हिमनद्या वितळल्याने त्यांच्या पुढील किंवा बाजूच्या भागात पाण्याचे तलाव तयार होतात. हे तलाव बर्फ, माती किंवा दगडांच्या नैसर्गिक बांधांनी रोखलेले असतात. अतिवृष्टी, हिमस्खलन, भूकंप किंवा पाण्याचा वाढता दाब यामुळे असे बांध फुटले, तर 'ग्लेशियर लेक आउटबर्स्ट फ्लड' अर्थात हिमनदीय तलाव फुटून येणारा अचानक महापूर निर्माण होऊ शकतो. या प्रकारच्या आपत्तींचा धोका हवामानबदलामुळे वाढत असल्याची चिंता सातत्याने व्यक्त केली जात आहे. तिसरा घटक म्हणजे अतिवृष्टी आणि ढग फुटी. यातून अल्प कालावधीत अत्यंत तीव्र पाऊस पडण्याच्या घटना वाढण्याची शक्यता असते.

मानवी हस्तक्षेप हाही या संकटाचा महत्त्वाचा भाग आहे. हिमालयात रस्ते, बोगदे, धरणे, जलविद्युत प्रकल्प आणि मोठ्या प्रमाणावर पर्यटनाचा विस्तार होत आहे; परंतु नाजूक भूप्रदेशात विकासाचे नियोजन स्थानिक भूगर्भीय परिस्थितीचा विचार करून झाले नाही, तर तो विकासच आपत्तीचा वेग वाढवू शकतो. डोंगर कापून रस्ते तयार करताना योग्य उतार व्यवस्थापन नसल्यास भूस्खलनाचा धोका वाढतो. नदीपात्रांच्या काठावर अनियंत्रित बांधकाम झाले, तर पुराच्या पाण्याला नैसर्गिक विस्तारासाठी जागा राहत नाही. पर्यटनाच्या वाढत्या दबावामुळे डोंगराळ भागात हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि अनियोजित वस्त्या वाढतात. आपत्ती आली, की या सर्व मानवी संरचना धोक्याच्या मार्गात येतात. हिमालयातील अनेक दुर्घटनांनी वारंवार हा धडा दिला आहे. मोठ्या धरणांच्या प्रश्नाकडेही गांभीर्याने पाहावे लागेल.

आज ईशान्य भारतातील ब्रह्मपुत्रा खोरे आणि उत्तर भारतातील हिमालयीन नदीप्रणाली यांचे स्वतंत्र तसेच एकत्रित जोखीम मूल्यांकन करणे आवश्यक आहे. वरच्या प्रवाहातील पाण्याची पातळी, भूस्खलन, हिमनदीय तलाव आणि धरणांच्या संभाव्य परिणामांवर लक्ष ठेवण्यासाठी अत्याधुनिक उपग्रह निरीक्षण आणि भू-आधारित सेन्सर नेटवर्क उभारावे लागेल. आपत्तीची माहिती राज्य सरकारे, जिल्हा प्रशासन आणि स्थानिक गावांपर्यंत काही मिनिटांमध्ये पोहोचली पाहिजे. पूर येण्यापूर्वी किती पाणी येणार, कोणत्या वेळी येणार आणि कोणते क्षेत्र धोक्यात आहे, याचा अचूक अंदाज उपलब्ध झाला, तर हजारो जीव वाचू शकतात. नेपाळमधील महापुराचे पाणी ओसरल्याने उद्ध्वस्त घरे पुन्हा बांधली जातील, रस्ते आणि पूलही दुरुस्त होतील; परंतु हिमालयाने दिलेला इशारा विसरला गेला, तर पुढची आपत्ती अधिक महागात पडेल. हिमालयात निर्माण होणाऱ्या संकटांचे प्रतिध्वनी अखेरीस दक्षिण आशियाच्या मैदानी प्रदेशात ऐकू येतात, म्हणूनच आजची गरज अधिक धरणे, अधिक रस्ते किंवा अधिक प्रकल्प यांची अंधाधुंद स्पर्धा करण्याची नाही; तर 'सुरक्षित हिमालय, सुरक्षित नदीखोरे आणि सुरक्षित मानववस्ती' अशी एकत्रित विकासदृष्टी स्वीकारण्याची आहे. ●

# मानवी मनोऱ्यांची जीवघेणी स्पर्धा !



**जगन घाणेकर**

श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोऱ्या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे श्रीकृष्ण जयंतीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली. कालपरत्वे या प्रथेचे व्यावसायिकरण झाले आणि ठिकठिकाणी लाखांची बक्षिसे मिळवून देणाऱ्या हंड्या बांधल्या जाऊ लागल्या. आता नवरात्रीप्रमाणे दहिहंडी उत्सवही राजकारणी आणि धनदांडग्यांची मक्तेदारी झाली आहे त्यामुळे उत्सवाचे रूपांतर आता इव्हेंट्समध्ये होऊ लागले आहे. जो अधिक रकमेची बक्षिसे लावेल त्याच्या दहीहंडीला मोठ्या प्रमाणात गर्दी तर दिसतेच शिवाय वृत्तवाहिन्या, लोकल केबल नेटवर्कवाले अशा ठिकाणी पहाटेपासून दबा धरून बसलेली पाहायला मिळतात. अशा अधिकाधिक इव्हेंटच्या ठिकाणी जाऊन थरावर थर लावायचे, सलामी द्यायची आणि तेवढ्या थरांसाठी ठरवण्यात आलेली रक्कम घेऊन पुढच्या दहीहंडीच्या ठिकाणी जायचे. केवळ याचसाठी मुंबई ठाण्यातील तरुणांची अनेक पथके एकेक महिना आधीपासून थर उभारण्याचा कसून सराव करताना पाहायला मिळतात.

लोकांनी अधिक गर्दी करावी यासाठी या इव्हेंट्सच्या ठिकाणी सेलिब्रिटीजनाही अतिथी म्हणून बोलावले जाते. त्यांच्याकडून नृत्य करवून घेतले जाते, चित्रपटातील संवाद म्हणण्यास सांगितले जाते. काही तरुण मंडळी तर खास या सेलिब्रिटी मंडळींना पाहण्यासाठी गर्दी करतात. गोविंदा पथक येतात, मनोरे रचतात, मोठे साहस करून अगदी वरच्या थराला पोहोचलेली किशोरवयीन मुले जमलेल्या जमावाला अभिवादन करतात; मात्र खास सेलिब्रिटींना पाहण्यासाठी आलेल्या मंडळींचे या गोविंदा पथकांकडे लक्षही नसते. वृत्तवाहिन्या, केबल नेटवर्क यांचे कॅमेरेसुद्धा केवळ सेलिब्रिटींभोवतीच घुटमळत असतात. थर लावण्यासाठी येणाऱ्या तरुणांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी डीजेची विशेष व्यवस्था केलेली असते, पाण्याचे फवारे मारण्यासाठी पाण्याच्या टँकर्सची या ठिकाणी रांग लागलेली पाहायला मिळते. दहिहंडीला साहसी खेळाचा दर्जा देण्यासाठी राज्य सरकारच्या पुढाकारातून मागील काही वर्षांपासून मुंबईत प्रो कबड्डीच्या धरतीवर प्रो दहीहंडीचे आयोजन केले जात आहे. अर्थात याठिकाणी दहीहंडीच नसल्याने दहीहंडीच्या नावावर ती मानवी मनोऱ्यांची स्पर्धाच असले असेच म्हणावे लागेल. दहीहंडी उत्सवाच्या दिवशीही पुन्हा हेच चित्र पाहायला मिळते. ज्या ठिकाणी दहीहंडीचा इव्हेन्ट बनवला जातो त्या ठिकाणी दहीहंडी केवळ नावाला उभी केलेली असते. अधिकाधिक थर लावा आणि तेव्हढ्या थरांसाठी नियोजित केलेली रक्कम घेऊन जा हा एकच कार्यक्रम याठिकाणी राबवला जातो. त्यामुळे याला उत्सव म्हणावे कि साहसी खेळाची प्रात्यक्षिके हाही एक प्रश्नच आहे. राज्यसरकारने गोविंदा पथकांना लाखो रुपयांचे विमाकवच देऊन या मनोऱ्याच्या स्पर्धेला जणू प्रोत्साहनच देत असते. आज सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहेत त्यामुळे दहीहंडीही यातून सुटलेली नाही. मुंबईत महिला गोविंदा पथकांची संख्याही वर्षागणिक वाढू लागली आहे. ज्या ठिकाणी महिला गोविंदा पथक हंडी फोडण्यास येतात अशा ठिकाणी बघ्यांची गर्दी जरा जास्तच झालेली पाहायला मिळते. श्रीकृष्णाने बालगोपाळांसह हंड्या फोडून लोणी खाल्ल्याचे सर्वांनाच ज्ञात आहे; मात्र गोपिकांनी त्याकाळी असे काही केलेले नाही, त्यामुळे दहीहंडी उत्सवाकडे धार्मिक उत्सव म्हणून पाहायचे असेल, तर किमान महिलांच्या हंडीची तरी या उत्सवामध्ये गणना करू नका. श्रीकृष्णाचे सवंगडी विविध वर्णातील तर होतेच शिवाय त्यातील अनेक जण खूपच गरीबही होते. आपल्या सवंगड्यासह आपलीही शिदोरी एकत्र करून सारे भेद नष्ट करून एकत्र येण्याचा मोलाचा संदेश श्रीकृष्णाने गोपाळकाल्याच्या माध्यमातून दिला आहे. आज मात्र आपलीच दहीहंडी मोठी आणि अधिक बक्षिसे मिळवून देणारी कशी याचीच स्पर्धा पोस्टरबाजीच्या माध्यमातून रंगलेली पाहायला मिळते. गणपती मंडळाप्रमाणे आता दहीहंडीचे इव्हेंट्स भरवणाऱ्या धनदांडग्यांची संख्या वर्षागणिक वाढू लागली आहे. या इव्हेंट्ससाठी रस्ते अडवले जातात, वाहतुकीचे मार्ग बदलले जातात ज्यामुळे सामान्य नागरिकांचे हाल होतात ती वेगळी गोष्ट. ठाण्यातील बदलापूर येथे यंदा दहीहंडीचा सराव करताना वरच्या थरावर चढलेल्या बालकाचा सेफ्टी बेल्ट तुटल्याने सातव्या थरावरून तो खाली कोसळला. खाली उभ्या असलेल्या तरुणांनी त्याला झेलल्याने अनर्थ टळला. तरीही दरवर्षी कितीतरी गोविंदा वरच्या थरावरून कोसळून किंवा चेंगरून जखमी होतात. काहीवेळा जीवालाही मुकतात. त्यामुळे सध्या गोपाळकाला उत्सवाच्या नावावर चाललेला हा सर्व प्रकार म्हणजे मनोरे रचण्याची आणि साहस दाखवण्याची जीवघेणी स्पर्धा बनू लागली आहे. ●

# जेन झी : डिजिटल युगातून मानवी युगाकडे

**सुनील गवळी**

आजची जेन झी पिढी एका विलक्षण संक्रमणकाळात जगत आहे. तिच्या हातात जगाशी जोडणारे तंत्रज्ञान आहे, ज्ञानाची असंख्य दारे खुली आहेत आणि स्वतःच्या भविष्याच्या अनेक शक्यता तिच्यासमोर आहेत. परंतु या अमर्याद शक्यतांसोबतच निवडींचा गोंधळ, सतत बदलणारे व्यावसायिक जग, वाढती स्पर्धा आणि स्वतःला सिद्ध करण्याचा दबावही आहे. म्हणून जेन झीकडे केवळ 'डिजिटल पिढी' म्हणून पाहणे पुरेसे नाही. ही अशी पिढी आहे जिला तंत्रज्ञानासोबत जगण्याची सवय आहे; परंतु तिच्या खऱ्या सामर्थ्याची कसोटी तंत्रज्ञानाच्या वापरात नसून, त्याचा उपयोग मानवी जीवन अधिक अर्थपूर्ण करण्यासाठी किती करता येतो यात आहे.

आज माहिती मिळविणे अत्यंत सोपे झाले आहे. काही क्षणांत असंख्य माहिती आपल्या हातात येते. मात्र माहिती मिळविणे आणि ज्ञान निर्माण करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. उपलब्ध माहितीचे परीक्षण करणे, तिची सत्यता तपासणे, तिचा अर्थ समजून घेणे आणि त्यातून योग्य निर्णय घेणे यासाठी विचारांची शिस्त आवश्यक आहे. म्हणून जेन झीसमोरचा खरा प्रश्न 'मला किती माहिती आहे?' हा नसून, 'माझ्याकडे असलेल्या माहितीचा मी किती शहाणपणाने उपयोग करतो?' हा आहे. माहितीचे ग्राहक होण्यापेक्षा ज्ञानाचे निर्माते आणि समस्यांचे निराकरण करणारे नागरिक होणे ही या पिढीची खरी गरज आहे.

बदलत्या रोजगारविश्वामुळेही जेन झीसमोर नवी आव्हाने उभी आहेत. केवळ पदवी मिळविणे आता पुरेसे राहिलेले नाही. एखाद्या विषयाचे ज्ञान प्रत्यक्ष कामात वापरता येणे, नवीन परिस्थितीत शिकता येणे, इतरांशी प्रभावी संवाद साधता येणे आणि समस्यांवर स्वतंत्रपणे उपाय शोधता येणे या क्षमतांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विस्तारामुळे कामाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाकडे केवळ रोजगार हिरावून घेणारी शक्ती म्हणून पाहणे योग्य नाही. त्याचा प्रभावी आणि सर्जनशील वापर करणारा मनुष्य भविष्यात अधिक सक्षम ठरेल. यासाठी सतत शिकण्याची मानसिकता आवश्यक आहे. शिक्षणाची समाप्ती पदवी मिळाल्यावर होत नाही; उलट बदलत्या जगात पदवी ही पुढील शिक्षणाची सुरुवात ठरते.

जेन झीने तांत्रिक कौशल्यांसोबत मानवी कौशल्यांनाही समान महत्त्व दिले पाहिजे. संवादकौशल्य, चिकित्सक विचार, सर्जनशीलता, निर्णयक्षमता, नेतृत्व, सहकार्य, वेळेचे नियोजन आणि भावनिक समतोल ही कौशल्ये कोणत्याही तंत्रज्ञानापेक्षा दीर्घकाळ उपयोगी ठरणारी मानवी संपत्ती आहेत. विविध भारतीय आणि परदेशी भाषांचे ज्ञानही या पिढीसाठी नव्या शक्यता निर्माण करू शकते. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून, विविध समाज आणि संस्कृती समजून घेण्याची खिडकी आहे. जगाशी जोडले जाण्याच्या या काळात बहुभाषिकता युवकांच्या ज्ञानविश्वाला आणि व्यावसायिक क्षमतेला अधिक व्यापक करू शकते.

रोजगाराच्या संधींचा विचार करताना जेन झीने केवळ नोकरी मिळविण्यापुरता दृष्टिकोन ठेवू नये. समस्या ओळखणे, त्यावर नवे उपाय शोधणे आणि उपलब्ध साधनांतून मूल्य निर्माण करणे ही उद्योजकीय वृत्ती प्रत्येक युवकासाठी उपयुक्त आहे. उद्योजकता म्हणजे केवळ मोठा व्यवसाय उभा करणे नव्हे; तर एखाद्या गरजेकडे नव्या दृष्टिकोनातून पाहून तिच्यावर परिणामकारक उपाय शोधणे होय. अशा वृत्तीमुळे युवक स्वतःच्या क्षमतेकडे नव्या दृष्टीने पाहू शकतो आणि रोजगाराच्या बदलत्या जगात स्वतःसाठी नवे मार्ग निर्माण करू शकतो.

परंतु जेन झीच्या जीवनातील आव्हाने केवळ करिअरपुरती मर्यादित नाहीत. सतत ऑनलाइन असणे, सामाजिक माध्यमांवरील तुलना, आभासी जगातील मान्यता मिळविण्याची धडपड आणि सतत उपलब्ध असलेले मनोरंजन यामुळे मनाची एकाग्रता, संयम आणि अंतर्मुख होण्याची क्षमता कमी होऊ शकते. डिजिटल साधने स्वतःमध्ये समस्या नाहीत; त्यांचा अनियंत्रित वापर समस्या बनू शकतो. म्हणून जेन झीला डिजिटल स्वातंत्र्याबरोबर डिजिटल शिस्तही शिकावी लागेल. काही काळ स्क्रीनपासून दूर राहणे, शारीरिक हालचालींना स्थान देणे, निसर्गाशी जोडले जाणे आणि स्वतःसोबत शांतपणे वेळ घालविणे हे आधुनिक जीवनातील आवश्यक संतुलन ठरू शकते.

या सगळ्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेन झीने जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक आणि वास्तववादी दृष्टिकोन विकसित करणे. सकारात्मक विचार म्हणजे प्रत्येक परिस्थिती चांगलीच आहे असे मानणे नव्हे किंवा अडचणींकडे डोळेझाक करणेही नव्हे. परिस्थिती कठीण असली तरी त्यातून मार्ग शोधता येतो, चूक झाली तरी त्यातून शिकता येते आणि आजची परिस्थिती कायमची नसते, असा विश्वास मनात ठेवणे म्हणजे सकारात्मक दृष्टिकोन. आजच्या युवकांसमोर माहिती आणि संधींची कमतरता नाही; परंतु अनेकदा स्वतःची इतरांशी होणारी तुलना त्यांच्या आत्मविश्वासाला कमी करते. इतरांच्या यशाचे बाह्य चित्र पाहून स्वतःच्या आयुष्याचे मूल्य ठरविणे योग्य नाही. प्रत्येक व्यक्तीचा प्रवास वेगळा असतो. त्यामुळे तुलना कमी करून स्वतःच्या प्रगतीकडे लक्ष देणे ही जेन झीने आत्मसात करण्याची महत्त्वाची मानसिक सवय आहे.

अपयशाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलण्याची गरज आहे. एखादा निर्णय चुकला, अपेक्षित यश मिळाले नाही किंवा एखादी संधी हातातून गेली, म्हणून स्वतःची क्षमता संपली असे मानण्याची गरज नाही. अपयश हा व्यक्तिमत्त्वाचा निकाल नसून, प्रयत्नांच्या प्रक्रियेतील एक टप्पा आहे. 'मी अपयशी ठरलो' याऐवजी 'या अनुभवातून मला काय शिकता आले?' असा प्रश्न विचारण्याची सवय युवकांना अधिक सक्षम बनवू शकते. याचप्रमाणे बदलाकडे पाहण्याची दृष्टीही सकारात्मक असली पाहिजे. तंत्रज्ञान बदलेल, रोजगाराच्या पद्धती बदलतील, काही कौशल्यांचे महत्त्व कमी होईल आणि नवीन कौशल्यांना मागणी निर्माण होईल. या बदलांकडे सतत धोक्याच्या दृष्टीने पाहिल्यास असुरक्षितता वाढेल; परंतु बदल म्हणजे स्वतःला नव्याने घडविण्याची संधी असे मानल्यास त्यातून नवीन शक्यता निर्माण होतात.

जेन झीने स्वतःशी संवाद साधण्याची पद्धतही सकारात्मक ठेवली पाहिजे. 'माझ्याकडून हे होणार नाही', 'माझ्यात क्षमता नाही' अशा विचारांची सतत पुनरावृत्ती आत्मविश्वास कमी करू शकते. त्याऐवजी 'मी प्रयत्न करू शकतो', 'मला हे शिकता येईल', 'माझ्याकडून चूक झाली आहे, पण ती सुधारता येईल' असा वास्तववादी आत्मसंवाद मनाला कृतीकडे घेऊन जातो. स्वतःशी बोलण्याची पद्धत बदलली की स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. प्रत्येक समस्येचे उत्तर लगेच मिळाले पाहिजे, अशी अपेक्षाही टाळली पाहिजे. काही प्रश्नांना वेळ लागतो, काही निर्णय अनुभवातून स्पष्ट होतात आणि काही संधी योग्य वेळी उपलब्ध होतात. त्यामुळे संयम हा निष्क्रियतेचा गुण नसून, योग्य वेळेपर्यंत प्रयत्न सुरू ठेवण्याची मानसिक ताकद आहे.

सकारात्मक दृष्टिकोन म्हणजे केवळ आनंदी राहण्याचा प्रयत्न नव्हे; तो जबाबदारी स्वीकारण्याचा दृष्टिकोन आहे. परिस्थिती प्रतिकूल असली तरी 'मी यामध्ये काय करू शकतो?' हा प्रश्न विचारणे, आपल्या हातातील गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आणि शक्य त्या कृतीपासून सुरुवात करणे ही सकारात्मकतेची खरी ओळख आहे. जेन झीला अशा मानसिकतेची गरज आहे जी अडचणींना घाबरत नाही, यशाने अहंकारी होत नाही, अपयशाने खचत नाही आणि बदलामुळे दिशाहीन होत नाही. आशावादाला विवेकाची जोड, आत्मविश्वासाला प्रयत्नांची जोड आणि स्वप्नांना कृतीची जोड मिळाली, तर सकारात्मक दृष्टिकोन ही केवळ मानसिक अवस्था न राहता जीवन जगण्याची शक्ती बनू शकते.

शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक संतुलनही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक गोष्ट त्वरित मिळावी, प्रत्येक प्रयत्नाचे लगेच परिणाम दिसावेत आणि प्रत्येक क्षणी आपण इतरांपेक्षा पुढे असावे, अशी अपेक्षा तरुण मनावर अनावश्यक दबाव निर्माण करू शकते. प्रत्यक्षात विकास ही हळूहळू घडणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे स्वतःला वेळ देणे, आपल्या क्षमतेचा स्वीकार करणे आणि प्रगतीकडे सातत्याने पाहणे आवश्यक आहे.

या प्रवासात कुटुंबाची भूमिकाही बदलण्याची गरज आहे. युवकांना सतत सूचना देण्यापेक्षा त्यांना ऐकून घेणे, त्यांच्या निर्णयांमागील विचार समजून घेणे आणि योग्य वेळी मार्गदर्शन करणे अधिक प्रभावी ठरते. अपेक्षा असाव्यात; परंतु त्या विश्वासावर आधारित असाव्यात. संवाद हा दबावापेक्षा अधिक परिणामकारक असतो. समाजानेही जेन झीकडे संशयाने किंवा केवळ तिच्या डिजिटल सवयींच्या चष्म्यातून पाहू नये. प्रत्येक पिढीची जगाकडे पाहण्याची पद्धत वेगळी असते. नव्या पिढीचे प्रश्न समजून घेऊन तिच्या कल्पनांना, प्रयोगांना आणि नव्या विचारांना योग्य व्यासपीठ मिळाले पाहिजे.

शैक्षणिक संस्थांची जबाबदारीदेखील तितकीच मोठी आहे. शिक्षण केवळ परीक्षेतील यशाभोवती केंद्रित राहता कामा नये. विद्यार्थ्यांना विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची, प्रत्यक्ष अनुभव घेण्याची, प्रयोग करण्याची आणि स्वतःच्या कल्पनांना आकार देण्याची संधी मिळाली पाहिजे. आजच्या शिक्षणाने विद्यार्थ्याला केवळ 'उत्तर' देण्यास शिकविण्याऐवजी 'योग्य प्रश्न' विचारण्यास शिकविणे आवश्यक आहे. कारण बदलत्या जगात तयार उत्तरे कमी आणि नव्या समस्यांची संख्या अधिक असणार आहे. म्हणून स्वतंत्र विचार करण्याची क्षमता हीच भविष्यातील मोठी ताकद ठरेल.

ग्रामीण आणि शहरी युवकांमधील संधींचे अंतर कमी करणेही आवश्यक आहे. प्रतिभा कुठेही जन्म घेऊ शकते; मात्र तिच्या विकासासाठी आवश्यक साधने सर्वत्र समान असतीलच असे नाही. आधुनिक कौशल्य प्रशिक्षण, डिजिटल सुविधा, योग्य मार्गदर्शन, करिअरविषयक माहिती आणि प्रत्यक्ष अनुभव यांची उपलब्धता व्यापक झाली तर अनेक सुप्त क्षमता विकसित होऊ शकतात.

जेन झीसमोर आजचा सर्वांत महत्त्वाचा मंत्र असा असू शकतो.शिका, प्रश्न विचारा, प्रयोग करा, चुकांमधून शिका, स्वतःला बदला आणि पुढे चला. भविष्यात एका कौशल्यावर आयुष्यभर अवलंबून राहण्याचा काळ संपत आहे. बदलत्या जगात स्वतःला पुन्हा शिकविण्याची क्षमता असलेली व्यक्तीच दीर्घकाळ सक्षम राहील. करिअरची दिशा बदलणे, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे किंवा नव्या क्षेत्रात प्रवेश करणे ही अस्थिरतेची नव्हे, तर शिकण्याची तयारी दर्शविणारी चिन्हे असू शकतात.

मात्र या संपूर्ण प्रवासात एक गोष्ट विसरता कामा नये.तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी माणूसपणाची किंमत कमी होणार नाही. उलट कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या प्रभावामुळे संवेदनशीलता, विवेक, कल्पकता, नैतिकता, सहकार्य आणि मानवी नात्यांचे महत्त्व अधिक वाढणार आहे. म्हणून जेन झीचे खरे सामर्थ्य तिच्या हातातील मोबाईलमध्ये नाही, तिच्या वापरातील तंत्रज्ञानातही नाही; ते तिच्या विचार करण्याच्या पद्धतीत आहे. तंत्रज्ञानाचा वेग आणि मानवी विवेक यांचा समतोल साधणारी पिढी निर्माण झाली तरच डिजिटल प्रगतीला मानवी अर्थ प्राप्त होईल.

जेन झीला केवळ भविष्यासाठी तयार करण्याची गरज नाही; तिला वर्तमान घडविण्याची संधी देण्याची गरज आहे. तिला आदेशांपेक्षा विश्वास, स्पर्धेपेक्षा सहकार्य, माहितीपेक्षा विवेक, प्रमाणपत्रांपेक्षा कौशल्य आणि आभासी मान्यतेपेक्षा वास्तवातील आत्मविश्वास मिळाला, तर ही पिढी केवळ बदलत्या जगाशी जुळवून घेणार नाही तर ती जगाच्या बदलाची दिशा ठरवू शकेल.

जेन झी ही केवळ डिजिटल युगाची पिढी नाही; ती डिजिटल युगाला मानवी अर्थ देण्याची संधी आहे. ●

# ‘नाव मोठं की कर्तृत्व?’

**भारतीय संस्कृतीच्या विशाल परंपरेत शकुंतला हे नाव केवळ एक नाव नाही; त्यामागे त्याग, संस्कार, प्रेम, संघर्ष, मातृत्व आणि आत्मसन्मानाची प्रदीर्घ कथा आहे. महर्षी कण्वांच्या आश्रमात वाढलेली शकुंतला, राजा दुष्यंताशी झालेली तिची भेट, दुर्वासांचा शाप, हरवलेली राजमुद्रा आणि अखेरीस झालेली पुनर्भेटया कथेतून भारतीय संस्कृतीने प्रेमाबरोबरच कर्तव्य, संयम आणि सत्याची परीक्षा यांचेही दर्शन घडवले.**



धनंजय शेटये

“नावाला इतिहास असतो; पण त्या नावाला अर्थ देण्याचं काम कर्तृत्व करतं.”

तिच्या पोटी जन्मलेला भरत पुढे पराक्रम आणि कर्तृत्वाने चक्रवर्ती सम्राट झाला आणि त्याच्या नावावरून आपल्या भूमीला भारत हे नाव लाभले, अशी पौराणिक परंपरा सांगते.

पण आज प्रश्न वेगळा आहे.

आपण नावं घेतो; पण त्या नावामागचा अर्थ जगतो का?

आज एखाद्या मुलाचं नाव ‘शकुंतला’, ‘भरत’, ‘विश्वामित्र’, ‘दुष्यंत’ किंवा एखाद्या महान व्यक्तिमत्त्वाच्या नावावर ठेवले की आपण त्या नावाचा वारसा पुढे नेतो, असे आपोआप होत नाही. नाव वारसा देत नाही; आचरण वारसा निर्माण करते.

याच ठिकाणी आजच्या सामाजिक आणि संस्थात्मक जीवनाकडे पाहण्याची गरज निर्माण होते.

**चमचेगिरी आणि लाचारी : कर्तृत्वाची पर्यायी व्यवस्था?**

कावळा कितीही उंच उडून राजमहालाच्या कळसावर जाऊन बसला, तरी त्याचे रूपांतर गरुडात होत नाही.

ही साधी उपमा आपल्या व्यवस्थेतील एका गंभीर वास्तवाकडे बोट दाखवते.

काही ठिकाणी ज्ञानापेक्षा जवळीक, कर्तृत्वापेक्षा चापलुसी आणि प्रामाणिकपणापेक्षा वशिला महत्त्वाचा ठरतो. ज्यांच्याकडे क्षमता कमी असते, ते अनेकदा आपल्या उणिवा झाकण्यासाठी सत्ताधाऱ्यांच्या भोवती फिरण्याचा मार्ग स्वीकारतात.

मालकाची बॅग उचलणे, गोड बोलणे, सतत खुशामत करणे, प्रत्येक निर्णयाला मान डोलावणे या गोष्टी जर एखाद्याच्या प्रगतीच्या पायऱ्या बनल्या, तर प्रश्न त्या व्यक्तीचा कमी आणि व्यवस्थेच्या मूल्यांचा अधिक आहे.

कारण खरी समस्या चापलूस व्यक्ती नसते.

खरी समस्या म्हणजे चापलुसीला बक्षीस देणारी व्यवस्था.

संस्था कोणाची एका व्यक्तीची की सर्वांची?

कोणतीही संस्था एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक मालमत्तेसारखी नसते. ती अनेकांच्या श्रमातून उभी राहते.

परंतु जेव्हा अधिकार एखाद्या व्यक्तीच्या हातात केंद्रित होतात आणि त्यावर नियंत्रण राहत नाही, तेव्हा संस्था हळूहळू व्यक्तिकेंद्रित होऊ लागते.

मग गुणवत्तेपेक्षा नातेसंबंध महत्त्वाचे ठरतात. आपल्या कुटुंबातील भाचा, नणंद, आत्या, मावशी, पुतण्या नात्यांची साखळी संस्थेत वाढत जाते; आणि कर्तृत्वाची दारे अरुंद होत जातात.

जिथे प्रश्न असायला हवा.

“हा माणूस संस्थेसाठी काय करू शकतो?”

तिथे प्रश्न बदलून होतो

“हा माणूस आपला कोण?”

हीच कोणत्याही संस्थेच्या अधःपतनाची सुरुवात असते.

प्रामाणिक माणसाला वनवास का?

व्यवस्थेतील सर्वांत वेदनादायक चित्र तेव्हा दिसते, जेव्हा काम करणाऱ्याला शिक्षा आणि खुशामत करणाऱ्याला बक्षीस मिळते.

जो कर्मचारी उन्हातान्हात काम करतो, अतिरिक्त जबाबदाऱ्या पेलतो, संस्थेच्या अडचणीच्या काळात उभा राहतोत्याच्याच वाट्याला जर अस्थिरता, अन्याय आणि मानसिक त्रास आला, तर त्याच्या मनात एक प्रश्न निर्माण होतो.

“प्रामाणिकपणे काम करण्याचा हा मोबदला आहे का?”

आणि जेव्हा हा प्रश्न एका व्यक्तीच्या मनात राहत नाही, तर संपूर्ण कर्मचाऱ्यांच्या मनात निर्माण होतो, तेव्हा संस्थेची इमारत उभी असली तरी तिचा नैतिक पाया ढासळलेला असतो.

अधिकार म्हणजे मालकी नव्हे

पद मिळणे ही उपलब्धी असू शकते; पण पदाला न्याय देणे ही खरी पात्रता आहे.

अधिकार मिळाला म्हणजे आपण मोठे झालो असे होत नाही.

उलट, अधिकार जितका मोठा तितकी जबाबदारी मोठी.

संस्थेच्या पैशाकडे स्वतःच्या पैशासारखे पाहणे, संस्थेतील कर्मचाऱ्यांकडे कुटुंबियांसारखे नव्हे तर गुलामांसारखे पाहणे, स्वतःच्या माणसांसाठी नियम वाकवणे आणि इतरांसाठी नियम कठोर ठेवणेही नेतृत्वाची लक्षणे नाहीत.

हा अधिकाराचा गैरवापर आहे.

काळाचा न्यायालय सर्वांत मोठे असते माणूस काही काळ दुसऱ्यांना फसवू शकतो. सत्तेच्या जोरावर काही काळ सत्य दडपले जाऊ शकते. पैशाच्या जोरावर काही काळ प्रश्न शांत केले जाऊ शकतात.

पण काळाला ना पैसा विकत घेता येतो, ना चापलुसीने प्रसन्न करता येते. ज्यांनी इतरांच्या हक्कांवर अन्याय केला, त्यांना कधीतरी स्वतःच्या कर्मांचा आरसा पाहावा लागतो.

सत्ता हातातून गेल्यावर कोण आपल्यासोबत उभे राहते, हा त्या व्यक्तीच्या खऱ्या कर्तृत्वाचा सर्वांत मोठा कस असतो.

कारण पद गेल्यावर जर माणसाभोवतीची गर्दी नाहीशी झाली, तर कदाचित ती गर्दी माणसाभोवती नव्हे त्याच्या खुर्चीभोवती होती.

शेवटी उरते ती केवळ ओळख.

शकुंतलेला तिच्या नावामुळे महानता मिळाली नाही.

तिच्या जीवनातील संघर्ष, संस्कार आणि कथेतून तिचे नाव अमर झाले.

भरताला केवळ राजघराण्यात जन्म मिळाल्यामुळे इतिहासात स्थान मिळाले नाही; त्याच्या कर्तृत्वाने त्याचे नाव इतिहासात कोरले गेले.

म्हणूनच आज प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

आपण आपल्या नावाला मोठेपणा देतोय की आपल्या नावाचा आधार घेऊन मोठेपणा मिरवतोय?

पद आहे म्हणून आदर मिळतोय की व्यक्तिमत्त्वामुळे?

लोक आपल्यासोबत आहेत की आपल्या अधिकारासोबत?

आपल्या अनुपस्थितीतही आपले काम बोलते का?

आणि सर्वांत महत्त्वाचे

आपण मागे सोडून जाणार आहोत ते नाव की एक आदर्श?

कारण शेवटी इतिहास नावांची नोंद घेत नाही; तो कर्तृत्वाची नोंद घेतो.

चमचेगिरीने खुर्ची मिळू शकते,
वशिल्याने पद मिळू शकते,
पैशाने प्रतिष्ठेचा आभास निर्माण होऊ शकतो.

पण खरी उंची मिळवण्यासाठी कर्तृत्व, चारित्र्य, प्रामाणिकपणा आणि माणुसकीच लागते. आणि म्हणूनच “कावळा कळसावर बसला म्हणून आकाशाचा राजा होत नाही; उंच भरारी घेण्यासाठी पंखांमध्ये बळ आणि आकाशाला भिडण्याची पात्रता असावी लागते.” ●

# गांधींच्या सहवासात एक आठवडा




पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

गांधींच्या सहवासात एक आठवडा, लुई फिशर यांच्या मूळ इंग्रजी पुस्तकाचा, अंबरीश मिश्र यांनी केलेला मराठी अनुवाद, साप्ताहिक साधनाने, ७९ वा वर्धापनदिन अंक, या स्वरूपात प्रकाशित केला आहे. ’या अनुवादाचे स्वागत असो!’ या शीर्षकान्वये विनोद शिरसाठ यांनी या अनुवादाचे स्वागत केले आहे. गेली वीस वर्षे हा अनुवाद त्यांच्या विचाराधीन होता.अंबरीश मिश्र यांनी ’अनुवादकाचे मनोगत’मध्ये सविस्तरपणे आपली भूमिका मांडली आहे. त्यांच्या मते, हा पौर्वात्य-पाश्चात्य संस्कृतींचा समंजस संवाद आहे. या पुस्तकावर ’चले जाव’ आंदोलनाची सावली पडली आहे. ३ जून १९४२रोजी फिशर वर्ध्याला आले, आठवडाभर राहिले. तेथे राहून गांधींशी त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. रोजनिशीच्या स्वरूपात हे लेखन केले गेले. “गांधींशी झालेली चर्चा, हा मला उन्नत आणि आतून समृद्ध करणारा अनुभव होता“ असे फिशर यांनी सुरुवातीलाच नमूद केले आहे. २७ तासांचा आगगाडीचा प्रवास, धूळ, उकाडा सहन, करत रात्री साडेआठ वाजता वर्ध्याला पोहोचल्यावर, काँग्रेस पक्षाच्या अतिथीगृहामध्ये दुसऱ्या मजल्यावरच्या पोर्चमध्ये ते झोपले होते. दुसऱ्या दिवशी त्यांनी सेवाग्रामकडे टांग्यातून प्रयाण केले. उंच तपकिरी गोऱ्या रंगाच्या गांधींचे त्यांना प्रथमच दर्शन झाले. गांधींनी हस्तांदोलन करून स्वागत केले. अतिथी निवासामध्ये त्यांची व्यवस्था केली गेली. महादेव देसाईंशी त्यांची भेट झाली. त्यांनी आश्रमातील भोजनाचा प्रथमच आस्वाद घेतला होता. त्यांना आंबा कसा चोखून खायचा, हेही गांधींनी दाखवले. तीन वाजता फिशर यांची गांधींशी तासभर बातचीत झाली त्यावेळी क्रिप्सभेटीसंबंधी विविध प्रश्न विचारले आणि गांधींची मते जाणून घेतली.

“मी एक अपुरा माणूस आहे“ असे गांधींनी फिशर यांना गप्पांच्या वेळी सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी खुर्शेद यांनी, बिस्किटे, लोणी, मध आणि आंबे न्याहारीसाठी आणले. फिशर लिहितात, “माशा आणि मुंग्या माझ्या स्पर्धेत उतरल्याने घाईघाईत न्याहारी उरकली.“ टिपणे टाईप करत असताना नरेंद्र देव आणि आर्यनायकम् आल्यामुळे कामात खंड पडला. त्या दोघांना रशियासंबंधी त्यांच्याशी बोलायचे होते.फिशर म्हणाले, “स्वातंत्र्य नुसतं पुरेसं नाही, स्वातंत्र्यानंतर भारताचे खरे प्रश्न सुरू होतील.“ सुभाषबाबू भारतातून पलायन करून जर्मनीत गेले. तेथील रेडिओवरून त्यांनी ब्रिटिश राजवटीला विरोध करणारे भाषण केल्याचा उल्लेखही आहे. दुपारी तीन वाजता, गांधी कुटीत, गांधींशी प्रश्नोत्तरे झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचे चित्र कसे असेल, याविषयी चर्चा झाल्याचा उल्लेख आहे. तिसऱ्या दिवशी सकाळी गांधींच्यामागे फिशर चालत होते.भाज्यांची चव आवडत नसल्याचे फिशर यांनी दुपारच्या जेवणाबद्दल सांगितले. दुपारच्या चर्चेमध्ये काँग्रेस पक्षाबद्दल लुई यांची गांधींशी सविस्तर चर्चा होते. भारतातील शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा दूर करण्यासाठी युरोपप्रमाणे भू-बँका सुरू करण्याचा विचार फिशर यांनी मांडला. स्वातंत्र्य मिळण्याआधी हे करणे शक्य नाही, असे गांधींनी उत्तर दिले. अमेरिका-ब्रिटन यांची मैत्री, संयुक्त राष्ट्रसंघ इ. विषयही त्यामध्ये आले होते.गांधींच्या सूचनेनंतर फिशर यांनी त्यांच्या मनातील चार प्रश्न त्यांना लिहून पाठवले. त्यावर ’हरिजन’मध्ये गांधींनी उत्तरे दिली होती. जेवताना दोघांमध्ये गमतीशीर संवादही होत होते. गांधी म्हणाले, “तुम्ही माझ्या भाज्यांचा अजूनही अव्हेर करताहात.” फिशर म्हणतात, “एक माणूस म्हणून, नेता आणि मुत्सद्दी म्हणून मी तुमचा आदर करतो; स्वयंपाकी म्हणून नाही.” लुई म्हणतात, वृत्तपत्र वाचण्यात इथे कोणालाही रस नाही.सेवाग्रामात रेडिओ नाही. नेहरूंसारखे अपवाद वगळता, एरवी भारतीय माणसे गावात नि गावापुरती जगतात. दुसरे महायुद्ध आणि बाहेरचे जग या गोष्टी फार दूरवरच्या गोष्टी, असे फिशर नोंदवितात. चौथ्या दिवशी फिशर यांनी चर्चेत, गांधींना अस्पृश्यांच्या परिस्थितीत काही सुधारणा आहे काय? असे विचारले. त्यावर गांधी म्हणाले “होय, पण अजून वाईटच आहे.” गांधींनी चर्चिल, रुझवेल्ट यांच्याविषयी लुई यांना विचारले होते. आश्रमात नेहरू आल्यानंतर त्यांच्याशीही लुई यांची चर्चा झाली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संघराज्य व्यवस्थेसारखे काहीतरी करावे लागेल, असे गांधींना वाटत होते. फिशर यांनी रशिया आणि अन्यत्र याबाबत, त्यांना जे अनुभव आले त्याविषयी सांगितले की, सर्व शक्तिमान राज्यसंस्था हा जगासमोरचा सर्वात बिकट धोका आहे. शक्तिशाली राज्यसंस्थेमुळे व्यक्तिगत स्वातंत्र्य अशक्य होते. भांडवलशाही अर्थकारणामुळे आर्थिक बाबतीत राज्यसंस्थेचा हस्तक्षेप सतत वाढत राहतो. त्यामुळे राज्यसंस्थेच्या हाती पुष्कळ सत्ता एकवटते. पाचव्या दिवशी भारताच्या वाढत्या लोकसंख्येविषयी चर्चा झाली. ‘जन्मनियंत्रण हे एक उत्तर असू शकते. पण माझा त्याला विरोध आहे.’ असे गांधी म्हणाले. पुन्हा सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाकडे गांधींचा कल होता.१० जून१९४२ हा लुई यांचा सेवाग्राममधील शेवटचा दिवस. त्यांची तेथे आलेल्या नेहरू आणि मौलाना यांच्याशी चर्चा झाली. दुपारी आझाद, नेहरू यांच्यासह ते वर्ध्याच्या काँग्रेस हॉस्टेलच्या दिशेने निघाले. निरोप घेत असताना गांधींनी त्यांच्याशी अगदी कडक शेकहँड केला आणि “पुन्हा या!” असे म्हणाले. फिशर आणि गांधी यांच्या भेटीचे वेळी, गांधींचे वय ७२ वर्षे होते, तर लुई ४६ वर्षांचे होते. नंतरच्या सात दिवसांत लुई न्यूयॉर्कला पोहोचले. गांधींनी त्यांच्याजवळ राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांना देण्यासाठी एक पत्रही दिले होते. लुई फिशर (१८९६-१९७०) यांच्या जीवनकार्याविषयी अंबरीश मिश्रा यांनी लिहिले आहे. लुई फिशर यांचा अमेरिकेच्या फिलाडेल्फिया प्रांतात, एका गरीब कुटुंबात जन्म झाला. काही काळ शिक्षकीपेशा स्वीकारल्यानंतर ते पत्रकार झाले. १९२२मध्ये विवाहानंतर दोघे रशियाला गेले. रशियात काही वर्षे राहिल्यानंतर परत मायदेशी परतले. हिटलर वगळता, स्टालिन, चर्चिल, फ्रँकलिन रुझवेल्ट, पं.नेहरू अशा अनेक जागतिक नेत्यांना फिशर सतत भेटत होते.देश-विदेशातील मुत्सद्दी, संपादक, वृत्तपत्रांचे मालक, उद्योगपती, बर्नार्ड शॉ, लास्की अशा थोरांशी त्यांचा स्नेह होता. त्यांची विविध पुस्तके गाजली. ‘द लाइफ ऑफ महात्मा गांधी’ (१९५०) या पुस्तकावर आधारित रिचर्ड ॲटनबरो यांच्या

‘गांधी’ (१९८२) चित्रपटाला जगभर उदंड प्रतिसाद लाभला आणि अनेक पुरस्कारही! लुई फिशर यांनी गांधीवादी कार्यकर्ते, ब्रिटिश अधिकारी आणि ज्या नेत्यांचा उल्लेख केला आहे, त्यांचा सचित्र परिचय करून देण्यात आला आहे. शेवटी अंबरीश मिश्र यांचा सविस्तर सचित्र परिचय दिला आहे.

लुई फिशर यांच्या गांधींशी झालेल्या दीर्घ चर्चा, त्यांचे आश्रमातील निरीक्षण मनोवेधक आहे. १९४२ मधील, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि भारतातील स्वातंत्र्यचळवळीचा विलक्षण धामधुमीचा काळ, हा विषय त्याकाळी अत्यंत महत्त्वाचा होता. परंतु आजच्या सर्वसामान्य वाचकांना त्याची फारशी कल्पना नसण्याचीच शक्यता आहे. गांधींच्या तत्कालीन जीवनाची, त्यांच्या विचारांची आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरचे महान व्यक्तिमत्त्व म्हणून, त्यांचा उत्तम परिचय, या अंकाद्वारे सुजाण वाचकांना होतो आहे. ●

# उदात्तहेतू पूर्वक गणेशोत्सव व्हावेत!


**तू सुखकर्ता तु दुःखहर्ता ।
विघ्नविनाशक मोरया !**

गणेश उत्सवाच्या आगमनावर नुकताच पुणे शहरात एक वाद निर्माण होत आहे, तो म्हणजे ध्वनी प्रदूषण आणि गणेश उत्सव साजरा करण्याबाबत. धार्मिक मुलतत्व समजून घेतली तर वादाचे मुद्दे मागे पडतील. निश्चितपणे सुखकर्ता मनातलं दुःख हरण करेल.

भारतात सण, उत्सवांची एक महान परंपरा व संस्कृती आहे. भारतात सारे सण मोठ्या उत्सवाने आनंदोत्स्व साजरा करत असतात. गणेश उत्सव हा दहा दिवसांचा आनंदऋतू होय.

संकटहरण करणारा गणराय आणि त्याचा उत्सव हा समाजहित जोपासत एक आदर्श त्यानिमित्त आदर्श निर्माण केला पाहिजे. पुण्यातील विद्यानंद बापट येत असलेल्या गणेशउत्सवात डीजे बाबत विरोधी भूमिका घेतली त्यामुळे त्याविरोधात सण कसे असावेत चर्चा झडू लागल्या आहेत. बापट यांनी काही तर्क मांडले त्यात उत्सवाला विरोध नाही, पण विद्रुपीकरण नको, संस्कृती विरुद्ध विकृती, सर्वसामान्यांचे आरोग्य आणि हक्क, कायद्याचे पालन, समान नियमांची गरज या गोष्टी विचारात घेतल्या तर प्रत्येक धर्मात असे सण, जयंती, उत्सव, यात्रा यांच्या नावाखाली वाढते विद्रुपीकरण मात्र जाणवत आहे ते सामाजिक व धार्मिक दृष्ट्या घातक आहे. यांची प्रत्येक धर्म प्रमुखांनी मीमांसा केली पाहिजे.

श्री गणरायाचे आगमन एक नवं चैतन्य निर्माण करत असते. आनंदाची पवर्णीच असते. पण याबरोबर एक उत्साही वर्ग उत्सवाच्या नावाखाली धार्मिक व सामाजिक भान विसरून जाऊन पावित्र्य धोक्यात आणून जनमनात प्रतिमा बिघडवण्याचे काम करत असतो. लोक परंपरा, संस्कृती संवर्धन अशा मोठ्या



सणांतून करण्याची अपेक्षा असते, परंतू त्याकडे हेतू पुरस्पर दुर्लक्ष केले जाते. पारतंत्र्याच्या काळात गणेशोत्सव सुरु करण्यामागे धार्मिक व सांस्कृतिक ध्रुवीकरण होऊन भारतीय समाज्यात एक मरगळ आली होती. स्वातंत्र्याचा हेतू उराशी ठेऊन समाज एकीकरणासाठी हरवलेला आत्मविश्वास पुर्नस्थापित करण्यासाठी गणेश उत्सवाचे सार्वजनिक स्वरूप केले होते. स्वातंत्र्यानंतर प्रत्येक धर्मात धार्मिकता वाढीस लावून सामाजिक हेतू लोप पावू लागला. त्याचा परिणाम अधिक कट्टरता वाढीस लागली. कोणत्याही धर्मात दुसऱ्या धर्माचा द्वेष शिकवला जात नाही. कट्टरपणाच्या द्वेषातून सामाजिक एकोपा बिघडवणारी वृत्ती तयार झाली याचा फायदा घेत त्यातून नवे राजकारणी जन्माला आले. तासंतास चालणारा डीजेचा दणदणाट त्यातून ध्वनी प्रदूषण होताना त्याचा थेट मानवी शरीरावर दूष परिणाम होत आहे. याचा विचार करता आत्मपरीक्षणाची गरज आहे.

धावपळीच्या युगात लोकांना सण साजरे करण्यास पुरेसा वेळ नाही. त्यामुळे मानसिक व शारीरक आरोग्य धोक्यात आले आहे. यातून असे तणाव नको म्हणत जीवन जगण्याचा मार्ग प्रत्येकाला हवा आहे. कोणत्याही जाती, धर्माचा सण, उत्सव असेल तर पोलीस वाहतूक नियमन व शांतता राखण्यासाठी कसोशीने प्रयत्न करतात. उत्सव संपे पर्यंत पोलीस कार्यरत असतात. प्रत्येक नागरिकाला आपल्या कार्यात बाधा येणार नाही याची काळजी घेत मार्ग काढून देतात. त्यात थोडासा विलंब होत असेल पण तेढ निर्माण होणार नाही यांची काळजी बारकाईने घेतली जाते. म्हणून आपण आपला कार्यक्रम, सण निर्विघ्नपणे पार पाडतो. यासाठी कायद्याचे बंधन अवश्य आहे. आज आपण आदर्शवत सण साजरे केल तर पुढील पिढी सुद्धा त्याचे अनुकरण करेल. आपली शिस्त हीच सामाजिक स्वास्थ्याचा पाया आहे.

उत्सवातून केवळ ध्वनी प्रदूषण होत नाही तर हवा, पाणी यांचेही प्रदूषण होते. सणावारांचे निर्माल्य ही सुद्धा महत्वाची

विठ्ठल-वळसेपाटील

बाब समजून घेण्याची गरज आहे. गणेशाची शाडूच्या मूर्ती जाऊन त्याठिकाणी प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती आल्याने विसर्जनावेळी त्या मूर्ती विरघळत नाही. तसेच निर्माल्य नदीत टाकले जाते. त्यामुळे जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. यामुळे जैवविविधता ही मोठ्या प्रमाणात नष्ट झाली आहे. नदी, तलावातील पाणी आटल्यावर ह्या मूर्ती उघड्या पडल्याने विटंबना होत आहे. शासनाने प्रत्येक उत्सवावेळी सुरक्षा व सामाजिक बांधिलकीचे आवाहन करत असते. विद्युत रोषणाईचा झगम गाट, मोठमोठे देखावे, दर्शनासाठी प्रचंड गोंधळ, दहा दिवसातून एकदा तरी नाचगाणी ठेवली जातात. विसर्जन मिरवणुकीत डीजे नाही तर एकाच वेळी शंभर ढोल ताशे वाजवले जातात. अश्या गोष्टींना शासनाने पायबंद घातला तरी ते सुरु असतात. मिरवणुकीतही शिस्तबद्ध पणा दिसत नाही. अनेकदा विसर्जनास विलंब व अपघात होत असतात. मिरवणूकमध्ये पोलीस यंत्रणेवर येणारा प्रचंड ताण कमी करण्यासाठी मोठी धावपळ करावी लागते.

बदलत्या काळाबरोबर परंपरा जपणारी राष्ट्रीय भावना वाढीस लावणारी अनेक मंडळे आहेत. अनेक गावांत एक गाव एक गणपती तर शहरात एक वार्ड एक गणपती संकल्पना आजही राबवली जात आहे. अनेक गावांत पर्यावरण पूरक गणेश उत्सव होत आहे. मूर्तीदान असाही एक उपक्रम नजरेस पडतो. उत्सवासाठी जमा झालेल्या पैशाच्या योग्य विनियोग केला जात आहे. अनेक सामाजिक कामांना प्राधान्य दिले जात आहे. अशा संकल्पना राबवल्याने मोठे यश पोलीस प्रशासनास आले आहे. जोपर्यंत सामाजिक एकोपा आहे तो पर्यंत सामाजिक वीण विस्कटवण्याचे धारिष्ट कोणी करू शकत नाही. यात घरोघरी गणपती स्थापना होताना एक आनंदाचा क्षण नागरिकांना अनुभवयास मिळणार आहे. विसर्जनावेळी ग्रामीण भागात विहिरी, तळी, तलाव,नदी उपलब्ध आहे. मोठं मोठ्या शहरात मुर्तीदान व पालिका प्रशासनाने दिलेल्या टाकी मध्ये विसर्जन होते. त्यास संकट समय ओळखून साथ देणे हे राष्ट्रकार्य समजावे. यातून सामाजिक दायित्व म्हणून अनेक दुर्बल घटकांस अर्थ साहाय्य, गावपातळीवर असलेल्या छोट्या समस्या यातून सोडवल्या जाव्यात. सामाजिक उपक्रम, पर्यावरण विषयक, शैक्षणिक धोरणे हाती घेऊन अनेक गावातून ग्रामविकासाला गणेश मंडळांनी चालना देतील असे चित्र साध्य निर्माण झाले आहे. नैसर्गिक व राष्ट्रीय आपत्ती असताना मोलाचे योगदान देणे अवश्य आहे. अश्या स्तुत्य उपक्रमांमुळे राष्ट्र भावना टिकून राहील. येणाऱ्या काळाला गवसणी घालण्याचे काम अनेक गणेश मंडळांनी केले आहे. पुण्यात पाणशेत धरण फुटल्यावर व इतर आपत्ती काळात गणेश मंडळांनी योगदान दिले होते. याची आठवण करून दिली पाहिजे. अनेक मंडळे आपली कर्तव्य पार पडताना दिसली.

गणपती ही बुद्धीची देवता आहे. तेव्हा मुलांची, जनतेची, बुद्धिमत्ता वाढीस लागेल, असे उपक्रम मंडळांनी राबवायला पाहिजेत. मंडळांनी रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिर, व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन, शेती विषयक मार्गदर्शन आयोजन करायला हवे. दुष्काळग्रस्त, पूरग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत करायला हवी. गरीब मुलांचे शैक्षणिक पालकत्व, पर्यावरणासाठी देशी वृक्ष लागवड, शाळेतील मुलासाठी ऑनलाईन सांस्कृतिक कार्यक्रम,वक्तृत्व, निबंध स्पर्धांचे आयोजन करायला हवे. समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचे व्याख्यान आयोजित करायला हवेत. हा उत्सव जितका साधेपणाने आणि विधायक मार्गाने साजरा केला जाईल, तितके त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल. सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रयोजन समाज एकत्रीत पणा जपणे, भेदाभेद दूर व्हावा, सामाजिक एकोपा, सामाजिकवीण असावी, लोकप्रबोधन बरोबर, मनोरंजन हवेच,संस्कृती व राष्ट्रविकास, ज्ञान यांची कास धरावी असा हा उदात्तहेतू असावा तरच येणाऱ्या काळात भारतीय संस्कृतीचे गोडवे जगभर गायले जातील. ●

# जिल्ह्यात दहीहंडी उत्सवाचा जल्लोष

। अलिबाग । प्रतिनिधी । गोपाळकाळा सणानिमित्त रायगड जिल्ह्यात दहीहंडीचा उत्सव साजरा करण्यात आला. जिल्ह्यामध्ये आठ हजार ८७० दहीहंड्याचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यात ठिकाणी मिरवणूका काढून उत्सव साजरा करण्यात आला. काही ठिकाणी सांस्कृतिक तर काही ठिकाणी बाल्या नृत्यांचे सादरीकरण करीत पारंपारिक नृत्याचे दर्शन घडवून आले. अनेक ठिकाणी साखळी करीत संपूर्ण गावात, शहरात, गल्लीत जाऊन दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम जल्लोषात साजरा केला. या उत्सवात महिलादेखील सहभागी झाल्या होत्या. लहान मुलांबरोबरच तरुणाईनेसुद्धा या उत्सवाचा आनंद घेतला.

## गोविंदाच्या आगमनाने रंगतो पारंपरिक सोहळा

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

गोकुळाष्टमी म्हणजे श्रीकृष्णाच्या जन्माचा आनंदोत्सव. या सणानिमित्त गावागावांत दहीहंडी, गोपाळकाला आणि विविध पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आबालवृद्धांसह तरुणाईमध्ये या उत्सवाची विशेष उत्सुकता पाहायला मिळते. शनिवारी (दि. ५) सुधागड तालुक्यातील जांभूळपाड्यासह परिसरातील विविध गावांमध्ये दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर, वाद्यांच्या तालावर थिरकणारी तरुणाई आणि गोपाळकाल्याच्या उत्साहाने संपूर्ण परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.



मात्र, जांभूळपाडा येथील दहीहंडी उत्सवाला एक आगळीवेगळी पारंपरिक ओळख आहे. अनेक वर्षांपासून जपली जाणारी ही प्रथा आजही तितक्याच श्रद्धेने आणि उत्साहाने साजरी केली जाते. दहीहंडी फोडण्यापूर्वी गोविंदाच्या अंगावर आसूडाचे (सोरट) फटके घेण्याची पारंपरिक प्रथा येथे पाहायला मिळते.

उत्सवादरम्यान कन्होबाची वारी गोविंदाच्या अंगात येते, अशी स्थानिक ग्रामस्थांची श्रद्धा आहे. या पारंपरिक विधीनंतर गोविंदा उत्साहात नृत्य करू लागतात. महिलांकडून त्यांची पूजा-अर्चा केली जाते. त्यानंतर गोविंदा पारंपरिक पद्धतीने गावातून फिरतात आणि हा सोहळा पार पडल्यानंतर दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम होतो.

ही प्रथा नेमकी कधीपासून सुरू झाली, याबाबत निश्चित माहिती उपलब्ध नसली तरी पिढ्यापिढ्या चालत आलेली ही लोकपरंपरा ग्रामस्थांनी आजही जपली आहे. बदलत्या काळात अनेक पारंपरिक प्रथा मागे पडत असताना, जांभूळपाड्यातील ही परंपरा आजही श्रद्धा, लोकविश्वास सहभागातून जिवंत असल्याचे दिसून आले.

या अनोख्या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. पारंपरिक विधी, ढोल-ताशांचा निनाद आणि दहीहंडीच्या उत्साहामुळे जांभूळपाड्याचे वातावरण अक्षरशः उत्सवमय झाले होते.

सुधागड तालुक्यातील गावागावांतही गोपाळकाल्याचा उत्साह मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाला. लहान-मोठ्या दहीहंड्या फोडताना बालगोपालांसह तरुणाईने नृत्याचा ठेका धरला. पारंपरिक गाणी म्हणत गोविंदा घरोघरी जात होते. ठिकठिकाणी दहीकाला, फळे आदी प्रसाद देऊन तसेच पाण्याचा वर्षाव करत गोविंदांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

पाऊस आणि ढगाळ वातावरणात दहीहंडी फोडण्याचा आनंद काही औरच असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. पावसाच्या सरी अंगावर घेत एकावर एक थर रचत गोविंदांनी दहीहंडी फोडण्याचा थरार अनुभवला. परिसरात जल्लोष, टाळ्यांचा कडकडाट आणि वाद्यांचा गजर सुरू असताना उत्सवाचा आनंद द्विगुणित झाला.

श्रद्धा, परंपरा, लोकसंस्कृती आणि उत्साह यांचा सुरेख संगम असलेल्या जांभूळपाड्यातील दहीहंडी उत्सवाने कोकणच्या समृद्ध लोकपरंपरेचे पुन्हा एकदा दर्शन घडविले. काळ बदलला, उत्सव साजरा करण्याच्या पद्धतींमध्ये बदल झाले; मात्र जांभूळपाड्यातील ही आगळीवेगळी प्रथा आणि परंपरा आजही ग्रामस्थांच्या श्रद्धेतून आणि उत्साहातून तितक्याच जिवंतपणे जपली जात आहे.




## साखर येथे दहीहंडी साजरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथे शनिवारी (दि. ५) सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम अतिशय उत्साहात व जल्लोषात पार पडला. विद्यार्थी आणि पालकांनी दहीहंडी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. विद्यार्थ्यांना सांस्कृतिक वारसा लाभावा व ऐक्य निर्माण व्हावे हा यामागील मुख्य उद्देश होता.आजच्या युगात पारंपरिक सणाला देखील विशेष महत्त्व आहे हे या कार्यक्रमातून दिसून येते. या कार्यक्रमासाठी किरण बुरांडे, गोकुळ सारंग, जय बुरांडे, शेखर भुकवार, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य हरेश्वर गोतकर यांनी सहकार्य केले.

या कार्यक्रमासाठी प्रफुल्ल बानकर, रेश्मा भुकवार, भावना जगू, रणिता दाभोळकर, नुतन तांडेल, जयराम आंबेरकर, अमिता सारंग, श्वेता नाखवा, अश्विनी गण,तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व सर्व पालक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, स्मिता चिखले, रिमा गुरव, संजना नर्बेकर, मनिषा गुरव, अमोली साटविलकर, वैष्णवी तसेच सर्व आजी माजी विद्यार्थी उपस्थित होते.



■ अलिबाग कोळीवाड्यात बच्चेकंपनीसह तरूणांनी दहीहंडी फोडून जल्लोष साजरा केला.



■ चेंढरे येथील मारूती मंदिरजवळ दहीहंडीचा जल्लोष करताना.



■ गोविंदा रे गोपाळाच्या आवाजाने पीएनपी संकुल दानाणून गेला. गोकुळाष्टमी, गोविंदा निमित्त अलिबाग जवळील पीएनपी होली चाईल्ड शाळेत दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी थरावर थर रचून दहीहंडी फोडली.



■ पुरूष गोविंदा पथकाच्या स्पर्धेत आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी श्रीकृष्ण महिला गोविंदा पथक गवळीवाडी यांनी कसून सराव केला होता. या महिला गोविंदा पथकाने ४ मानवी मनोरे रचून दहीहंडी फोडली.

## दैवज्ञ ब्राह्मण सोनार समाजाचा कृष्ण जन्मोत्सव

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड दैवज्ञ ब्राह्मण सोनार समाजाच्या वतीने समाज हॉल येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी बालगोपालांनी उत्साहात दहीहंडी फोडून उपस्थितांची मने जिंकली.

पूजेचा मान बाजारपेठ येथील सचिन धोत्रे व त्यांच्या पत्नी यांना मिळाला. विधिवत पूजनानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. रात्री १२.४५ वाजता श्रीकृष्ण जन्म होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यानंतर दही-पोहे वाटप करून जन्माष्टमीचा उत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला.

जन्माष्टमीनिमित्त महिलांनी पारंपरिक पाळणा गीत तसेच गवळण सादर केली. गवळणीवर महिलांनी नृत्य सादर करत कार्यक्रमात रंगत आणली. बालगोपालांसह महिला व समाजबांधवांनी सहभाग घेत कृष्ण जन्मोत्सव उत्साहात साजरा केला.



## धुतुममध्ये नामस्मरण भजनांचा जागर

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील धुतुम गावात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. धुतुम खालची आळी यांच्या वतीने शंकर मंदिरात पूजा अर्चा,अभिषेकचा मान सामाजिक कार्यकर्ते समाधान कृष्णा कटेकर व सामाजिक कार्यकर्त्या भारती समाधान कटेकर या दांपत्याला देण्यात आला. त्यांच्या शुभहस्ते सप्ताहाचा अभिषेक, पूजा अर्चा भक्तीभावाने संपन्न झाला.

यावेळी जन्माष्टमीचा उत्सव निर्विघ्नपणे पार पडावा तसेच गावात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी, यासाठी श्रीकृष्ण चरणी प्रार्थना करण्यात आली. जन्माष्टमीच्यानिमित्ताने रात्रभर नामस्मरण, भजन, किर्तन आणि जागर करण्यात आला. या उपक्रमामुळे गावात एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा टिकून राहण्यास मोठी मदत होत आहे. सालाबादप्रमाणे दरवर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत रघुनाथ ठाकूर यांच्या घरात आयोजित करण्यात आला होता.



यंदाही धार्मिक परंपरा आणि सामाजिक एकोपा जपत हा उत्सव उत्साहात पार पडला. या धार्मिक सोहळ्यास दशरथ ठाकूर, मेघनाथ ठाकूर, सुरेश ठाकूर, गोविंद ठाकूर, यांच्यासह धुतुम खालची आळीतील ग्रामस्थ, धुतुम गावातील ग्रामस्थ, भाविक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आकार प्री-स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड येथील आकार प्री-स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात, साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा तसेच विविध पारंपरिक व्यक्तीरेखांच्या आकर्षक वेशभूषा परिधान करून उपस्थितांची मने जिंकली.



यावेळी चिमुकल्यांनी कान्हाच्या वेशात मोरपिसांचा मुकुट, बासरी पोशाख परिधान केला होता. तर बालिकांनी राधेच्या सुंदर वेशभूषेत कार्यक्रमाची शोभा वाढविली. काही विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक पोशाखांतून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले.

## बाळगोपाळांनी फोडली दहीहंडी

**सुतारवाडी** : श्रीकृष्ण, सुदाम, राधा, आणि श्रीकृष्णाचे अनेक सवंगडी गोपाळकाला या दिवशी एकत्र आले. गोविंदा रे गोपाळा असे म्हणत शाळेच्या ठिकाणी बांधलेली दहीहंडी फोडून साजरा केला. कविता भालेराव, शितल सानप, सानिका मोरे आदींनी लहान मुलांची विशेष तयारी करून घेतली. लहान मुलांनी दाखविलेल्या कलागुणांचा स्कूलचे संस्थापक, डॉ. रमेश राजे, सदानंद प्रधान, लियाकत कडवेकर, पालक वर्ग, स्कूल कमिटी सर्व सदस्य आदींनी या लहान मुलांचे विशेष कौतुक केले.

## लक्ष्मीनारायण मंदिरात पारंपरिक खेळ

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथील ऐतिहासिक पेशवेकालीन लक्ष्मीनारायण मंदिरात लक्ष्मीनारायण देवस्थान ट्रस्टतर्फे आयोजित श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्यांतर्गत शनिवार (दि.०५) रोजी भक्तीमय वातावरणात काल्याचे कीर्तन आणि पुरुषांचे पारंपरिक खेळ अत्यंत उत्साहात पार पडले. या तीन दिवसीय उत्सवामध्ये नागपूर येथील मृण्मयी कुलकर्णी यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.



उत्सवाच्या पहिल्या दिवशी, शुक्रवारी (दि.०४) सप्टेंबरला श्रीकृष्णाचा जन्मोत्सव आणि जन्मकीर्तन भाविकांच्या उपस्थितीत पार पडले. शनिवारी काल्याच्या कीर्तनाला सुरुवात झाली. कीर्तनानंतर संतांच्या अभंगाच्या तालावर आणि पेटी, नाल व टाळांच्या गजरात मंदिर परिसरात पुरुषांचे पारंपरिक खेळ रंगले. संत तुकाराम, संत एकनाथ व संत जनाबाई यांच्या अभंगांवर आधारित हमामा, हुंबरी, दळण-कांडण, फुगडी, दंड आणि बस फुगडी यांसारखे अंगात जोश आणि ताकद आणणारे विविध पारंपरिक खेळ पुरुषवर्गाने भक्तीभावाने सादर केले. हे खेळ पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

## पेझारीत रंगला दहीहंडीचा उत्साह

### चित्रलेखा पाटील यांच्यासह ॲड. मानसी म्हात्रे यांची उपस्थिती

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील पुरस्कृत शेतकरी कामगार पक्ष पेझारी, मृदूल म्हात्रे मित्र मंडळ आयोजित दहिहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले.

ढोलपाडा-आंबेपूर येथील नूतन हनुमान क्रीडा मंडळाच्या मैदानात या उत्सवाचा शुभारंभ झाला. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती या सोहळ्याचा उद्घाटन झाले. यावेळी शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, अलिबागच्या नगरसेविका ॲड. निलम हजारे, मृदूल म्हात्रे मित्र मंडळाचे पदाधिकारी, सभासद, ग्रामस्थ, महिला उपस्थित होते. पेझारी ग्रामस्थ अध्यक्ष गजानन पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी दिगंबर म्हात्रे, मो.रा. म्हात्रे, अंबरनाथ पाटील, प्रणित म्हात्रे, अतुल पाटील, कल्पेश पाटील आदी ग्रामस्थ उपस्थित होते. उद्घाटनावेळी नूतन म्हसोबा गोविंदा पथक पेझारी यांनी पाच थर लावून सलामी दिली.



गोविंदा रे गोपाळा अशा अनेक मराठी, हिंदी गाण्याच्या ठेक्यावर नाचत दहीहंडीचा जल्लोष साजरा करण्यात आला. या उत्सवामध्ये पाच व त्यापेक्षा अधिक थरांची सलामी देणाऱ्या गोविंदा पथकांना तीन हजार रुपये, चार व त्यापेक्षा अधिक थरांची सलामी देणाऱ्या महिला गोविंदा पथकांना तीन हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले. त्यामुळे सलामीसाठी मानवी मनोरे रचण्याचा साहसी प्रयत्न असंख्य गोविंदा पथकाने केला.

## काठीच्या सहाय्याने फोडली हंडी

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

गोकुळाष्टमीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहरात शनिवारी सर्वत्र उत्साहाचे वातावरण असून, विशेष आकर्षण ठरते ते लाईन आळी परिसरातील सुमारे दीडशे वर्षांची परंपरा लाभलेली देवाची हंडी. पनवेलमधील दहीहंडी उत्सवाची सुरुवात परंपरेनुसार प्रथम या देवाच्या हंडीने केली जाते.

लाईन आळीतील ही ऐतिहासिक परंपरा आजही श्रद्धेने आणि उत्साहात जपली जात आहे. विशेष म्हणजे ही हंडी मानवी मनोरे रचून नव्हे, तर काठीच्या सहाय्याने फोडण्याची पारंपरिक पद्धत आजही कायम आहे.



देवाची हंडी फोडण्याचा सोहळा पाहण्यासाठी पनवेलसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने लाईन आळी परिसरात गर्दी करतात. हंडी फोडल्यानंतर शहरातील विविध भागांतील दहीहंडी उत्सवांना सुरुवात होते.

पनवेलमध्ये विविध ठिकाणी अनेक वर्षांपासून दहीहंडीची ठिकाणे व आस्थाने प्रसिद्ध आहेत. काही ठिकाणच्या हंड्या या नागरिकांनी केलेल्या नवसाच्या हंड्या म्हणून विशेष श्रद्धेने ओळखल्या जातात.

या दिवशी अनेक भाविक व गोपाळ उपवास करतात. पारंपरिक श्रद्धा आणि धार्मिक वातावरणामुळे या उत्सवाला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)